रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २४० । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹

## अवजड वाहनांना तात्पुरती बंदी

**अलिबाग** : दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदानाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांच्या वाहतुकीवर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी दि. ६ फेब्रुवारी सायं. ७ ते दि. ७ फेब्रुवारी दुपारी ३ वाजेपर्यंत लागू राहणार असल्याची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे. मतदारांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस, औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला, पाणी आदी जीवनावश्यक वस्तू नेणारी वाहने, तसेच पोलीस, फायर ब्रिगेड व रुग्णवाहिकांना या बंदीतून सूट दिली आहे.

## राज्यात ७,४३८ उमेदवार रिंगणात

**मुंबई** : राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांसाठी उद्या, शनिवारी मतदान होत असून, यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ तर पंचायत समित्यांच्या १,४६२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. एकूण ७, ४३८ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. उद्या होणाऱ्या मतदानासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केले आहे.

# दादाचे नाही, हे आमदाराचेच पाप!

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

**चौल ते वायशेत-शास्त्रीनगर या कोट्यवधी रुपयांच्या जलजीवन योजनेचे काम अद्याप पूर्ण झालेले नसताना कोट्यवधी रुपयांचे खोटे बिल काढण्याचा प्रताप आमदार महेंद्र दळवी यांचा ठेकेदार असलेल्या एव्हिएन आयईएल इन्फ्रास्ट्रक्चरकडून करण्यात आला आहे. ही बाब माहितीच्या अधिकारातून उघड झाल्याने मतांसाठी सुरेंद्र म्हात्रे यांच्यावर आरोप करणाऱ्या आमदारांची बोलती बंद झाली आहे. चौल जिल्हा परिषद गटाचे उमेदवार सचिन राऊळ यांच्या प्रचारार्थ घेतलेल्या सभेत आमदारांनी चौल पाणी योजनेचा मुद्दा घेत महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे यांच्यावर जवळपास ३ कोटी रुपयांची खोटी बिले काढल्याचा आरोप केला होता. मात्र, माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीने हे आमदारांचे पाप उघड झाले आहे.**

चौल जिल्हा परिषद मतदारसंघाचे उमेदवार तथा शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे यांना याबाबत विचारणा केली असता मतदारांची दिशाभूल करण्यासाठी पाणीपुरवठा योजनेत मी घोटाळा केल्याचा आरोप आमदारांकडून करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. तसेच दळवी दोन टर्म आमदार आहेत, तर ते चौकशी करु शकले असते. परंतु, त्यांच्यामध्ये हे धाडस नाही, अशी टीकाही त्यांनी केली. त्याचप्रमाणे चौल ते वायशेत जलजीवन योजनेत प्रचंड मोठा भ्रष्टाचार झाला असून, जवळपास ३५ कोटींचे काम असणारी ही योजना पूर्ण होण्याआधीच १४ कोटी ठेकेदाराला देण्यात आले आहेत. अद्याप याठिकाणी कोणतेच काम केलेले नाही. •› पान २ वर




“माझ्यावर पाणीपुरवठा योजनेत घोटाळा केल्याचा आरोप आमदार करीत आहेत, त्या योजनेशी माझा काहीएक संबंध नाही. ही योजना यांचीच असून, ठेकेदारही आमदारांचाच आहे. स्वतःचे पाप झाकण्यासाठी बिनबुडाचे आरोप माझ्यावर करण्यात येत आहेत. आपण आमदार आहात, मग चौकशी लावून सत्य बाहेर का काढले नाही. मतदारांची दिशाभूल करण्याचा हा प्रयत्न आहे. परंतु, येथील मतदार सुज्ञ असून, असल्या खोट्या आरोपांना बळी पडणारा नाही. तसेच चौल ते वायशेत या योजनेचे कोणतेही काम झालेले नसताना काम पूर्ण झाल्याचे दाखवून काढण्यात आलेल्या खोट्या बिलांचीही चौकशी झालीच पाहिजे.”

**– सुरेंद्र म्हात्रे**

### आमदारांना सवाल

- काम अपूर्ण असताना पूर्णत्व प्रमाणपत्र कसे?
- १४.७४ कोटींचे देयक कोणत्या प्रत्यक्ष मोजमापावर?
- साइट पाहणीची नोंद कुठे?
- ग्रामपंचायत पडताळणी झाली का?
- नियोजित मुदतीपूर्वी काम पूर्ण दाखविण्याची घाई का?

### आमदार साहेब, पाईप, टाक्या आहेत कुठे?

चौल-वायशेत परिसरात प्रत्यक्ष फिरुन पाहिल्यास वेगळेच वास्तव समोर येत आहे. इथे पाईप टाकले म्हणे.. पण, जमिनीत खड्डाही खोदलेला नाही. ज्या ठिकाणी टाक्या उभारल्याचे कागदोपत्री दाखवण्यात आलेय, त्या जागा मोकळ्या आहेत. मग, पाईप, टाक्या गेल्या कुठे? हे आमदार साहेबांनीच सांगावे, असेही सुरेंद्र म्हात्रे यांनी ठणकावले आहे.

### अपूर्ण कामाला पूर्णत्वाचे प्रमाणपत्र

जलजीवन मिशनच्या अटींनुसार प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्यानंतरच देयक आणि प्रमाणपत्र देणे अपेक्षित आहे. मात्र, हे काम अपूर्ण असतानाही कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आले आहे. माहितीच्या अधिकारातील माहितीनुसार, ग्रामपंचायत पडताळणी, प्रत्यक्ष जागेची पाहणी, घरोघरो नळजोडणी याबाबत स्पष्ट नोंदी उपलब्ध नसल्याचे दिसते. 'आपलं ठेवायचे झाकून, आणि...' अशी सवय असणाऱ्या आमदारांनी सुरेंद्र म्हात्रे यांच्यावर आरोप करुन स्वतःचा खोटारडेपणा समोर आणला आहे.



# जिल्ह्यात आज मतदान

- **१७ लाख ३८१ मतदार बजावणार हक्क**
- **युवा, महिला व ८५ वर्षांवरील मतदारांची भूमिका महत्त्वपूर्ण**



### कर्मचारी केंद्राकडे रवाना

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून, नियुक्त कर्मचारी शुक्रवारी सकाळपासून मतदान केंद्रांकडे रवाना झाले. ईव्हीएम मशीन व आवश्यक साहित्य घेऊन कर्मचारी केंद्रांवर पोहोचत होते. महिलांसाठी शक्य तितकी जवळची मतदान केंद्रे देण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी (दि. ७) सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत मतदान होणार आहे. जिल्ह्यातील १७ लाख ३८१ मतदार उद्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. सर्वाधिक मतदार पनवेल तालुक्यात, तर सर्वात कमी मतदार तळा तालुक्यात आहेत. जिल्ह्यातील २ हजार ३२३ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार असून, ती सुरळीत आणि शांततेत पार पाडण्यासाठी दोन हजारांहून अधिक कर्मचारी व कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. युवा, महिला आणि ८५ वर्षांवरील ज्येष्ठ मतदारांची भूमिका या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहे. प्रशासन व पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी ही निवडणूक होत असून, •› पान २ वर

## हुक्का पार्लरवर कारवाई

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेल सेक्टर एक या ठिकाणी हुक्का पार्लरवर कारवाई करत पोलिसांनी राजेंद्र दत्ताराम तेली (सेक्टर १२ खारघर) आणि जितेन विनोद शहा (रत्नेश अपार्टमेंट, लाइन आळी, पनवेल) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला. मिंट कॅफे, सिडको आफिसच्या मागे सेक्टर १, नवीन पनवेल या ठिकाणी तंबाखूयुक्त हुक्का पुरवला जात असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांना मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी छापा टाकला.

## उरणमध्ये ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार उघड



**सीईओ नेहा भोसले यांच्या अचानक तपासणीने खळबळ**

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराबाबत प्राप्त झालेल्या लेखी तक्रारींची दखल घेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी उरण येथील ग्रामपंचायत कार्यालयाला अचानक भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या अनपेक्षित •› पान २ वर

## विवाहितेवर अत्याचार

**पनवेल** : तळोजा भागात मोटार ट्रेनिंग स्कूल चालवणाऱ्या व्यक्तीने त्याच्याकडे ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या एका विवाहितेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव किरण पावशे असून, तो तळोजा भागात राहण्यास आहे. तसेच पीडित विवाहितादेखील तळोजा भागात राहण्यास आहे. आरोपी किरण पावशे याचे तळोजा भागात मोटर ट्रेनिंग स्कूल असून, जुलै २०२२ मध्ये पीडित विवाहिता त्याच्या ट्रेनिंग स्कूलमध्ये ड्रायव्हिंगच्या प्रशिक्षणासाठी गेली होती.



# भारत विश्वविजेता!

- **अंडर-१९ चा विश्वचषक सहाव्यांदा जिंकला**
- **फायनलमध्ये इंग्लंडचा दुसऱ्यांदा धुव्वा**

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

**कर्णधार आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली भारतीय अंडर-१९ संघाने आयसीसी विश्वचषक जिंकत इतिहास रचला. यासह भारताने अंडर-१९ विश्वचषक सहाव्यांदा जिंकण्याचा मान मिळवला. यापूर्वी २०००, २००८, २०१२, २०१८ आणि २०२२ साली भारताने ही ट्रॉफी पटकावली होती.**

**हरारे स्पोर्ट्स क्लब मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडवर १०० धावांनी दणदणीत विजय मिळवला. वैभव सूर्यवंशीच्या १७५ धावांच्या स्फोटक खेळीमुळे भारताने ४१२ धावांचे भक्कम आव्हान उभे केले. प्रत्युत्तरात इंग्लंडचा डाव ४०.२ षटकांत** •› पान २ वर

# संजय जांभळे लढवय्ये उमेदवार : जयंत पाटील

| गडब | प्रतिनिधी |

वडखळ जिल्हा परिषद गटात जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला असून, पुढेही तोच लढा कायम ठेवणार असल्याचे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी वढाव येथील प्रचारसभेत केले. लोकहित जपणारे आणि जनतेच्या अडीअडचणी, सुखदुःखात धावून जाणारे संजय जांभळे यांसारखे लढवय्ये उमेदवार जिल्हा परिषदेत पाठवा, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले. ते गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी पेण-वढाव येथे झालेल्या सभेत बोलत होते.

एसईझेडचा लढा, एमआयडीसी ११ गावांचा संघर्ष, शेतकरी-कष्टकरी समाजासाठी उभारलेले आंदोलन यांची आठवण करून देत जयंत पाटील म्हणाले, सत्तेसाठी पक्षांतर करणारे नेते आपण पाहिले; मात्र रायगड जिल्ह्यात शेकाप आणि काँग्रेस या दोन पक्षांनी विचारधारा न बदलता जनतेसाठी भूमिका घेतली. संविधान आणि लोकशाही मूल्ये जपत जनतेला न्याय देण्याचे काम या पक्षांनी केले आहे. आज मात्र शेतकऱ्यांना देशोधडीला लावून, स्थानिकांना विश्वासात न घेता निर्णय घेणाऱ्या आणि भांडवलदारांचे हित जपणाऱ्या भाजपासारख्या पक्षांना येथे थारा देऊ नका. खारेपाटातील मतदारांनी शेकापचा सच्चा नेता आणि नेतृत्व म्हणून संजय जांभळे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे, असे ते म्हणाले.

या प्रचारसभेला वडखळ जिल्हा परिषद गटातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार संजय जांभळे, वडखळ गणातील शेकापच्या उमेदवार ललिता म्हात्रे, वाशी गणातील काँग्रेसचे उमेदवार वैभव म्हात्रे उपस्थित होते. यावेळी काँग्रेस आमदार भाई जगताप, शेकाप खजिनदार अतुल म्हात्रे, •› पान २ वर




### 'शेकाप-काँग्रेसमुळे कष्टकऱ्यांना न्याय'

पंचायत राज व्यवस्थेतून नागरिकांना मिळालेले अधिकार हे संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून आले असल्याचे आ. भाई जगताप यांनी सांगितले. काँग्रेस व शेकापने पूर्वी केलेल्या जनआंदोलनांमुळे शेतकरी, कष्टकरी, कामगारांना न्याय मिळाला. इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली पंचायत राज व्यवस्था सक्षम झाल्याचेही त्यांनी सांगितले.

## महाविकास आघाडीची दावेदारी

पनवेल : पनवेल महानगरपालिकेतील महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीने आज शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी अधिकृत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. महापौर पदासाठी अर्चना योगेश भोईर तर उपमहापौर पदासाठी लीला रत्न कातकरी यांचे नामांकन सादर करण्यात आले. महाविकास आघाडीचे पालिकेत संख्या बळ १८ असतानाही ही निवडणूक बिनविरोध होऊ नये, अशी स्पष्ट भूमिका आघाडीने मांडली आहे. लोकशाही प्रक्रियेतूनच नेतृत्व निवडले जावे, यासाठी निवडणूक होणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

**मतदारांकडून उत्स्फूर्त पाठिंबा | महायुतीला अंतर्गत वादाचा बसणार फटका**

# महाविकास आघाडीलाच बलाबल

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद आणि १५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी शनिवारी (दि.७) मतदान होत आहे. गेल्या काही दिवसांपासून प्रचारसभा, रॅली आणि विविध संपर्क अभियानांच्या माध्यमातून महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाच्या १९ उमेदवारांसह महाविकास आघाडीचे एकूण ४७ उमेदवार रिंगणात उभे आहेत. तळा-गाळातील घटक, शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि तरुण वर्गांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा दिल्यामुळे या निवडणुकीत शेकापसह महाविकास आघाडीला बलाबल मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दुसरीकडे, महायुतीमधील शिंदे गट, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात जिल्ह्यात अनेक ठिकाणी अंतर्गत पायखेची सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये तसेच मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक प्रश्न, भूमीपुत्रांना न्याय, तसेच भ्रष्टाचाराविरोधात ठाम भूमिका घेत महाविकास आघाडी निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. विकासकामे न करता ती केल्याचा देखावा करून बिले काढल्याचे, तसेच निधीची अक्षम्य लूट झाल्याचे आरोप करत महाविकास आघाडीने प्रचारात मुद्दे मांडले आहेत. त्यामुळे शिंदे गटासह महायुतीच्या उमेदवारांविरोधात मतदारांमध्ये नाराजी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे १९, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे १९ आणि काँग्रेसचे ९ असे एकूण ४७ उमेदवार रिंगणात आहेत. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शेतकरी कामगार पक्षाने १९ उमेदवार उभे केले असून त्यात पनवेलमध्ये सहा, अलिबागमध्ये पाच, पेणमध्ये दोन, तसेच सुधागड, रोहा, तळा, म्हसळा आणि श्रीवर्धनमध्ये प्रत्येकी एक उमेदवार आहे.

पनवेल तालुक्यातील वावंजे जिल्हा परिषद मतदार संघातून लता धनराज म्हात्रे, नेरेमधून मारुती बाळू भस्मा, पाली देवदमधून डॉ. ज्योती स्वप्नील भुजंग, पळस्पेमधून अस्मिता अनिल ढवळे, वडघरमधून ज्योती जनार्दन चोरघे, केळवणेमधून ज्ञानेश्वर हसुराम मोरे हे उमेदवार उभे आहेत. सुधागड तालुक्यातील वीस राबगाव जिल्हा परिषद मतदार संघातून काशिराम ताया हंबीर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. पेण तालुक्यातील दादर जिल्हा परिषद मतदार संघातून प्रल्हाद दिनेश पाटील, वडखळमधून संजय जनार्दन जांभळे हे उमेदवार उभे आहेत.

अलिबाग तालुक्यातील शहापूर जिल्हा परिषद मतदार संघातून अभिषेक अनिल पाटील, आंबेपूरमधून पुजा अजित भगत, थळमधून सानिका सुरेश घरत, चेंढरेमधून प्रविणा प्रमोद घासे, कावीरमधून मोहन दत्तात्रेय धुमाळ हे उमेदवार रिंगणात आहेत. रोहा तालुक्यातील घोसाळेमधून वैष्णवी हेमंत ठाकूर, तळा तालुक्यातील चरई खुर्दमधून करुणा कमलेश पातेरे, म्हसळा तालुक्यातील पाभरे जिल्हा परिषद मतदार संघातून संतोष नथुराम पाटील, तर श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतनमधून शारदा देवजी नाईक हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

## नफ्याचे आमिष दाखवून १ कोटी ५९ लाखांची फसवणूक

- **तिघांविरोधात पनवेल पोलिसांत गुन्हा दाखल**

| पनवेल | प्रतिनिधी |

व्यवसायात गुंतवणूक करून नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि पैसे परत न देता फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मेहवाज मतीन हसवारे हे खारघर, सेक्टर ८ येथे राहात असून, त्यांना ओळखीचे राहिल इस्माईल सोंडे आणि त्याचे मेहुणे दिवाण मोटर्सचे मालक सलमान अनवर दिवाण आणि सुफियान अनवर दिवाण यांनी दिवाण मोटर्सच्या व्यवसायात गुंतवणूक करून त्यावर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि ५६ लाख रुपये रोख घेतले. त्यानंतर सलमान आणि सुफियान यांनी त्यांचे राहते घर (पटेल मोहल्ला पनवेलच्या बाजूचे घर) खरेदी करून गुंतवणूक करण्यास सांगितली आणि त्यावर नफा मिळवून देतो व दिलेल्या रकमेच्या मोबदल्यात बांधत असलेल्या १० माळ्याच्या टॉवरमध्ये पाच फ्लॅट देतो, असे सांगून एक कोटी तीन लाख तीस हजार रुपये घेतले. असे एकूण मेहवाज यांच्याकडून १ कोटी ५९ लाख ३० हजार रुपये घेऊन ही रक्कम परत मागितली असता रक्कम न देता अंडरवर्ल्डमध्ये ओळख असून पैसे परत मागितले, तर मारून टाकू, अशी दमदाटी केली.

# धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर जेवणाच्या पंगती

## किनाऱ्यावर अनधिकृत स्टॉल्स वाढले; नगरपरिषद प्रशासन पूर्णपणे निद्रिस्त

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर पर्यटकांसाठी उघड्यावर जेवणाच्या पंगती वाढल्या जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. किनाऱ्यालगत अनधिकृत टपऱ्या व खाद्यपदार्थांचे स्टॉल मोठ्या प्रमाणात वाढले असून, ऑर्डर घेऊन या स्टॉलधारकांकडून बंधाऱ्यावरच जेवण वाढले जात असल्याची तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे.

मोरया बीच हाउससमोरील मोकळ्या जागेत, जिथे वाहने पार्क होऊ शकतात, त्या ठिकाणी जुन्या साड्या बांधून जागा अडवण्याचा प्रकार सुरू असल्याचे दिसून येते. काही ठिकाणी लाल माती टाकून जागा सपाट करून स्टॉल उभारण्याचे प्रयत्नही होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सध्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या कामात प्रशासन व्यस्त असल्याचा फायदा घेत अनधिकृत स्टॉल्स उभारले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. श्रीवर्धनमध्ये अनेक हॉटेल्स व रिसॉर्ट्स असून, त्यापैकी बरीच आस्थापने भाडेतत्त्वावर चालवली जातात. मात्र, समुद्रकिनाऱ्यावर अनधिकृतरित्या उघड्यावर जेवण वाढले जात असल्याने नियमित कर व भाडे भरणाऱ्या व्यावसायिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

शासकीय विश्रामगृहाजवळ, स्मशानभूमी परिसरात तसेच रस्त्यालगत अनेक ठिकाणी जागा अडवून स्टॉल उभारले जात असल्याचेही स्थानिकांचे म्हणणे आहे. या स्टॉल्सवर वनविभाग व नगरपरिषदेने तातडीने कारवाई करावी, अन्यथा हॉटेल व्यावसायिकांकडून आंदोलन उभारले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच अन्न व औषध प्रशासनाने संबंधित स्टॉलधारकांकडे आवश्यक खाद्य परवाना आहे का, याची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

श्रीवर्धन नगरपरिषदेतील लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन समुद्रकिनाऱ्यावरील अनधिकृत स्टॉल्स हटविण्यासाठी त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी हॉटेल मालकांकडून होत आहे. दरम्यान, या गंभीर प्रश्नावर प्रशासन काय कारवाई करणार, याकडे सर्वांच लक्ष लागून राहिले आहे.

# गोवंशाची कत्तल रोखली

**■ मजगाव येथे पोलिसांचा छापा, दोघांना बेड्या**

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा पोलीस ठाणे हद्दीतील तळा तालुक्यातील मजगाव येथे पोलिसांनी छापा टाकून कत्तलीच्या उद्देशाने क्रूरतेने बांधून ठेवलेल्या गोवंशातील एका बैलाची सुटका केली. याप्रकरणी दोन जणांना अटक करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास मौजे मजगाव (ता. तळा) येथील कासीम वगनाक यांच्या घरामागे ही कारवाई करण्यात आली. आरोपींनी संगनमत करून गोवंशातील बैल खरेदी करून कत्तलीसाठी आणल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. घटनास्थळी बैलाला दोन दोऱ्यांनी घट्ट बांधलेले आढळले. त्याला चारा-पाण्याची व्यवस्था नव्हती. तसेच तो आवाज करू नये म्हणून तोंड व नाक दोरीने बांधून ठेवण्यात आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

याप्रकरणी म्हसळा पोलिस ठाण्याचे पोलिस शिपाई गणेश बळीराम पवार यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी ताजुद्दीन इस्माईल वगनाक (वय ४९, रा. मजगाव, ता. तळा) आणि मच्छिंद्र खेलु गावकर (वय ३५, रा. रोवळे, ता. तळा) यांना अटक केली. आरोपींवर 'प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे आणि सपोनि रवींद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक डी.व्ही. एडवळे करत आहेत. आरोपींना अटक करण्यात आली असून, प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# एकविरा आईच्या पालखी सोहळ्याने आनंद

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कार्ला गडावरील आई एकवीरा देवीचा मानाचा पालखी सोहळा आई एकविरा ग्रुपने शुक्रवार, दि.६ फेब्रुवारी रोजी आयोजित केली होती. आई माऊलीचा उदो उदो, आई आयलोच्या नामघोषांनी अवघी पालखी मिरवणूक दुमदुमून गेली होती. पालखी सोहळ्यात खालापूर गाव,आदिवासी बांधव महिला, तरूण, तरूण हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. अतिशय आनंदी, उत्साही आणि चैतन्यपूर्ण वातावरणात पालखी निघाली.

पालखी सोहळ्यात खालापूर गावातील लोक सहभागी होतात, त्यामुळे एक आनंदाचे वातावरण गावात निर्माण होतं, त्यामुळे खूप आनंद होतय असल्याची भावना

**शिवानी जंगम यांचे उद्गार**

खालापूर नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम यांनी व्यक्त केली. पालखी सोहळ्याचे ५ हे वर्ष आहे. दरवर्षी गर्दी वाढत चालली असल्याने आयोजक मंडळाचे कौतुक केले.

आई एकविरा ग्रुपचे संस्थापक नागेश मेढेकर यांनी मागील वर्षापासून एकविरा आई पालखी सोहळा सुरू केले. या पालखी सोहळ्यात खालापूर गावातील लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होता. पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी खालापूर नगरपंचायतीच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, विद्यमान उपनगराध्य संतोष जंगम स्वतः सहभागी होवून सर्वांचा उत्साह वाढवितात. खालापूर गावातून निघालेल्या पालखीचे शिळफाट्यावर जोरदार स्वागत झाले. यावेळी माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, विद्यमान उपनगराध्य संतोष जंगम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले.

# रस्त्याची वाट, जनतेचे हाल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील चौल, कुरुळ परिसरात रस्ता रुंदीकरणाचे काम मागील सहा महिन्यांपासून सुरू आहे. त्यामुळे याठिकाणी उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

संबंधित विभागाचा ही बाब निदर्शनास आणून दिली असतानाही, यावर तातडीची कोणतीही उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दररोज या मार्गावरुन प्रवास करणाऱ्यांसाठी हा प्रवास नकोसा वाटू लागला आहे. तरी, संबंधित विभागाने रस्त्यावरील धूळ उडू नये, यासाठी पाण्याचा मारा करण्याची मागणी स्थानिकांसह प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# सीईओंकडून माणिवली ग्रामपंचायतीचे कौतुक

**। कर्जत । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान मध्ये मानिवली,नेरळ आणि पिंपळोली ग्रामपंचायत यशस्वी ठरल्या आहेत.यातील मानिवली ग्रुपग्रामपंचायत कार्यालयाला रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट दिली.हुतात्मा हिराजी पाटील स्मारक येथे जाऊन हुतात्मा हिराजी पाटील यांना अभिवादन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले.

कर्जत तालुक्यातील मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील ग्रुप ग्रामपंचायत मानिवली, ग्रुप ग्रामपंचायत पिंपळोली व ग्रामपंचायत नेरळ या मानांकित ठरल्या आहेत.यातील हुतात्मा हिराजी पाटील यांचे जन्मगाव असलेल्या मानिवली गावी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट दिली.ग्रुप ग्रामपंचायत मानिवली येथे भेटी दरम्यान त्यांनी हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या अर्ध पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून स्मारक आणि परिसराची पाहणी केली. त्यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांची पाहणी केली. ग्रामपंचायतीचा विविध योजनाचा आढावा घेऊन त्यानुसार या बाबत मार्गदर्शन केले. तसेच अंगणवाडी केंद्र मानिवली येथे पाहणी आणि रायगड जिल्हा परिषद शाळा मानिवली येथे पाहणी केली. त्यावेळी तेथील टेरेस गार्डन आणि सौर ऊर्जा प्रकल्प यांचे कौतुक केले. महाराष्ट्र शासनाच्या डिजिटल क्लास रूम याची पाहणी केली.

या दौऱ्यात त्यांच्या समवेत उपमुख्य कार्यकारी (ग्रा.पं.) विशाल तनपुरे, कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी सुशांत पाटील, कर्जत पंचायत समिती विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) उज्वला भोसले हे होते. प्रशासक संजय चव्हाण आणि ग्रामपंचायत अधिकारी पांडुरंग म्हसे यांनी स्वागत केले.तर मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

# खालापूर टोलनाक्यावर मनसे आक्रमक

## 'वसूल केलेला टोल परत करा, अन्यथा आंदोलन' मनसे वाहतूक सेनेचे निवेदन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी गॅस टँकर पलटी होऊन झालेल्या अपघातानंतर तब्बल ३२ तास पुणे लेन बंद ठेवण्यात आली होती. या काळात हजारो वाहनचालक वाहतूक कोंडीत अडकून पडले होते. मात्र कोणतीही सुविधा न देता आयआरबीकडून टोल वसुली करण्यात आल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वाहतूक सेनेने खालापूर टोलनाक्यावर आक्रमक भूमिका घेतली. मनसे वाहतूक सेनेचे अध्यक्ष आरिफ शेख यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आयआरबी प्रशासनाला निवेदन देत, या काळात वसूल केलेला टोल तातडीने परत करावा आणि द्रुतगती महामार्गावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली. अन्यथा 'मनसे स्टाईल' आंदोलन छेडून टोलनाका बंद करण्याचा इशाराही देण्यात आला.

बोरघाटातील आडोशी बोगद्याजवळ केमिकलने भरलेला टँकर पलटी झाल्याने ज्वलनशील प्रोपेलीन गॅसची गळती सुरू झाली होती. पुढील धोका टाळण्यासाठी प्रशासनाने वाहतूक थांबवली; मात्र गळती थांबविण्यात यंत्रणेला उशीर झाल्याने तब्बल ३२ तास वाहनांची रांग लागली होती. या काळात वयोवृद्ध, महिला, लहान मुले अशा हजारो प्रवाशांना कोणतीही सुविधा न मिळाल्याने हाल सहन करावे लागले, असा आरोप मनसेकडून करण्यात आला.हेमंत पाटील, प्रदीप वाघमारे, माऊली थोरवे, अभिषेक दर्गे, महेश सोगे यांच्यासह शेकडो मनसे कार्यकर्त्यांनी आयआरबी अधिकाऱ्यांना जाब विचारला.

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील गॅस गळतीच्या घटनेची दखल घेत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार मनसे कार्यकर्ते आक्रमक झाले. कोणतीही सुविधा न देता वाहतूक कोंडीत अडकलेल्या वाहनांकडून टोल वसूल केल्याचा निषेध करत, तो परत करावा आणि महामार्गावर सुविधा उपलब्ध कराव्यात, असे निवेदन देण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास मनसे स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा मनसे वाहतूक सेनेचे अध्यक्ष आरिफ शेख यांनी दिला.**

'आयआरबी फक्त टोल वसुलीसाठी आहे का?'' असा सवाल उपस्थित करत, सुविधा न देता टोल कसा वसूल केला, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे १३ फेब्रुवारी रोजी याबाबत बैठक घेण्याचे आश्वासन आयआरबी अधिकाऱ्यांनी दिल्याचे मनसेकडून सांगण्यात आले. आचारसंहितेचा आदर ठेवून आंदोलन स्थगित करण्यात आले असले, तरी मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# जि. प. पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

**। उरण । प्रतिनिधी ।**

शनिवारी (७) होणाऱ्या उरण तालुक्यातील जिप, पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे.शुक्रवारी (६) मतदान साहित्याचे पोलिस बंदोबस्तात वाटप करण्यात आले असल्याची माहिती उरण निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी दिली.

तालुक्यातील नवघर, जासई, चाणजे, चिरनेर जिपच्या चार जागांसाठी १४, तर पंचायत समितीच्या नवघर,भेंडखळ,जासई, चिर्ले, चाणजे, केगाव, चिरनेर, आवरे या पंचायत समितीच्या आठ जागांसाठी २३ अशा एकूण १२ जागांसाठी ३७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या १२ जागांसाठी शनिवारी (७) मतदान होणार आहे.या १२ जागांसाठीएकूण१०८५२०मतदार मतदान करणार आहेत. यामध्ये पुरुष-५२८७३, स्त्री-५५६४५ , तृतीय पंथी-२ आदी मतदारांचा समावेश आहे. निवडणुकीसाठी एकूण १३५ मतदान केंद्र आहेत.

या१३५मतदार केंद्रांव्यतिरिक्त १० मतदान केंद्र राखीव ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक शिपाई व चार कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मतदान निर्भयपणे पार पाडण्यासाठी अधिकारी, पोलिस शिपाई असा एकूण ५४८ पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

शनिवारी (७) रोजी होणाऱ्या उरण तालुक्यातील जिप, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी (६) उरणच्या निवडणूक कार्यालयातून मतदान साहित्याचे पोलिस बंदोबस्तात वाटप करण्यात आले आहे. एसटी बसेस व इतर शासकीय गाड्यातुन मतदान साहित्य पोलिस बंदोबस्तात रवाना करण्यात आले असल्याची माहिती उरण निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी दिली.

पान १ वरून

## दादाचे नाही, हे आमदाराचेच पाप!

स्वतःचे पाप झाकण्यासाठी दुसऱ्यावर आरोप करायची सवय असणाऱ्या आमदारांचे पितळ उघड पडल्याचे सुरेंद्र म्हात्रे यांनी सांगत आ. दळवींवर जोरदार हल्लाबोल केला.

चौल, वायशेत, शास्त्रीनजर, रेवदंडा याठिकाणी जल जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱ्या या योजनेचे अंदाजपत्रक ३५,४९,०९,४६४ रुपयांचे आहे. कामाची सुरुवात ३० एप्रिल २०२३ रोजी झाली. अधिकृत नोंदीनुसार कामाची नियोजित पूर्णता २९ जानेवारी २०२५ अशी आहे. मात्र, पूर्णत्व प्रमाणपत्र २७ मार्च २०२४ रोजीच देण्यात आले आहे. म्हणजे, नियोजित मुदतीच्या जवळपास दहा महिने आधीच प्रमाणपत्र कसे देण्यात आले? याच काळात, कामाचा अंशतः हिशोब बिलनुसार १४,७४,५५,९५४.९९ इतकी रक्कम देण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. काम पूर्ण होण्याआधीच खोटी बिले काढण्याचा उद्योग आमदारांच्या ठेकेदाराकडून करण्यात आल्याचे सुरेंद्र म्हात्रे यांनी सांगितले.

दरम्यान, कागदोपत्री हजारो मीटर डक्टाइल आयर्न पाईप, जोडसामुग्री, साठवण टाक्या आणि वितरण व्यवस्था उभारल्याचे नमूद आहे. हे काम एव्हिएन आयईएल इन्फ्रास्ट्रक्चर संयुक्त उपक्रम या ठेकेदाराकडे आहे. हा ठेकेदार आमदार महेंद्र दळवी यांचा माणूस असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे ठेकेदाराला हाताशी धरुन खोटा पैसा लाटण्याचे काम याठिकाणी झाले असल्याचा आरोप सुरेंद्र म्हात्रे यांनी केला आहे.

चौल ते वायशेत हद्दीत कोणतीही पाईपलाईन टाकण्यात आलेली नाही. साठवण टाक्या उभारण्यात आलेल्या दिसत नाहीत, वितरण व्यवस्था उभारलेली नाही. तरीही मोजमाप पुस्तिकेत मोठ्या प्रमाणावर काम पूर्ण दाखवून त्यावर आधारित देयके अदा झाली आहेत. पूर्णत्व प्रमाणपत्रात ''काम पूर्ण व जागा स्वच्छ'' असा उल्लेख आहे. प्रत्यक्षात कोणतेही काम झालेले नसताना १४ कोटी कोणत्या कामाचे काढण्यात आले, याचे उत्तर आमदारांनी द्यावे, असेही सुरेंद्र म्हात्रे यांनी ठणकावले.

**माहिती अधिकारातून माहिती उघड**

माहिती अधिकारातून समोर आलेल्या नोंदींमुळे या योजनेतील विसंगती उघड झाली आहे. त्यामुळे या संपूर्ण कामाची प्रत्यक्ष मोजणी, स्वतंत्र आर्थिक लेखापरीक्षण आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.

## जिल्ह्यात आज मतदान

एकूण ५०२ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात जिल्हा परिषदेचे १७३ व पंचायत समितीचे ३२९ उमेदवार आहेत. गुरुवारी रात्री प्रचार सभा संपल्यानंतर आता सर्वांचे लक्ष मतदानाकडे लागले आहे.

मतदान शनिवारी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत होणार आहे. १७ लाख ३८१ मतदारांमध्ये ८ लाख ५७ हजार नऊ महिला, ८ आठ ४६ हजार ३४७ पुरुष व इतर २५ मतदारांचा समावेश आहे. जिल्ह्यातील २ हजार ३२३ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून, नेमणूक केलेले कर्मचारी सकाळपासून केंद्रांकडे रवाना झाले आहेत. प्रत्येक केंद्रावर पोलिसांसह सहा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कर्मचारी व साहित्य वाहतुकीसाठी एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. मेडिकल किट व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वीस हजारांहून अधिक कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणुकीसाठी सुमारे साडेआठ हजार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे उपलब्ध असून, त्यामध्ये दोन हजार ५०० कंट्रोल युनिट व पाच हजार ९५० बॅलेट युनिट मशीनचा समावेश आहे.

१८५ एसटी बसेसचा वापर

कर्मचारी व साहित्य वाहतुकीसाठी दोन दिवसांत रायगड जिल्ह्यातून १८५ एसटी बसेसचा वापर करण्यात येत आहे. सहा फेब्रुवारीला केंद्रांवर कर्मचारी पोहोचवण्यासाठी आणि सात फेब्रुवारीला मतदानानंतर परत आणण्यासाठी बसची मदत घेतली जात आहे. अलिबाग आगारातून ३२, महाड ३०, पेण ३०, श्रीवर्धन २०, कर्जत ९, रोहा ३०, मुरुड ११, माणगाव २३ बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे काही नियमित फेऱ्या रद्द होण्याची शक्यता असून, प्रवाशांना त्रास होऊ शकतो. पर्यायी व्यवस्था करण्यात आल्याची माहिती विभाग नियंत्रक कार्यालयाने दिली आहे. शाळा बंद असल्याने शालेय फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत.

भयमुक्त वातावरणात मतदान करा

मतदान शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्ह्यात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. दोन हजारांहून अधिक सुरक्षा कर्मचारी तैनात आहेत. पोलीस अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड व सीआयएसएफ जवानांची नियुक्ती करण्यात आली आहे. नागरिकांनी भयमुक्त वातावरणात मतदान करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी केले.

**जि.प., पं.स. मतदार संख्येवर दृष्टीक्षेप**

| तालुके | जि.प.गट | पं.स.गण | मतदार | केंद्र |
|---|---|---|---|---|
| पनवेल | ८ | १६ | २,७९,७७६ | ३४६ |
| कर्जत | ६ | १२ | १,७०,७०२ | २२० |
| खालापूर | ४ | ८ | १,१०,९८२ | १४४ |
| सुधागड | २ | ४ | ५३,९९८ | ७५ |
| पेण | ५ | १० | १,३९,४७९ | १९० |
| उरण | ४ | ८ | १,०८,५२० | १३५ |
| अलिबाग | ७ | १४ | २,०१,९२३ | २६१ |
| मुरुड | २ | ४ | ५५,५५२ | ८१ |
| रोहा | ४ | ८ | १,२८,७६३ | १९४ |
| तळा | २ | ४ | ३२,१२२ | ५२ |
| माणगाव | ४ | ८ | १,३९,५१९ | २०६ |
| म्हसळा | २ | ४ | ४३,५३१ | ६९ |
| श्रीवर्धन | २ | ४ | ५६,८२६ | ८० |
| महाड | ५ | १० | १,३९४४६ | २०३ |
| पोलादपूर | २ | ४ | ३९,२४२ | ६७ |
| **एकूण** | **५९** | **११८** | **१७,००,३८१** | **२३२३** |

## उरणमध्ये ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार उघड

तपासणीमुळे संबंधित अधिकारीवर्गात मोठी खळबळ उडाली आहे.

या तपासणीवेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे, गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील, विस्तार अधिकारी विनोद मिंडे, सरपंच अजय म्हात्रे, करंजा पोर्टचे प्रतिनिधी हसमुख शहा तसेच ग्रामपंचायत अधिकारी सुधीर चव्हाण उपस्थित होते.

तपासणीदरम्यान चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील करंजा इन्फ्रा व मच्छिमार बंदराकडून सन २०१९ पासून ग्रामपंचायतीला कोणत्याही प्रकारचा कर मिळालेला नसल्याची गंभीर बाब समोर आल्याची माहिती मिळाली. वर्षानुवर्षे कर न वसूल होणे ही बाब साध्या निष्काळजीपणापलीकडील असून आर्थिक गैरव्यवहाराची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर थकीत कर वसुलीसंदर्भात लवकरच ठोस कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, काही ग्रामस्थांनी करंजा इन्फ्रामधून बेकायदेशीर कोळसा वाहतुकीबाबतही आरोप केले आहेत. कंपनी दिवाळखोरीत गेल्याचे सांगितले जात असले तरी त्यातून ग्रामपंचायतीचा कर माफ होत नाही, असे स्थानिक जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे या व्यवहाराची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर, उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस दिनेश म्हात्रे यांच्यासह काही ग्रामस्थांनी यापूर्वीही लेखी तक्रारी दिल्या होत्या. मात्र त्यावर ठोस कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. तसेच, उरण पंचायत समिती व जिल्हा प्रशासनातील काही अधिकारी भ्रष्टाचारात गुंतलेल्या अधिकाऱ्यांची पाठराखण करत असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## संजय जांभळे लढवय्ये उमेदवार : जयंत पाटील

काँग्रेस तालुकाध्यक्ष अशोक मोकल, शेकाप चिटणीस महेंद्र ठाकूर, दादर गटाचे उमेदवार व शेकाप पेण तालुका चिटणीस प्रल्हाद दिनेश पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते दिपक पाटील, शेकाप माजी सभापती सुनंदा म्हात्रे तसेच शेकाप, काँग्रेस, शिवसेना महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार भाई जगताप यांनी भाजप सरकारच्या धोरणांवर टीका करताना पंचायत राज व्यवस्थेतून नागरिकांना मिळालेले अधिकार हे संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून आले असल्याचे सांगितले. काँग्रेस व शेकापने पूर्वी केलेल्या जनआंदोलनांमुळे शेतकरी, कष्टकरी, कामगारांना न्याय मिळाला. इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली पंचायत राज व्यवस्था सक्षम झाली; मात्र सध्याचे सरकार ती व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कणखर नेतृत्व आवश्यक असून संजय जांभळे, वैभव म्हात्रे आणि ललिता निलेश म्हात्रे यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. शेकाप पेण तालुका प्रमुख नेते अतुल म्हात्रे यांनी रोजगार मेळावे, महिला बचत गटांसाठी उपक्रम आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. काँग्रेसचे अशोक मोकल यांनी भाजप नेत्यांवर खोटे बोलून जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप करत टीका केली. एकूणच, शेकाप, काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या या प्रचारसभेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले असून, ती उमेदवारांसाठी लाभदायक ठरणार असल्याची चर्चा आहे.

## भारत विश्वविजेता!

३११ धावांवर संपुष्टात आला. इंग्लंडविरुद्ध अंतिम सामन्यात विश्वचषक जिंकण्याची ही भारताची दुसरी वेळ ठरली. याआधी २०२२ मध्ये भारताने इंग्लंडला पराभूत करत किताब जिंकला होता.

# लायन्स क्लबच्या महोत्सवाला खोपोलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरातील लघुउद्योग,घरगुती उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी लायन्स क्लब ऑफ खोपोलीच्या वतीने दोन दिवसाचा महोत्सव आयोजित केला आहे. शुक्रवार, दि.५ फेब्रुवारी रोजी महोत्सवाचे उद्घाटन एचपी अधेसिव्हस लिमिटेड कंपनीच्या डायरेक्ट अंजना मोठवाणी, खोपोली नगरपालिकेचे नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटनानंतर रात्री १० वाजेपर्यंत बहुसंख्यक लोकांनी महोत्सवाला भेट दिली आहे.

लायन्स गार्डनच्या भव्य पटांगणात भव्यदिव्य महोत्सव दि.५ ते ७ फेब्रुवारी रोजी तीन दिवसीय आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात फुलझाडे, कपड्याचे, बिल्डर पाविलियन, इलेक्ट्रिक स्कूटर्स, इम्मिटेशन ज्वेलरी, कपडे, इंटेरियर डेकोरेशन, लेझर कटर, इंजिनिअरिंग प्रॉडक्ट्स, विवध खाद्य पदार्थ, सौंदर्यप्रदान, एकूण ८० ते ९० स्टॉल लावण्यात आले आहे. लहान मुलांसाठी खेळणी आणि मनोरंजनासाठी ऑंक्रेस्ट्रा ठेवण्यात आले आहे. तसेच नेक्सा, हुंडाई, आयसुझुका कंपनीच्या आकर्षक कारमध्ये मोठी सवलत मिळणार आहे. लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे.

माध्यमिक विद्यालय वाघोशी, ता. सुधागड येथील सक्षम गायकवाड, युवराज सागळे, सूरज वाघमारे यांनी मोफत सायकल वाटप करण्यात आले. खोपोली शहरातील लघुउद्योग, घरगुती उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी लायन्स क्लबने महोत्सवाचे आयोजन केले आहे. महोत्सवातून मिळणारा नफा डायलिसिस सेंटर देणार असल्याची माहिती लायन्स क्लबचे सचिन बोराणा यांनी बोलताना सांगितले आहे.

# चणेरा विभागातून शेकापचा विजय निश्चित

■ घोसाळे मतदारसंघात इतिहासाची पुनरावृत्ती होणार

■ सुशिक्षित डॉक्टर उमेदवाराला जनतेची पसंती



। चणेरा । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणूक चुरशीची ठरत असली तरी चणेरा विभागातून शेतकरी कामगार पक्षाचा (शेकाप) विजय निश्चित असून घोसाळे मतदारसंघात पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती होणार आहे, असा ठाम दावा शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केला. चणेरा विभागातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी झालेल्या सभेत त्या बोलत होत्या.

चित्रलेखा पाटील म्हणाल्या, तत्पर सेवेकर आम्ही, पाटील प्रभाकर या उक्तीप्रमाणे आमचा उमेद्वार हा सुशिक्षित, पात्र आणि डॉक्टर असलेली तरुणी आहे. ती सर्वसामान्य जनतेच्या आरोग्य, शिक्षण व मूलभूत प्रश्नांसाठी सातत्याने काम करणार आहे. चणेरा हा शेकापचा बालेकिल्ला असून येथील मतदारांनी नेहमीच विश्वास टाकला आहे. यावेळीही प्रचंड मताधिक्याने विजय आमचाच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या दहा वर्षांत विकासाचा जो खंड पडला आहे, तो भरून काढण्यासाठी शेकाप कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लोकांना केवळ घोषणांपेक्षा प्रत्यक्ष काम करणारे नेतृत्व हवे आहे. त्यामुळेच डॉक्टरेट पदवीधर, सुशिक्षित उमेदवार जनतेसमोर उभा केला असून याला युवकांसह पारंपरिक मतदारांचा देखील भक्कम पाठिंबा मिळत आहे, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, सत्ताधारी महायुतीमध्येच अंतर्गत फूट पडलेली असून शिंदे गटातील वाद तसेच एकूणच राजकीय अस्थिरता स्पष्टपणे दिसून येत आहे. या गोंधळाचा थेट फायदा शेकापला होणार असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

याशिवाय ‘ताईची सावली’ या योजनेअंतर्गत पडझड झालेल्या सुमारे दोन हजार घरांना अनुदान देऊन सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. चणेरा विभागात ॲग्रो फॅक्टरी उभारण्याचा संकल्पही त्यांनी जाहीर केला.

एमआयडीसीच्या नावाखाली भूमिपुत्रांची फसवणूक होत असून अत्यल्प दरात जमिनी घेतल्या जात असल्याचा आरोप करत चित्रलेखा पाटील यांनी एमआयडीसीतील पाण्याच्या बिलांचा घोटाळा लवकरच उघडकीस आणणार असल्याचा इशाराही दिला.

राजकारणात वाढत चाललेली फसवणूक आणि संघर्ष पाहता जनतेला प्रामाणिक, काम करणारे नेतृत्व हवे आहे. त्यामुळेच ४२ घोसाळे जिल्हा परीषद गटातून डॉ. वैष्णवी ठाकूर, ८४ घोसाळे पंचायत समीती गणातून शंकर दिवकर व ८३ न्हावे पंचायत समिती गणातून रुपाली मढवी उमेद्वार असून यावेळी शेतकरी कामगार पक्षाला भरघोस यश मिळेल, असा ठाम विश्वास चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी आरडीसीसी बँक संचालक गणेश मढवी, मजदूर फेडरेशन चेअरमन हेमंत ठाकूर, कार्यालयीन संदेश विचारे, विविध कार्यकारी सोसायटी अध्यक्ष गोपीनाथ गंभे, उपाध्यक्ष विकास भायतोंडेल, पुरोगामी युवक संघटनाअध्यक्ष संतोष दिवकर, उपाध्यक्ष अमोल शिंगरे, ॲड. नितेश ठाकूर, महादेव खार सरपंच संकेत जोशी, खैरे खुर्द उपसरपंच जुबेर धनसे, माजी सरपंच न्हावे राजेश्री शाबासकर, आरुणा तांबडे, गिरीष दांडेकर, गणेश वाघीलकर, रूपेश ठाकूर, मयंक ठाकूर, गौरव मढवी, अर्पणा मढवी यांच्यासह विभागातीलपदाधिकारी, कार्यकर्त व ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थीत होते.

> “रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शेकापने नेहमीच तळागाळातील जनतेसाठी काम केले आहे. शिक्षण क्षेत्रात मोठी क्रांती घडवण्याचा पक्षाचा मानस असून यापूर्वी हजार सायकलींचे वाटप करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात तीन ते पाच हजार विद्यार्थ्यांना सायकली देण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.”
>
> –चित्रलेखा पाटील, शेकाप प्रवक्त्या

## नि|व|ड|क



### मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज

**पनवेल :** आज होणाऱ्या रायगड जिल्हा परिषद व पनवेल पंचायत समितीच्या २०२६ सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. पनवेल येथील वि. ख. हायस्कूल येथून निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ईव्हीएम मशिन्स आपापल्या मतदान केंद्रांकडे रवाना केल्या. ईव्हीएम मशिन्स वाहतुकी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली होती. प्रत्येक वाहनास पोलीस बंदोबस्त देण्यात आला असून संपूर्ण प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडली. दरम्यान, निवडणूक आचारसंहितेअंतर्गत एका बाजूला शहर व ग्रामीण भागात भोंगे लावण्याची कारवाई सुरू असून परवानगीविना लावलेले भोंगे व प्रचार साहित्य हटवण्याची मोहीम प्रशासनाकडून राबविण्यात येत आहे.निवडणूक प्रक्रिया भयमुक्त, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनासह पोलीस विभाग पूर्ण सज्ज असल्याचे चित्र पनवेलमध्ये पाहायला मिळत आहे.




### निवडणूक साहित्य मतदान केंद्राकडे रवाना

**नेरळ :** कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती साठी मतदान प्रक्रियेची सर्व तयारी निवडणूक यंत्रणा यांनी पूर्ण केली आहे. तालुक्यातील २२० मतदान केंद्रावर मतदान होणार असून एक लाख ७० हजार हून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. दरम्यान, निवडणुकीसाठी सर्व साहित्य मतदान केंद्रांवर पोहचले असून पोलीस मैदान येथे सर्व साहित्याचे वितरण करण्यात आले. तालुक्यात जिपरिषदेचे सहा गट असून गटांमधील पंचायत समितीच्या १२ गण यांच्यासाठी मतदान होत आहे. मतदानासाठी बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट हे मतदान यंत्र तसेच अन्य साहित्य यांचे वितरण कर्जत प्रशासकीय भवन येथील पोलीस मैदा येथे झाले. तालुक्यात २२० मतदान केंद्र असून त्यासाठी आवश्यक असलेले मतदान साहित्य यांचे वितरण निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली वितरित करण्यात आले. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ धनंजय जाधव, तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते.२२० मतदान केंद्रासाठी मतदान केंद्र अध्यक्ष, तीन सहायक, एक शिपाई, एक सुरक्षा रक्षकांनी ही साहित्य वितरित करण्यात आले. हे साहित्य मतदान केंद्र येथे सुरक्षितपणे पोहचवण्यासाठी ३० बसेस, नऊ एसटी गाड्या,२० जीप गाड्या,२९ झोनल अधिकारी वाहने,तसेच सेक्टर अधिकारी यांची २० वाहने तैनात असणार आहेत. साधारण १४०० अधिकारी कर्मचारी वर्ग या मतदान प्रक्रियेत सहभागी होणार आहे.

# म्हसळ्यात ६९ केंद्रावर मतदान



। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातील २ जि. प. आणि ४ पंचायत समिती गणासाठी आज मतदान होत आहे. त्यासाठी निवडणूक निर्वाचन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील एकूण ६९ मतदान केंद्रावर प्रशासन सज्ज ठेवण्यात आले आहे. त्यामध्ये ५० पोलीस, ७३ होमगार्ड, ४ पोलीस अधिकारी, १५ झोनसाठी १५ झोनल अधिकारी आणि ४०० कर्मचारी आज सकाळी नऊ वाजल्यापासून केंद्रावर मतदान साहित्यासह रवाना झाले. त्याचप्रमाणे तहसीलदार सचिन खाडे यांच्या मार्गदर्शखाली १०० कर्मचारी गेले एक महिना अहोरात्र काम करीत आहेत. तालुक्यातील एकूण ४३५३१ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. प्रशासनाकदून मतदानाची तयारी पूर्ण करण्यात आली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# तळ्यात ३२,१२२ हजार मतदार

। तळा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी आज मतदान पार पडणार असून सुरळीत निवडणूक प्रक्रिया पार पडावी यासाठी तळा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी तळा तालुक्यातील एकूण ३२१२२ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. ज्यामध्ये १५८९५ पुरुष मतदार व १६२२७ महिला मतदारांचा समावेश आहे. तालुक्यातील ५२ ठिकाणी मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.

# मुख्य निवडणूक आयुक्तांची स्ट्रॉंग रूमला भेट

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक–२०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शनिवारी (दि.०७) रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठीची सर्व तयारी पूर्ण झाल्याने मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज अलिबाग तालुक्यातील विविध मतदान केंद्रांसह मतमोजणी केंद्राची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला.



मुख्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी राजिप शाळा झिराड, वरसोली, सेंट मेरी हाय स्कूल मतदान केंद्रे तसेच नेहुली येथील मतमोजणी केंद्र, साहित्य वितरण केंद्र, स्ट्रॉंग रूमची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आँचल दलाल, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रविंद्र शेळके, अलिबाग निवडणूक निर्णय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मतदान प्रक्रियेसाठी यंत्रणा पूर्णतः सज्ज असून प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्रांवर पिण्याचे पाणी, दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हील चेअर, प्रथमोपचार किट, पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी बैठक व्यवस्था आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व तांत्रिक बाबींचीही पूर्तता करण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# महाविकास आघाडीशिवाय पर्याय नाही



■ भूमिपुत्रांसाठी फक्त आघाडी

। उरण । प्रतिनिधी ।

भूमिपुत्र जगला पाहिजे, भूमिपुत्र वाचला पाहिजे, तर एकच गोष्ट लक्षात ठेवा. महाविकास आघाडीशिवाय पर्याय नाही. भाजप हा भूमिपुत्रांचा, स्थानिकांचा अपमान करणारा पक्ष आहे. त्यांच्या बुडाला आग लावायची असेल तर मशाली शिवाय पर्याय नाही असे रोखठोक विचार शिवसेनेच्या उपनेत्या ज्योती ठाकरे यांनी व्यक्त केले.

नवघर जिल्हा परिषद गटाचे उमेदवार प्रेरणा कुणाल पाटील, भेंडखळ पंचायत गणाचे उमेदवार दीपक भोईर, नवघर गणाचे उमेदवार परेश ठाकूर यांच्या प्रचारार्थ प्रचार सभा गुरुवारी (दि.५) फेब्रुवारी रोजी भेंडखळ येथील विठ्ठल रखुमाईच्या पटांगणात आयोजित केले होते. त्यावेळी ज्योती ठाकरे बोलत होत्या.

भूमिपुत्रांच्या विषयी बोलणारी, नेतृत्व कमी करण्याची, खालसा करण्याचे त्यांचे नियोजन आहे. त्याला आपण बळी पडू. आणि ते बळी पडायचे नसेल तर आपला आवाज असा भूमिपुत्रांचा ही नगरी आमची आहे. हा आवाज आमचा आहे. आणि न्याय व हक्क हे भूमिपुत्रांना मिळायलाच पाहिजे. हे जर करायचे असेल तर या वेळेला मशालीचाच विचार करावा लागेल.

महाविकास आघाडीवर शंभर टक्के प्रेम करणारे आपले नातेवाईक, आप्त स्वकीय आहेत. त्यांच्यापर्यंत महाविकास आघाडीचे विचार पोहोचवा. विजय खेचून आणत असताना, बालदी खोपवून पालथी केली. अशा पद्धतीने पलटी केली. की ती परत उभी राहू शकणार नाही. आणि परत जर तिने उभी राहण्याचा प्रयत्न केला. तर मात्र आगरी कोळ्यांची आमच्या भूमिपुत्रांची जात काय आहे. हे दाखवून देऊ. धोबीपछाड केल्याशिवाय राहणार नाही. ही निवडणूक २०२९ ची नांदी आहे. सात तारखेला निवडणूक होईल. नऊ तारखेला मतमोजणी आहे. नऊ तारखेचा गुलाल हा फक्त आणि फक्त महाविकास आघाडीचाच राहील असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी माजी आ. मनोहर भोईर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, नगराध्यक्षा भावना घाणेकर, नरेश राहळकर, शेकापचे चिटणीस रवी घरत, नरेश म्हात्रे, दीपक भोईर, बळीराम ठाकूर, यशवंत ठाकूर, मधुकर ठाकूर, मनोहर पाटील, विजय ठाकूर, कुणाल पाटील, शितल ठाकूर, लक्ष्मण ठाकूर, सूर्यकांत ठाकूर, मधुकर भोईर, अमितदादा, अजित ठाकूर, सोनाली, शितल, राकेश भोईर, सोनाली ठाकूर, सुरेश भोईर, मच्छिंद्र घरत तसेच अन्य मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘वेळप्रसंगी धावून येणाऱ्या उमेदवारांना निवडून द्या’

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

गाव अथवा स्थानिक पातळीवर रात्री अपरात्री अनेकदा कठीण प्रसंग समोर उभे राहतात अशा प्रसंगी मोठ्या नेत्यांपर्यंत पोहोचण्यासाठी अथवा स्थानिक पातळीवरील विकास कामे करण्यासाठी बाहेरील उमेदवारापेक्षा आपल्या हाकेला धावून येणार्या स्थानिक उमेदवारांनाच निवडून द्या असे आवाहन बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी नांदगावमध्ये बोलताना केले.



रायगड जिल्हा परिषद व मुरुड तालुका पंचायत समितीच्या निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस,काँग्रेस ,उबाठा आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराची सांगता गुरुवारी सायंकाळी त्यांच्या या सभेने झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. रा.जि परिषद ३८ राजपूरी मतदार संघातून आघाडीतर्फे राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित कासार व मुरुड पंचायत समिती ७५ नांदगाव मतदार संघातून आघाडीतर्फे काँग्रेसचे अस्लम हुसेन हलडे तसेच मुरुड पंचायत समिती ७६ राजपूरी मतदार संघातून आघाडीतर्फे शेतकरी कामगार पक्षाच्या सुनिता कृष्णा वाघमारे हे निवडणूक रिंगणात आहेत.

मतदार संघात आम्ही ज्यांच्याशी आघाडी केली आहे ते सर्व पक्ष सर्वधर्म समभाव मानणारे आहेत. आम्ही विकासाच्या मुद्यावर एकत्रीतपणे ही निवडणूक लढवित आहोत. तिनही उमेदवार स्थानिक आहेत बाहेरील नाहीत त्यांना गावचे प्रश्न, समस्या माहीत असून तळागाळातील लोकांच्यासोबत काम करणारे आहेत. गावच्या विकासासाठी हक्काने काम करुन घेता येईल अशा आमच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

याप्रसंगी इस्माईल घोले, मनोज भगत, सेजल घुमकर, संजय गुंजाळ, प्रतिमा चौलकर, प्रमिला माळी, प्रांजली मकू, मंजुम घोले, वैशाली रणदिवे, नम्रता कासार, नितेश रावजी, शामल रावजी, प्रीतम पाटील, इरफान हलडे, योगेश पाटील, सुरक्षा पाटील आदींसह अनेक महिला, कार्यकर्ते मतदार उपस्थित होते.

# रोह्यात १९४ मतदान केंद्र

। धाटाव । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यात राजिप ४ आणि पंचायत समितीच्या ८ जागांसाठी मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक यंत्रणेची मतदानाची तयारी पूर्ण झाली आहे. रोहा तालुक्यात १९४ मतदान केंद्र असून साधारण १ लाख २५ हजार ७६३ मतदार तालुक्याच्या ग्रामीण भागातुन मतदानाचा हक्क बजावणार आहेत. दरम्यान, निवडणुक काळात कायदा सुव्यवस्था यांचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणा देखील सज्ज झाली आहे.

तालुक्यात नागोठणे, आंबेवाडी, भुवनेश्वर‘ घोसाळे हे ४ गट तर पंचायत समितीचे ८ गण असून यामध्ये नागोठणे सुककेळी, कोलाड, आंबेवाडी, धाटाव, भुवनेश्वर, न्हावे, घोसाळे असे एकूण ८ गण आहेत. तालुक्यात नागोठणे जिल्हा परिषद गटात ४२ मतदान केंद्र असून पंचायत समितीचे दोन्ही गणामध्ये प्रत्येकी २१ केंद्र आहेत. आंबेवाडी गटामध्ये एकूण ४९ मतदान केंद्र असून येथील कोलाड गणात २८, आंबेवाडी गणात २१ मतदान केंद्र आहेत. भुवनेश्वर गटामध्ये ४३ मतदान केंद्र असून धाटाव गणामध्ये २० तर भुवनेश्वर गणांमध्ये २३ मतदान केंद्र आहेत. घोसाळे जि.प गटामध्ये ६० मतदान केंद्र असून न्हावे गणामध्ये २८ तर घोसाळे गणामध्ये सर्वाधिक ३२ मतदान केंद्र आहेत.

नेत्रदान, देहदानासाठी सभासदांची जागृती | इवलेसे रोप लावियले दारी त्याचा वेलू गेला गगनावरी

# आरसीएफ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची भरारी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

थळमधील आरसीएफच्या रवींद्र वर्तक, श्रीनिवास पाटील, शरद देशमुख आणि विष्णू बापट या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी कै. अनंतराव कुलकर्णी (आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी) यांच्या प्रेरणेने स्थापन केलेल्या आरसीएफ एक्स एम्प्लॉईज सोशल फोरमने आता दहा वर्षे पूर्ण होऊन अकराव्या वर्षांमध्ये पदार्पण केले आहे. चार जणांनी लावलेल्या या लहानशा रोपाचा वेलू आता गगनावरती गेला आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. फक्त चार–पाच जणांनी सुरुवात केलेल्या या फोरमचे आता एक हजारच्या वर सभासद झाले आहेत. इवलेसे रोप लावियले दारी त्याचा वेलू गेला गगनावरी अशा प्रकारचे काम या फोरमचे आहे. निवृत्त झालो, पण थकलो नाही, हे ब्रिद वाक्य घेऊन फोरम काम करीत आहे.

एक जुलै २०१५ रोजी ‘डॉक्टर डे’ साजरा करण्याच्या निमित्ताने एकत्र आलेल्या या मंडळींनी त्याच दिवशी आरसीएफ एक्स एम्प्लॉइज सोशल फोरम, थळची स्थापना केली. सर्व सेवानिवृत्त एम्प्लॉईजनी एकत्र यावे, एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण व्हावी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना लागणाऱ्या सर्व प्रकारच्या गरजा व येणाऱ्या अडचणी जास्तीत जास्त सोडवण्यास मदत म्हणून काम करावे. समाजकार्य करावे हा या मागचा उद्देश आहे.




या मंडळींची पहिली सभा संकष्टी चतुर्थीला कुरुळ येथील आरसीएफ वसाहतीमधील गणपतीच्या मंदिरात झाली. त्यानंतर गेली अकरा वर्षे करोना काळ सोडला तर सातत्याने प्रत्येक संकष्टी चतुर्थीला ही सभा होत आहे. कोणालाही यासाठी खास आमंत्रण नसते. सर्वजण संकष्टी चतुर्थीच्या दिवशी सकाळी दहा वाजता, गणेश मंदिरात आवर्जून एकत्र येतात. यातून जून्या मित्रांचीदेखील भेट होते. एकमेकांसोबत गप्पा गोष्टी होत केली जाते. या सभेची सुरुवात राष्ट्रगीने केली जाते. त्यानंतर भारत माता की जय असा जयघोष केला जातो. यामुळे सभासदांच्या मनात राष्ट्र अभिमान निर्माण होतो. आणि त्यानंतर मित्रांचे वाढदिवस, दिवंगताना श्रध्दांजली, आदी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करून डॉक्टरांकडून मार्गदर्शन घेतले जाते. हाडांची घनता मोजणे, डोळ्यांची आतील पटलाची तपासणी करणे, प्रोस्टेट ग्लँडची तपासणी, मानसिक आरोग्य कसे राखावे, सायबर फ्रॉड पासून कसा बचाव करावा असे अनेक उपक्रम घेतले जातात. ग्रीन एनर्जीचा उपयोग व्हावा म्हणून फोरमतर्फे १०५ सभासदांनी सोलर सिस्टम लावून घेतली आहे. आर्थिक गुंतवणूक आदी विषयावर मार्गदर्शन घेतले आहे. या सर्व कार्यासाठी डॉ. जी. टी पाटील यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळते. सर्व कार्यक्रमाचे नियोजन तसेच अंमलबजावणीसाठी २४ जणांची कोअर कमिटी फोरम च्या माध्यमातून एकत्रितपणे व उत्साहाने काम करीत असते.

### सामाजिक बांधिलकी जपली जाते

**सामाजिक भान ठेऊन वृद्धाश्रमात जाऊन येथील वृद्धांची मेडिकल तपासणी करून त्यांना औषध पुरवणे, मतिमंद मुलांकडून फुले किंवा कागदी पिशव्या विकत घेणे. त्यांना कागदी पिशव्या बनवण्यासाठी वर्तमानपत्राची रद्दी भेट म्हणून देणे,आर्थिक मदत करणे, इत्यादी समाजोपयोगी कार्य सुद्धा फोरमच्या माध्यमातून केले जात आहेत. नेत्रदानासाठी व देहदान करण्यासाठी सभासदांना जागृत करण्याचे काम फोरमद्वारे केले जाते.**

# विकासच विकास!!

काही दिवसांपूर्वी धुक्यामुळे रस्ता न दिसल्याने ऐन दिल्लीत एक युवक मरण पावला. त्याची गाडी एका पाण्याने भरलेल्या मोठ्या खड्ड्यात बुडाली. त्याला वाचवण्यासाठी देशाच्या राजधानीत एकही आपत्कालीन यंत्रणा मदत करू शकली नाही. दोन तास तो मदतीसाठी आक्रोश करीत होता. शेवटी वडिलांच्या डोळ्यादेखत त्या युवकाचा बुडून मृत्यू झाला. गेल्या चार-पाच दिवसात तसाच प्रकार घडला. लोकांचे दैव बलवत्तर म्हणूनच इथे कोणाचा बळी गेला नाही. पण हा बळी, किंवा खरे तर हे बळी, गेले असते तरीही जनतेला मदत करण्यासाठी तिथे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही हे काल-परवाच्या वाहतूक कोंडीतून स्पष्ट झाले आहे.निव्वळ रस्त्यांची आणि इमारतींची बांधकामे काढणे म्हणजे विकास अशी आपल्या सरकारच्या विकासाची कल्पना झालेली आहे. त्याने ती लोकांच्याही गळी उतरवलेली आहे. म्हणूनच बहुसंख्य लोक सतत या नालायक संकल्पनेला व तिच्या निर्मात्यांना मते देत राहतात. मुंबई-पुणेदरम्यानच्या खंडाळा घाटात डोंगर फोडून वाट्टेल तसे रस्ते, पूल काढणे हा एकच उद्योग या सरकारने चालवला आहे. परवा झाला तसा एखादा अपघात झाला तर पर्यायी रस्ते करून ठेवायला हवेत याचा विचारही या धोरणकर्त्यांनी केलेला नाही. कंत्राटदारांची धन करणे आणि त्यात स्वतःचा हिस्सा काढून घेणे हाच यांचा एककलमी कार्यक्रम आहे. दुसरे टोलवाले. मुंबई-पुणे रस्त्याचा टोल आयआरबी कंपनीकडे आहे. या रस्त्याचा खर्च वसूल होऊनही कित्येक वर्षे झाली. तरीही टोलवसुली चालूच आहे. उलट टोल वाढतो आहे. रस्त्याची अवस्था मात्र दिवसेंदिवस वाईट होते आहे. शिवाय, प्रवासात लोक जर अडकून पडले तर त्यांना पाणी, टॉयलेट किंवा अन्य सुविधा देण्याची जबाबदारी कोणाचीही नाही. परवा सुमारे ४० तास हा रस्ता ठप्प होता. या काळात वसूल केलेला टोल आयआरबीने सर्व वाहनचालकांना परत करायला हवा. शिवाय, लोकांना झालेल्या त्रासाबद्दल आयआरबीला जबर दंड ठोठावला जायला हवा. विकासाच्या बाता मारणारे फडणवीस, शिंदे आणि मंडळी हे धाडस दाखवू शकतील का हा प्रश्न बारा कोटी मराठी जनता विचारते आहे.

## अक्षम्य दिरंगाई

खंडाळ्याच्या घाटात ऐन बोगद्याच्या तोंडाशी प्रोपेलिनचा टँकर उलटल्याने हा प्रकार घडला. हा वायू तात्काळ पेट घेणारा असल्याने लोकांच्या जिवाला धोका होता. त्यामुळे वाहतूक बंद ठेवली गेली हे समजण्यासारखे आहे. पण हा टँकर तिथून हलवण्यात जी दिरंगाई झाली ती अक्षम्य आहे. हा टँकर हलवताना स्फोट होण्याची शक्यता होती असे कारण त्यासाठी दिले जात आहे. शेवटी या टँकरमधील वायू दुसऱ्या टँकरमध्ये भरण्यात आला व ४० तासांनंतर लोकांची सुटका झाली. हा सर्व घटनाक्रम वाचल्यानंतर या घाटातील वाहतूक अक्षरशः रामभरोसे चालू आहे आणि सर्व परिसर ज्वालामुखीच्या तोंडावर वसलेला आहे हे लक्षात येईल. कारण, प्रोपेलिन किंवा त्याहूनही भयंकर अशा वायू आणि रसायने यांची वाहतूक करणारे ट्रक, टँकर इत्यादी या रस्त्यावरून विनाअटकाव चोवीस तास धावत असतात. त्यापैकी कोणालाही काही अपघात झाला तर तो निस्तरण्यासाठी सरकारकडे कोणतीही यंत्रणा नाही. पोलिस, अग्निशामक दल इत्यादीदरम्यान कोणताही संपर्क नाही. अपघातानंतरचे मदत व बचाव कार्य नेमके कोणी करावे याबाबत या यंत्रणांमध्ये स्पष्टता नाही. आज लोकांचे जीव वाचले यातच लोक आणि त्यांचे सरकार खूष आहे. उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले गेले आहेत. पण या चौकशीला पुढची दोन-चार वर्षे मुदतवाढ दिली जाऊ शकते. शिवाय, ही चौकशी करणार कोण तर तेच नोकरशाहीतले बाबू लोक आणि इंजिनिअर, ज्यांनी आजवर बिल्डर माफियांच्या हातात हात घालून जनतेला लुटले आहे. त्यांच्या पापांवर कायमच पांघरुणे घातली आहेत आणि या माफियांना त्यांच्या सोईने हवे तसे प्रकल्प उभारू दिले आहेत. चुकीचा रस्ता बांधला किंवा अशी कोंडी झाली म्हणून आजवर एकाही बिल्डरला शिक्षा झालेली नाही. मध्यंतरी रस्त्यावरच्या खड्ड्यांमध्ये पडून कोण्या वाहनचालकांचा जीव गेला तर त्याला संबंधित कंत्राटदाराला जबाबदार धरावे असा आदेश उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर किती जणांना दोषी धरण्यात आले हा संशोधनाचा विषय ठरावा.

## पर्यायी रस्ते नाहीत

टँकर अपघातानंतर दोन्ही बाजूची वाहतूक रोखण्यात आली व २० ते २५ किलोमीटर अंतरापर्यंतच्या रांगा लागल्या. यात लोकांना मागेही फिरता येईना वा महामार्ग सोडून दुसऱ्या रस्त्यालाही जाता येईना. सर्व बाजूंनी बंदिस्त अशा खोलीत कोंडून मरण्याचा अनुभव हजारो प्रवाशांनी घेतला. सुदैवाने यातले कोणीही प्रत्यक्ष मेले नसले तरी या प्रवाशांना एकाच जागी बसून ताटकळत बसून राहावे लागणे हे भीषण होते. वाहतूक कोंडी कधी दूर होईल याची धड सूचनाही कोणाकडेच नव्हती. नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे तर मस्तपैकी प्रचारात दंग होते. फडणवीसांना राहुल गांधींवर टीका करायला वेळ होता. पण या प्रवाशांना दिलासा देण्यासाठी ते उपलब्ध नव्हते. याच फडणवीसांनी लोकांचा विरोध मोडून काढून समृध्दी मार्ग उभारला पण त्यावरही कुठेही निवारा, हॉटेल्स, पेट्रोल पंप किंवा टॉयलेट इत्यादींच्या सोईच नव्हत्या. आणि हे म्हणे आमचे नियोजनकर्ते. मुंबई-पुणे रस्त्याचा वापर करणाऱ्यांमध्ये बहुसंख्य मध्यमवर्गीय असतात. सध्या यातले बहुतेक लोक भाजपच्या जय श्रीरामने भारलेले आहेत. मोदींच्या ते फार प्रेमात असतात. आता इतक्या छळवणुकीनंतर तरी हे लोक आपल्या नेत्यांना जाब विचारतील का?एक्स्प्रेसवे सारखे आलिशान रस्ते बांधताना सर्व्हिस रोड, बाहेर पडायला जागोजाग रस्ते इत्यादींची व्यवस्था करणे आवश्यक असते. शिवाय, पोलिस, अग्निशामक दल, इस्पितळे यांचीही सोय असावी लागते. आयआरबीवाले जो टोल गोळा करतात त्यातून त्यांनी या सोई करणेही अपेक्षित आहे. पण आयआरबी ही भाजपवाल्यांची जावई कंपनी आहे. तिला हात लावण्याचा विचारही फडणवीस आणि मंडळी करू शकणार नाहीत. आज पुणे-मुंबईवर जे घडले आहे तेच उद्या समृध्दी वा शक्तीपीठ रस्त्यांवर होणार आहे. त्याहून नंतर तेच मुंबई व पुण्यासारख्या शहरांमध्येही वेगवेगळ्या रीतीने होणार आहे. आज मुंबईत ३० हून अधिक मजल्याच्या इमारतींना आग लागली तर तिथे पोचणारी शिडी अग्निशामक दलाकडे नाही. त्यामुळे तिथली आग विझणे हे श्रीरामाच्या भरोशावर आहे. पुण्यात हिंजवडीसारख्य आयटी कंपन्यांच्या परिसरात रस्ते इतके दाटीवाटीचे आहेत किंवा ऐन वेळी रुग्णवाहिका पोचू शकणार नाहीत. एक्स्प्रेसवेवर वाहतूक रांगेतून शेवटच्या वाहनापासून उलट्या दिशेने वळवण्याचा पर्याय वापरता आला असता. पण हा किंवा अन्य कोणत्याही पर्यायांचा कल्पक वापर करण्याची अक्कलही प्रशासकीय यंत्रणेने दाखवली नाही. याचे कारण तिच्या ठायी जनतेबाबत काही कळकळ नाही. शिवाय उद्या जगाला आग लागली तरी आपल्यावर काहीही कारवाई होऊ शकत नाही याची पुरेपूर खात्री या यंत्रणेला आहे. फडणवीसांनी निदान आता तरी हे सर्व बदलावे.

विचार

# 'गेमचेंजर' करार

***भारत आणि युरोपीय महासंघामध्ये खुल्या व्यापार करार झाल्यानंतर अमेरिकेला चांगल्याच मिरच्या झोंबल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकामागून एका देशाला अतिरिक्त कर लादत आहेत. भारतावरही त्यांनी पन्नास टक्के आयात शुल्क लादले. म्हणूनच भारताने जगातील अनेक देशांबरोबर करार करण्यासाठी वेगवान पावले उचलली. म्हणूनच हा 'गेम चेंजर' करार अमेरिका, चीनसारख्या देशांना खुपणे स्वाभावीक आहे.***



**शिवाजी कराळे**

भारत-युरोपीय महासंघातील मुक्त व्यापार करार हा दोन अब्ज लोकांच्या बाजारपेठेसाठी आतापर्यंतचा सर्वात महत्त्वाकांक्षी करार आहे. या कराराला 'मदर ऑफ ऑल डील्स' म्हटले जात आहे. भारतासोबतच्या मुक्त व्यापार करारांतर्गत युरोपीय महासंघाने दिलेल्या आयात शुल्क सवलतींमुळे २७ राष्ट्रांच्या गटाला होणारी देशाची निर्यात वाढून देशांतर्गत उत्पादन वाढेल. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताचा युरोपीय महासंघाचा द्विपक्षीय वस्तूंचा व्यापार १३६.५३ अब्ज डॉलर्सचा होता. त्यात ७५.८५ अब्ज डॉलर्सची निर्यात आणि ६०.६८ अब्ज डॉलर्सची आयात होती. यामुळे युरोपीय महासंघ भारताचा सर्वात मोठा वस्तू-व्यापार भागीदार बनला आहे. भारताच्या एकूण निर्यातीपैकी युरोपीय महासंघ बाजारपेठेचा वाटा अंदाजे १७ टक्के आहे तर भारतात युरोपीय महासंघाची निर्यात भारताच्या एकूण परदेशी आयातीपैकी नऊ टक्के आहे. हा करार पुढील वर्षाच्या सुरुवातीला लागू होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय महासंघ हा जगातील सर्वात मोठा आयातदार आहे. 'कराराची जननी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या करारामुळे भारताला महत्त्वपूर्ण फायदे मिळण्याची अपेक्षा आहे. भारतातील जवळजवळ सर्व निर्यात वस्तू २७ युरोपीय देशांमध्ये शून्य किंवा अत्यंत कमी कर दराने प्रवेश करतील. देशातील कृषी उत्पादक, सेवा पुरवठादार आणि औषधनिर्माण आणि कापड उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांना याचा फायदा होईल. यामुळे मोठ्या प्रमाणात नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. तथापि, हा करार अमेरिका आणि चीनच्या आर्थिक गतिमानतेसाठी एक नवीन आव्हान निर्माण करू शकतो.

अमेरिकेने भारतावर अतिरिक्त शुल्क आणि चीनने संवेदनशील वस्तूंवर निर्यात निर्बंध लादून निर्माण केलेला दबाव या करारामुळे निरर्थक ठरण्याची शक्यता आहे. ताज्या करारामुळे स्थिर लोकसंख्या असलेल्या युरोपीय देशांना मोठी बाजारपेठ मिळेल. या करारामुळे युरोपीय संघालाही लक्षणीय फायदा होण्याची अपेक्षा आहे. युरोपीय देश सध्या उच्च महागाई आणि आर्थिक मंदीचा सामना करत आहेत. लोकसंख्यावाढीमध्ये लक्षणीय घट झाल्यामुळे तेथे वस्तूंचा वापर थांबत आहे. या परिस्थितीत युरोपीय कंपन्यांना १.४ अब्ज लोकसंख्या असलेला भारतासारखा देश मित्र म्हणून समोर आला आहे. तो त्यांच्या वस्तूंसाठी एक प्रमुख केंद्र बनू शकतो. यामुळे संपूर्ण युरोपची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. इटली आणि फ्रान्ससारखे देश महागड्या वाइन उत्पादनासाठी जगप्रसिद्ध आहेत. आतापर्यंत भारतात या वाइनच्या विक्रीवर शंभर टक्के किंवा त्याहून अधिक कर आकारला जात होता. तथापि, करारानंतर हे दर सुमारे दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाऊ शकतात. यामुळे भारतातील परदेशी वाइनची विक्री आणि युरोपचा नफा वाढू शकतो. परिणामी, भारतीय वाइनप्रेमींना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या परदेशी वाइन उपलब्ध होतील.

भारतात महागड्या परदेशी वाहनांच्या खरेदीदारांचा मोठा ग्राहकवर्ग आहे. मात्र युरोपीय बनावटीच्या कार खरेदी करण्यासाठी जादा कर लागतात. ते बहुतेकदा वाहनांच्या किमतीइतकेच असतात. त्यामुळे नोंदणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर वाहनाची खरेदी किंमत दुप्पट होते. तथापि, आता भारत-युरोपीय व्यापार करारानंतर हे कर लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे. यामुळे युरोपीय देशांना भारतात उच्च दर्जाच्या कार विकण्याची संधी मिळेल आणि भारतातील नवश्रीमंतांना परवडणाऱ्या किमतीत उच्च दर्जाच्या कार मिळू शकतील. भारतात स्वस्त कामगार उपलब्ध होतील, रोजगार वाढेल. अमेरिकेने देशात काम करणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी व्हिसा नियम कडक केले आहेत. आज अमेरिका परदेशी नागरिकांना नोकरी देण्यापासून रोखत असल्याचे दिसून येते. तथापि, युरोपीयन अर्थव्यवस्था सेवा क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. ती त्यांच्या एकूण जीडीपीमध्ये ७० टक्के योगदान देते. परिणामी, युरोपीयन सेवा कंपन्यांना भारतात परवडणारे, कुशल कामगार उपलब्ध होतील. यामुळे भारत आणि युरोप या दोघांनाही लक्षणीय फायदे मिळण्याची शक्यता आहे. आतापर्यंत अमेरिका भारताला रशियाकडून तेल खरेदी करण्यापासून रोखण्यासाठी उच्च शुल्क लादत होती. ही रणनीती काम करत असल्याचे दिसून येते. कारण रिलायन्ससह अनेक भारतीय कंपन्यांनी रशियाकडून तेल खरेदी लक्षणीयरीत्या कमी केली आहे. ट्रम्प युरोपलाही अशाच प्रकारच्या धमक्या देत आहेत. मात्र ताज्या कराराबाबत नाराजी दाखवणारी अमेरिका हा खेळ आपल्या हातून निसटताना पहात आहे.

अमेरिका आपल्या अर्थव्यवस्थेच्या बळावर युरोपीय देशांना धमकावण्याचा प्रयत्न करत होती; परंतु युरोपला भारतात मोठी आणि परवडणारी बाजारपेठ मिळाल्याने अमेरिकेला आपले डावपेच अपयशी ठरताना दिसत आहेत. ट्रम्प प्रशासनातील ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसंट यांनी याला 'युरोपने अमेरिकेशी केलेला विश्वासघात' म्हटले आहे. त्यांनी म्हटले आहे, की या करारात सामील होऊन युरोप स्वतःविरुद्ध लढल्या जाणाऱ्या युद्धाला अप्रत्यक्षपणे वित्तपुरवठा करत आहे. अमेरिका रशियन तेल खरेदी करण्यापासून रोखण्यासाठी युरोपीय देशांवरही शुल्क लादण्याबद्दल बोलत होती. तथापि, युरोपला भारतात मोठी बाजारपेठ मिळाल्याने या शुल्काचे महत्त्व जवळजवळ संपुष्टात येऊ शकते. या करारामुळे भारतातील सर्वात असुरक्षित आणि 'एमएसएमई' क्षेत्राला फायदा होण्याची शक्यता आहे. भारत अजूनही अमेरिका आणि युरोपला तयार कृषी उत्पादने, कपडे आणि औषधे निर्यात करतो. देशातील सर्वात असुरक्षित किंवा मध्यमवर्ग कपडे आणि कृषी उत्पादनांमध्ये काम करत असल्याने युरोपीय देशांसोबत वाढलेल्या व्यापाराचा या वर्गाला थेट फायदा होण्याची शक्यता आहे. यामुळे या क्षेत्रांमध्ये रोजगारनिर्मिती वाढण्याची शक्यता आहे. युरोपीय संघ आणि भारत यांच्यातील या करारावर अमेरिका खूश नाही. त्यांनी भारत आणि युरोपीय महासंघाला 'देशद्रोही'ही म्हटले होते, तर रशियाकडून तेल आयातीसाठी भारतावर अतिरिक्त २५ टक्के कर लादला होता. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार अद्याप अंतिम झालेला नाही, तर युरोपीय महासंघात करार अंतिम झाला आहे.

भारतीय निर्यातदारांना २७ युरोपीय देशांमध्ये अंदाजे ४५० दशलक्ष उच्च-उत्पन्न ग्राहकांना शून्य दरात किंवा अत्यंत कमी दराने प्राधान्याने प्रवेश मिळेल. युरोपीय महासंघ सध्या १२५ अब्ज डॉलर्स किमतीचे कापड आणि वस्त्रोद्योग आयात करते. यामध्ये भारताचा वाटा फक्त पाच ते सहा टक्के आहे. दुसरीकडे, चीनचा बाजारहिस्सा तीस टक्के असून बांगलादेश आणि पाकिस्तानचा एकत्रित बाजार वीस टक्के आहे. बांगलादेश आणि पाकिस्तानला युरोपीय महासंघाकडून शून्य कर आकारणीचा फायदा होतो. खुल्या व्यापार करारामुळे भारत या देशांच्या करसमानेत येईल. परिणामी, अमेरिकेच्या ५० टक्के कर आकारणीमुळे तोटा सहन करणाऱ्या भारतीय कापड उद्योगाला आपली उत्पादने विकण्यासाठी नवी बाजारपेठ मिळेल. पादत्राणे, चामड्याच्या वस्तू, रत्ने आणि दागिने यासारख्या क्षेत्रांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ दिसून येईल. भारतीय औषध कंपन्यांसाठी केवळ कर कपातीतच मुख्य फायदा नाही, तर नियामक अडथळे कमी करणे आणि मानकांची परस्परमान्यता याचादेखील फायदा आहे. यामुळे भारतीय जेनेरिक औषधे आणि विशेष रसायने युरोपीय बाजारपेठेत अधिक सहजपणे प्रवेश करू शकतील. यामुळे भारताचे अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होईल. या करारामुळे युरोपीय गुंतवणूक स्वच्छ ऊर्जा, अक्षय ऊर्जा, औषधनिर्माण आणि प्रगत उत्पादन यासारख्या क्षेत्रांकडे भारतात आकर्षित होईल. शिवाय भारतीय कंपन्या युरोपीय पुरवठा साखळ्यांमध्ये एकत्रित होतील. त्यामुळे जागतिक उत्पादन नेटवर्कमध्ये भारताचे स्थान मजबूत होईल. शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी शेती आणि दुग्धशाळेसारख्या संवेदनशील क्षेत्रांना कराराच्या व्याप्तीतून वगळले आहे.

# चला मतदान करू या...



**अंतरा पारंगे**

मतदान एक देश घडविणारे मुलभूत कर्तव्य आहे. हे कर्तव्य पार पाडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मतदानातून बहुसंख्य नागरिकांचा विचार प्रतिबिंबित होतो. लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते. याच दृष्टीकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे नितांत गरजेचे आहे. त्यामुळे शनिवारी (दि.७) सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत चला मतदान करू या ही भूमिका ठेवून प्रत्येकाने मतदानासाठी घराबाहेर पडा.

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानात प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा समान अधिकार बहाल करण्यात आला आहे. १८ वर्षावरील प्रत्येक सुजाण नागरिकाला हा हक्क संविधानाने दिला आहे. हा अधिकार केवळ मतदानापुरता मर्यादित नसून, तो देशाच्या भवितव्याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून संविधानाची अंमलबजावणी होते, कायदे बनतात, धोरणे ठरतात आणि देशाची दिशा निश्चित होते. त्यामुळे मतदानाचा हक्क म्हणजे सामान्य नागरिकांच्या हातात दिलेले अत्यंत प्रभावी लोकशाही अस्त्र आहे.

'माझ्या एका मताने काही फरक पडत नाही' अशी अनेकांची भावना असते. मतदानानिमित्त सुट्टी आहे म्हणून तो सुट्टीचा दिवस असाच वाया घालवणे चुकीचे आहे. प्रत्यक्षात प्रत्येक मत महत्त्वाचे असते आणि अनेक वेळा एका मतानेही निकाल बदलू शकतो. आपले एक-एक मत ग्रामपंचायतीपासून तर संसदेच्या माध्यमातून देश घडविण्यात महत्वपूर्ण ठरते. आपण निवडून देणारे उमेदवार गावाचे नेतृत्व करणार आहेत. त्यामुळे आपण आपल्या मताधिकाराचा योग्य वापर करून शहराच्या विकासासाठी आणि पुढील पिढीच्या उज्ज्वल भविष्यासाठी आज सहकुटुंब मतदानाचे कर्तव्य बजावणे गरजेचे आहे.

निवडणूक आयोगाने मतदार होणे ही प्रक्रिया अतिशय सुलभ केली आहे. या संदर्भात अनेक ॲप्स उपलब्ध करण्यात आले आहेत. ऑनलाइन पद्धतीने देखील नोंद करता येते. प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्हा निवडणूक कार्यालय बाराही महिने कार्यरत असते. या ठिकाणी तत्परतेने मतदार होण्यासाठी मदत केली जाते. त्यामुळे मतदार होणे ही फार कठीण प्रक्रिया नाही. तसेच, म्हणूनच निवडणूक आयोग विविध जनजागृती मोहिमा, मतदार नोंदणी अभियान, स्विप जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना स्वयंस्फूर्तीने मतदानासाठी प्रवृत्त करत असतात.

निवडणूक प्रक्रियेत कार्यरत असणाऱ्या सर्वांना टपाल मत पत्रिका, निवडणूक कार्य प्रमाणपत्र यांच्या सहाय्याने सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान करण्यासाठी संधी उपलब्ध करून दिली जाते. यापूर्वी निवडणूक प्रक्रियेत गुंतल्यामुळे बहुतांशी अधिकारी व कर्मचारी मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित रहायचे. परंतु, आता निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपला मतदानाचा हक्क बजावता येणार आहे.

मोठ्या शहरातील मतदार हे मतदान करण्यास फार मोठ्या प्रमाणांत उत्सुक नसतात. त्यांच्या सोसायटीजवळच मतदान केंद्र असतांनाही त्यांच्याकडून कमी प्रतिसाद मिळतो. तर उदरनिर्वाहासाठी बाहेर गावी स्थलांतरित झालेले नागरिक सुट्टी असूनही मतदानासाठी येण्यास टाळाटाळ करतात. मतदारांनी प्रत्येक निवडणूकीमध्ये आपल्या मतदानाचा हक्क बजावून एक सार्वभौम शक्तीशाली लोकशाही राष्ट्र उभारण्यास आपले मतदानाच्या स्वरूपात सहकार्य करावे.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी शनिवारी मतदान होणार आहे. ५०२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतदान करण्यासाठी तरुणाईसह महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग मतदार सज्ज झाले आहेत.

मुंबई व अन्य ठिकाणी नोकरी व्यवसायनिमित्त असणारे नागरिकदेखील मतदान करण्यासाठी गावाकडे दाखल झाले आहेत. मतदान करणे प्रत्येकाचा अधिकार आहे. हे समोर ठेवून १७ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यातील दोन हजार ३२३ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे.

मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत व्हावी, यासाठी प्रशासनाने देखील कंबर कसली आहे. पोलीस यंत्रणादेखील कामाला लागली आहे. मतदान भयमुक्त वातावरणात करता यावे, यासाठी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. प्रशासकीय व पोलीस प्रशासन मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी मेहनत घेणार आहेत. त्याच पध्दतीने प्रत्येकाने मतदान हा आपला अधिकार आहे, हे समजून लोकशाही वाचविण्यासाठी मतदान करणे गरजेचे आहे.

लोकसंसद

## रूबल नागी यांना प्रतिष्ठेचा 'वैश्विक शिक्षक पुरस्कार'!

केवळ आपल्या विद्यार्थ्यांवरच नव्हे तर आजूबाजूच्या समाजांवरदेखील आपल्या उत्कृष्ट शिक्षणपद्धतीने प्रभाव टाकणाऱ्या जगातील सर्वोत्तम शिक्षकाला दरवर्षी लंडनच्या वार्की फाउंडेशन आणि पॅरिसमधील संयुक्त राष्ट्रे शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संस्था (युनेस्को), यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिष्ठेचा 'वैश्विक शिक्षक पुरस्कार' (ग्लोबल टीचर प्राईझ) दिला जातो. यंदा जगभरातील १३९ देशातील ५ हजारांहून अधिक शिक्षकांच्या नामांकनामधून अंतिम विजेती म्हणून झोपडपट्ट्यांच्या भिंतींवर भित्तिचित्रांच्या माध्यमातून शैक्षणिक क्रांती घडवणाऱ्या भारतीय शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या रूबल नागी यांची वैश्विक शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाली आहे. 'शिक्षकांचे नोबेल पारितोषिक' म्हणून मानला गेलेला १० लाख डॉलरचा (अंदाजे ९ कोटी रुपये) हा वैश्विक शिक्षक पुरस्कार रूबल नागी यांनी नुकताच दुबई येथील एका परिषदेत स्वीकारला. मूळच्या जम्मू आणि काश्मीरच्या असलेल्या रूबल नागी यांनी त्यांच्या मुंबईस्थित नागी आर्ट फाउंडेशनच्या माध्यमातून संपूर्ण भारतात ८००हून अधिक शिक्षण केंद्रे स्थापन केली आणि त्यातून साक्षरता, विज्ञान, गणित आणि इतिहास यांसारख्या विषयांचे ज्ञान देणारी भित्तिचित्रे तयार करून विद्यादानाचे खूप मोठे कार्य केले आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळिवणाऱ्या रणजितसिंह डिसले (२०२० चे विजेते) यानंतर त्या दुसऱ्या भारतीय ठरल्या आहेत. रूबल नागी यांचे कौतुक आणि अभिनंदन!

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## स्क्रीनच्या अतिवापराने दृष्टी धोक्यात

हल्ली मुले खेळाच्या मैदानावर दिसत नाहीत. साहजिकच ती मोकळ्या हवेपासून सतत दूर राहतात. आता मुलांना मोबाईल व लॅपटॉपचे वेड प्रचंड प्रमाणात लागले आहे. साहजिकच त्यांच्या दृष्टीवर याचा गंभीर परिणाम होत आहे. गेल्या वर्षी कर्नाटकात नॅशनल वाईल्ड हेल्थ प्रोग्रॅम अंतर्गत सुमारे सव्वा कोटी मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे सुमारे.१.७२ लाख मुलामध्ये दृष्टी दोष आढळून आले आहेत. आरोग्य तज्ञाच्या मते मुलांनी किमान दोन तास तरी सूर्यप्रकाशात मनमोकळे पणाने खेळले पाहिजे. सतत मोबाईल वर असण्याने डोळे कोरडे होण्याची समस्या सुद्धा मोठ्या प्रमाणात उद्भवते थकवा, जळजळ तसेच डोकेदुखी जाणवते . पालकांनी या बाबतीत सतर्क राहून मुलांना मोबाइलपासून सतर्क केले पाहिजे व त्यांना काही वेळ मोकळ्या हवेत फिरावयास नेणे जरूर आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

दिनविशेष

# हिमालयाची सावली; त्यागमूर्ती माता रमाई

आज ७ फेब्रुवारी, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे (वलंगकर) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वणंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावासाठी मुलगी पाहत होते. वलंगकरांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणीच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्षे होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईनी जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे सुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मालवली. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. जवळजवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**७ फेब्रुवारी**

१)श्रीम. उलका रविंद्र गावकर
पंतनगर, अलिबाग
०७-०२-१९४२

२) श्रीम. वसुधा वसंत खरे
रामनाथ-अलिबाग,
०७-०२-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**स्व परेश नवीनचंद्र गाला स्मरणार्थ सांताक्रूझ, मुंबई**

# महावितरणविरुद्ध आंदोलनाचा इशारा

## स्मार्ट मीटर सक्ती केल्याने वीज ग्राहक संघर्ष समिती संतप्त

**| नेरळ | प्रतिनिधी |**

महावितरणकडून कर्जत तालुका वीज संघर्ष समितीला वेळोवेळी आश्वासने दिली जात आहेत. मात्र त्या आश्वासनाची पूर्तता होत नसल्याने पुन्हा एकदा जन आंदोलन करायला लावू नका, असा इशारा संघर्ष समितीचे वतीने देण्यात आला. पावसाळा जवळ येऊ लागला असून पुढील दोन महिन्यात पावसाळ्यापूर्वी प्रलंबित कामे घ्यावीत आणि कोणत्याही स्थितीत स्मार्ट मीटर बसविणे सक्तीचे करू नये, असा इशाराकर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीकडून देण्यात आला आहे.



कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीमार्फत उपअभियंता तुकाराम केंद्रे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कर्जत वीज ग्राहक संघर्ष समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे तसेच रंजन दातार आणि अनेक सदस्य उपस्थित होते. महावितरणचे उप अभियंता यांना निवेदन दिल्यानंतर चर्चा करताना कर्जत तालुक्यातील गावोगावांत विजेच्या तारा गेली ३० वर्षांहून अधिक जुन्या व जीर्ण अवस्थेत असल्याने अनेक दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. तसेच यामुळे वारंवार लाईट जात असते. या पार्श्वभूमीवर तातडीने जीर्ण तारा तसेच इतर वीज उपकरणे बदलण्याबाबत निवेदन दिले आहे. पुढील दोन महिन्यात याची पूर्तता करण्यात यावी, तसेच यापुर्वी आम्ही वीज ग्राहकांनी ऑगस्ट २०२४ मध्ये आठ दिवस साखळी उपोषणाचे आंदोलन केले होते. त्यावेळी ज्या वीज समस्या मांडल्या आहेत, त्यामध्ये जीर्ण तारा विजेचे खांब आणि इतर उपकरणे बदलण्याबाबत मागणी केली आहे.

यावर्षी पावसाळ्यात अनेक ठिकाणी विजेचा शॉक लागून अनेक माणसे मृत्युमुखी पडले आहेत. तसेच अनेक जनावरे सुद्धा मृत्युमुख़ी पडली आहेत. या सर्व गोष्टी आपण वेळोवेळी मागणी केलेली कामे न केल्यामुळे घडलेल्या आहेत. निवेदनामार्फत केलेल्या मागण्या दोन महिन्याच्या आत सोडवल्या नाहीत, तसेच स्मार्ट मीटर बसविण्यासाठी सक्ती केल्यास आपणाविरूद्ध तीव्र स्वरूपाचे जन आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघर्ष समितीकडून देण्यात आला.

### विज ग्राहकांना दमदाटी

**सक्तीने स्मार्ट बसवणार नाही. परंतु, गेल्या दोन महिन्यापासुन फॉल्टी मीटर तसेच वरीष्ठांचा दबाव आहे, पोलिसांना बोलावू अशी कारणे सांगून विज ग्राहकांना दमदाटी करून स्मार्ट मीटर बसविण्यासाठी सक्ती करीत असल्याचे कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीकडून निदर्शनास आणले.**

## निवडक

### नरहरी महाराजांची पुण्यतिथी साजरी



**पनवेल :** नवीन पनवेल येथील नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळातर्फे बुधवारी (दि.४) संत नरहरी सोनार महाराज यांच्या पुण्यतिथीचे आयोजन मंडळाच्या कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे सचिव विजय भामरे यांच्या हस्ते संत नरहरी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर त्यांनी संत नरहरी महाराज यांच्या जीवन चरित्राविषयी माहिती सांगितली. यावेळी ज्येष्ठ सदस्या सुमन रणधीर, सहसचिव मनोज सोनार, सदस्य योगेश रणधीर, पाडुरंग सोनार, रमेश सोनार (विसपुते), कैलास पिंगळे, सुवर्णा पिंगळे, डॉ. अनिता विभांडिक आदींसह समाज बंधुभगिनींची उपस्थिती होती. तसेच पुणे येथून रविंद्र बंडूशेठ अहिरराव यांची विशेष उपस्थिती होती.



### एक्सप्रेस-वे अपघाताचा पालीला फटका

**पाली :** मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील आडोशी बोगद्याजवळ प्रोपलेन गॅस वाहून नेणारा टँकर उलटल्याने एक्स्प्रेस-वेवरील वाहतूक सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आली. या निर्णयाचे पडसाद थेट पाली शहरात तसेच मुंबई-गोवा महामार्ग आणि पाली-खोपोली राज्य मार्गावर उमटले असून, बुधवारी दुपारपासून या सर्व मार्गांवर अभूतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. टँकर उलटल्यानंतर गॅसगळती सुरू झाल्याने बोरघाट पोलीस व अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले होते. संभाव्य धोका लक्षात घेऊन द्रुतगती मार्गावरील वाहतूक पूर्णतः थांबवण्यात आली. परिणामी, हजारो वाहने महामार्गावर अडकून पडली होती. द्रुतगती मार्ग बंद झाल्याने पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहने आळेफाटा-माळशेज घाटमार्गे ठाणे-मुंबई तसेच चांदणी चौक, ताम्हिणी घाटमार्गे रायगड जिल्ह्यातून वळवण्यात आली. कमी अंतर व सोयीस्कर मार्ग म्हणून अनेक वाहनचालकांनी विळेर-वाळजेमार्गे पालीकडे धाव घेतली. त्यामुळे पालीखोपोली राज्य मार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग, तसेच पाली-वाकणमार्गे मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पाली शहरातील मुख्य रस्ते वाहनांनी गच्च भरले होते. वाहने मोठ्या प्रमाणात एकाच वेळी शहरात आल्याने ठिकठिकाणी कोंडी निर्माण झाली. याशिवाय रायगड जिल्ह्यातून पुण्याकडे जाणारे प्रवासीही ताम्हिणी घाट मार्गेच जात असल्याने त्या मार्गावरही वाहतुकीचा ताण वाढला होता. गॅस गळतीमुळे मोठा धोका संभवतो. परिस्थिती पूर्णपणे सुरक्षित झाल्याशिवाय एक्सप्रेस-वे सुरू केला जाणार नाही, असे महामार्ग पोलिसांनी स्पष्ट केले. तोपर्यंत प्रवाशांना ताम्हिणी घाट किंवा जुन्या मुंबई-पुणे महामार्गाचा पर्याय वापरावा लागला.

### फायनान्स कंपनीची फसवणूक

**पनवेल :** बनावट सोने देऊन एका फायनान्स कंपनीची फसवणूक करून गेल्या वर्षभरापासून फरार असलेल्या आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे. पनवेल येथील मंगल क्रेडीट ॲण्ड फिनक्रॉप फायनान्स लिमिटेड येथे आरोपी करेश सुभाष भोईर याने सोन्याच्या बनावट दोन वस्तू तारण ठेवून त्याच्यावर १ लाख ८० हजार रुपये काढून फायनान्स कंपनीची फसवणूक करून तो पसार झाला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच तो वेगवगेळ्या ठिकाणी आपले अस्तित्व लवपून राहत होता. याबाबत वपोनि नितीन ठाकरे यांनी आरोपीला शोधून काढण्याचे आदेश दिले असता पोलीस उप निरीक्षक हजरत पठाण, पोना प्रविण मेथे, भास्कर चौरे आदींच्या पथकाला गुप्त बातमीदाराने आरोपी हा पनवेल शहर परिसरात आल्याची माहिती दिली. त्यानुसार या पथकाने सापळा रचून त्याला अटक केली आहे.

### काका पाटील यांनी घेतली पवार कुटुंबियांची सांत्वनपर भेट



**उरण :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. या पार्श्वभूमीवर शेकापचे नेते काका पाटील यांनी त्यांचे चिरंजीव पार्थ पवार व कुटुंबियांची बारामती येथील मंगळवारी (दि.३) सहयोगी निवासस्थानी सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांच्यासमवेत काका पाटील, माया पाटील, सागर पाटील व सुनील पाटील उपस्थित होते. दरम्यान, विद्या प्रतिष्ठान येथे जाऊन अजित दादांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

### तळा येथे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

**तळा :** तळा तालुका रिक्षा चालक-मालक संघटनेतर्फे मंगळवारी (दि.३) धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संघटनेच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या या धार्मिक कार्यक्रमात हिंदूंसोबत मुस्लिम बांधवांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. पूजेच्या तयारीपासून ते विधीपर्यंत मुस्लिम सदस्यांनी हिरीरीने सहभाग नोंदवला. सर्वांनी पांढरे शर्ट-पॅन्ट आणि पारंपरिक गांधी टोपी परिधान केल्याने कार्यक्रमात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सुंदर दर्शन घडले. तळा हा दुर्गम तालुका असल्याने रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे अनेक तरुण मुंबई-पुण्यासारख्या शहरांकडे वळले आहेत. परिणामी, स्थानिक पातळीवर रिक्षा चालकांना पुरेसा व्यवसाय मिळत नाही. अशा परिस्थितीतही संघटनेतील ४० हिंदू आणि २० मुस्लिम सभासदांनी एकत्र येत महापूजेचे आयोजन केले, याबद्दल नागरिकांतून कौतुक व्यक्त होत आहे. याप्रसंगी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संघटनेचे अध्यक्ष सचिन अंबारले, उपाध्यक्ष अक्लाक तिसेकर, खजिनदार संजय चव्हाण, उपखजिनदार आशिष वाड, सचिव रमेश सूद, सल्लागार राकेश वडके, कायदेशीर सल्लागार ॲड. चेतन चव्हाण, नेतृत्व रामदास तळकर तसेच इतर सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुचाकीची चोरी

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील उसर्ली खुर्द येथे राहणारे गणेश भगत यांनी त्यांच्या मालकीची ४० हजार रुपये किमतीची ग्रे रंगाची होन्डा शाईन (एम.एच.०३ बि.व्ही ०९७९) पनवेल रेल्वे स्टेशनबाहेर ओपन पार्किंगमध्ये पार्क ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आपत्ती व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील वरसोली येथे रायगड जिल्ह्यातील पशुसंवर्धन अधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय बैठक पार पडली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन तज्ञ तथा रायगड भूषण प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापनविषयक मार्गदर्शन केले. यावेळी प्रा.डॉ. जयपाल पाटील यांचा सत्कार करण्यात आला. प्रा.डॉ. जयपाल पाटील यांनी आपल्या सुरक्षेसाठी १०८ बीव्हीजीचा वापर करावा, महिला डॉक्टरांनी महाराष्ट्र पोलीस ११२ क्रमांकाचा वापर करावा, गावातील शेतकऱ्यांच्या मुलींना बाळंतपणात १०२ रुग्णवाहिकेचा वापर करण्यास सांगावे, घरातील गॅस, सिलेंडर, जेष्ठ नागरिकांची काळजी कशी घ्यावी, याबद्दल माहिती दिली. यावेळी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय रायगड विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ.सचिन देशपांडे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र पेणचे डॉ.साखरे व सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, ८५ डॉक्टर उपस्थित होते.

## नोकरी द्या, अन्यथा उठणार नाही

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

नागोठण्यातील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड प्रकल्पग्रस्त स्थानिक भूमीपुत्रांनी कायमस्वरूपी नोकरीच्या मागणीसाठी आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. हे उपोषण सुरूच असून, न्याय मिळेपर्यंत माघार नाही, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली आहे. कंपनी व्यवस्थापन, लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत प्रकल्पग्रस्तांनी तीव्र संताप व्यक्त केला.



भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था-नागोठणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन ७ ऑक्टोबर, २०२५ पासून सुरू आहे. पूर्वीच्या आयपीसीएल आणि सध्याच्या रिलायन्स नागोठणे प्रकल्पातील प्रमाणपत्रधारक प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरी देण्याची मागणी त्यांनी लावून धरली आहे. 'कॉल लेटर मिळेपर्यंत आम्ही आझाद मैदान सोडणार नाही, जीव गेला तरी मागे हटणार नाही,' असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे. २४ जून, २०२५ रोजी मंत्रालयात मुख्य सचिवांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ३२४ प्राधान्य प्रमाणपत्रधारक प्रकल्पग्रस्तांना दोन महिन्यांत नोकरीत सामावून घेण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे लेखी निर्देश जिल्हाधिकारी रायगड व रिलायन्स कंपनी अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचा दावा आंदोलकांनी केला. मात्र, कंपनी आडमुठी भूमिका घेत असून, मुद्दाम विलंब केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

### रिलायन्सविरोधात प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

## जगण्याच्या वारीत जिद्दीचा संसार

### महामार्गावरील दृश्याने मन हेलावले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सायन-पनवेल महामार्गावर दिसलेले एक दृश्य अनेकांना थांबून पाहायला भाग पाडणारे ठरले. भरउन्हात, आपल्या संपूर्ण संसाराची गाठोडी दोन घोड्यांच्या पाठीवर बांधून एक महिला पुढील प्रवासाला निघाली होती. कुठे जायचे, कुठे थांबायचे, उद्या काय होणार याचा ठावठिकाणा नसतानाही तिच्या चेहऱ्यावर हार न मानण्याची जिद्द स्पष्ट दिसत होती.



घर, संसार, जबाबदाऱ्या आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची वर्षानुवर्षांची सवयहेच अनेक महिलांचे आयुष्य बनते. लहान घरातून मोठ्या घरात, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी, सतत बदलणाऱ्या परिस्थितीत स्वतः ला सावरत त्या कुटुंबाचा गाडा पुढे नेत असतात. या महिलेचा महामार्गावरील प्रवास केवळ स्थलांतर नव्हता, तर स्त्रीच्या संघर्षाची जिवंत कहाणी होती.

भरउन्हात सुरू असलेला हा प्रवास अनेक प्रश्न उपस्थित करून गेलाजगण्याची ही धडपड, जबाबदाऱ्यांचे ओझे आणि परिस्थितीशी दोन हात करण्याची ताकद, हे सर्व त्या एका दृश्यातून स्पष्ट जाणवत होते. ही केवळ वाटचाल नव्हती, तर जगण्याशी सुरू असलेल्या लढ्याचे प्रतीक होते.

## मोटारसायकल चोर अटकेत

**पनवेल :** संकेत राणे यांनी त्यांची बजाज मोटारसायकल ही यश कमल हौसिंग सोसायटी येथे उभी करून ठेवली होती. त्यावेळी कळंबोली येथील प्रफुल्ल पळसपगार (२५) याने त्यांच्या गाडीचे लॉक तोडून ती चोरून नेली होती. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. त्यांनतर पोलीस पथक या परिसरात गस्त घालत असताना त्यांना प्रफुल्ल पळसपगार हा चोरीच्या मोटारसायकलसह सापडल्याने त्याला ताब्यात घेतले.

## सुभान ढोकले ठरला 'बेस्ट बॉय'

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड येथील हिमायतुल इस्लाम उर्दु हायस्कूल डॉक्टर ये.ये. देशमुख ज्युनियर कॉलेजमधील इयत्ता दहावीचा विद्यार्थी सुभान ढोकळे याची 'बेस्ट बॉय' म्हणून निवड करण्यात आली. सुभान ढोकळे याने शैक्षणिक क्षेत्रात सातत्यपूर्ण साधत शिस्तप्रिय वर्तन, नियमित उपस्थिती, शिक्षकांवप्रती आदर तसेच सहविद्यार्थ्यांशी सुसंवाद राखत आदर्श विद्यार्थी म्हणून ओळख निर्माण केली आहे. शाळेतील विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये त्याचा सहभाग नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे.



विद्यार्थ्यांच्या या सर्वांगीण कामगिरीची दखल घेत शाळा व्यवस्थापन व शिक्षकवर्गाने त्याची 'बेस्ट बॉय' म्हणून निवड केली. या निवडीमुळे शाळेची शैक्षणिक गुणवत्ता अधोरेखित झाली असून, लाडवली परिसरात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## खारघर येथे शौर्यम वॉकेथॉन

**| उरण | प्रतिनिधी |**

मार्कोस वेटरन फौंडेशनतर्फे गौरवाच्या पाऊलखुणा या थीमवर आधारित शौर्यम वॉकेथॉन खारघर येथे ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही ५ कि.मी. वॉकेथॉन सर्वासाठी खुली आहे. भारतीय नौदलाचे मरीन कमांडोज हे जगातील सर्वात श्रेष्ठ कमांडोज मानले जातात. शौर्यम वॉकेथॉन मध्ये सर्व सामान्य नागरिकांना निवृत्त मरीन कमांडोज तसेच नौदलात कार्यरत असणाऱ्या मरीन कमांडोजसोबत चालण्याची आणि संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. शौर्यम वॉकेथॉन ८ फेब्रुवारीला सकाळी ७ वाजता



खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजपासून सुरु होणार आहे. तरी सर्व इच्छुकांनी यामध्ये सामील व्हावे, असे आवाहन मार्कोस वेटरन फौंडेशनतर्फे करण्यात आले आहे. सर्व स्पर्धकांना खास डिझाईन केलेले मार्कोस टी शर्ट देण्यात येतील. शौर्यम वॉकेथॉनमध्ये सामील होण्यासाठी https://forms.gle/hLbDbYRtAkDQw5S18 या लिंकवर आपले नाव रजिस्टर करावे.

## दिघीतील रस्त्यावर गतिरोधकाची मागणी

**| दिघी | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील सर्वच रस्ते सुस्थितीत झालेत आहेत; मात्र, या चकाचक रस्त्यावरून वाहने नियंत्रणात येत नसल्याने अपघाताची मालिका सुरूच आहे. तालुक्यातील दिघी गावातील शिक्षणासाठी शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना प्रवासादरम्यान काळजात धडकी बसणारा वाहनांचा वेग पाहायला मिळत आहे. भरधाव वाहनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय येथे गतिरोधक बसवण्याची मागणी केली जात आहे.



दिघी गावाजवळील शाळा दिघी-वेळास महामार्गावर असून, शाळेत २५५ विद्यार्थी संख्या आहे. तसेच, येथील लोकांना बाजारहाट, नोकरीसाठी, तर आजारी व्यक्तींना हॉस्पिटलसाठी बोर्ली किंवा श्रीवर्धनला याच रस्त्यांनी जावे लागते. या परिसरात दोन शाळा असल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने ये-जा सुरू असते. मात्र, दिघी पोर्ट, जंगलजेटीकडे जाणारे अवजड, लहान वाहने गतिरोधक नसल्याने भरधाव वेगाने धावत असल्याचे दिसून येते. त्यामुळे येथील पालक विद्यार्थ्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे.

> **दिघी गावाकडे जाणाऱ्या मार्गावर शाळा असल्याने मुलांना याच रस्त्यावरून ये-जा करावी लागत आहे. वेळोवेळी प्रवासादरम्यान मुलं व शिक्षकांचा अचानक येणाऱ्या भरधाव वाहनांमुळे प्रवास धोकादायक ठरत आहे. त्यामुळे लवकरच या ठिकाणी गतिरोधक बसविण्यात यावे.**
> **- हेमंत कीर, शिक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय**

### कृषी दराने मिळणार वीज | राज्य सरकारचा दिलासादायक निर्णय

# पशुपालकांची वीज बिलाच्या चिंतेतून सुटका

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

**रायगड जिल्ह्यातील पशुपालकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. पशुपालन व्यवसायाला आता कृषीचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यातील हजारो पशुपालकांना आता व्यावसायिक दराऐवजी सवलतीच्या कृषी दराने वीज उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे पशुपालकांचा उत्पादन खर्च कमी होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



पशुसंवर्धनाशी संबंधित व्यवसायांसाठी आतापर्यंत कृषी इतर या वर्गवारीनुसार वीज बिल आकारले जात होते. मात्र, आता नवीन निर्णयानुसार ही आकारणी थेट कृषी वर्गवारीप्रमाणे केली जाईल. तसेच, कुक्कुटपालन आणि इतर पशुसंवर्धन प्रकल्पांसाठी सोलर पंप व इतर सौर ऊर्जा संच उभारण्यासाठी सुद्धा कृषी व्यवसायाप्रमाणेच अनुदान आणि सवलत दिली जाणार आहे. या निर्णयामुळे केवळ वीज बिलातच बचत होणार नाही, तर कृषी व्यवसायाप्रमाणेच पशुपालन व्यवसायाला सुद्धा बँकांकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याजदरात सवलत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### कोणाला मिळणार या योजनेचा लाभ?

**या सवलतीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत:**
**कुक्कुटपालन: २५ हजार किंवा त्यापेक्षा कमी मांसल पक्षी / ५० हजार किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक पक्षी.**
**हॅचरी युनिट: ४५ हजार किंवा त्यापेक्षा कमी क्षमता.**
**दुग्ध व्यवसाय: १०० किंवा त्यापेक्षा कमी दुभत्या जनावरांचा गोठा.**
**शेळी-मेंढी पालन: ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी/शेळी असलेला गोठा.**
**वराह पालन: २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह.**

### पात्रतेसाठी आवश्यक अटी

**पशुपालकांनी जिल्हा उपायुक्तांकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.**
**पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी असणे आवश्यक.**
**पशुपालन प्रकल्पासाठी स्वतंत्र वीज मीटर असावे. अवसायनातील (बंद पडलेल्या) सहकारी संस्था किंवा प्रकल्प या सवलतीस पात्र ठरणार नाहीत.**

> शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील पशुपालकांसाठी एक सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. वीज बिलात मिळणाऱ्या सवलतीमुळे पशुपालकांचा दैनंदिन उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात कमी होईल. यासोबतच यांत्रिकीकरणावर भर देणे अधिक सोपे होईल. जिल्ह्यातील अधिकाधिक पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपली नोंदणी पूर्ण करावी.
> - डॉ. सचिन देशपांडे, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय, रायगड

# कर्मचारी नोंदविणार अभिप्राय

**• सरकारी कार्यालयांत असणार अभिप्राय पेटी**

**• सचिवांकडे होणार अहवाल सादर**

| रायगड | प्रतिनिधी |

राज्य शासनाच्या अखत्यारितील शासकीय, निमशासकीय कार्यालयात आता तक्रार पेटीच्या धर्तीवर अभिप्राय पेटी राहणार आहे. या पेटीत कार्यालयात येणाऱ्या नागरिक, लाभार्थी एवढेच नव्हे कर्मचाऱ्याना सुद्धा आपले अभिप्राय नोंदविण्यात येणार आहे.

दर महिन्याच्या ठराविक तारखेला ही पेटी उघडण्यात येणार असून त्यावर कार्यालय प्रमुख अंमलबजावणी करणार असून संबंधित विभागाच्या सचिवाना अहवाल सादर करणार आहे. त्यावर राज्य शासनही निर्णय घेणार आहे.शासनाच्या या उपक्रमामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्थाना अभिप्राय पेटी योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सुचना राज्याच्या प्रधान सचिवाकडून देण्यात आल्या आहेत. कार्यालयांमध्ये सुचना किंवा तक्रार पेटी ठेवण्याची पद्धत पूर्वीपासुन अस्तित्वात आहे. मात्र याचा कार्यालय कामकाजाबाबत सुधारणेच्या दृष्टीने फारसा उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे अभिप्राय पेटी ची पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. लोकाभिमुख, पारदर्शक, उत्तरदायी व कार्यक्षम प्रशासन निर्माण करणे हा यामागील उद्देश आहे.

पुरविल्या जाणाऱ्या सेवामध्ये नागरिकांना येणाऱ्या अडचणी, मिळणारी मदत, कार्यालयीन वातावरण, अधिकारी व कर्मचारी यांची वर्तणूक, कामकाजातील सुलभता किंवा विलंब याबाबतचा त्यांचा अनुभव अभिप्राय मधून उमटणे अपेक्षित आहे. कर्मचारी देखील आपल्या विभागातील कामकाज अधिक चांगले होण्यासाठी आपले अभिप्राय देऊ शकतील. नागरिकांच्या अनुभवांच्या प्रशासनाला आत्मपरीक्षणाची संधी मिळेल, शासकीय कामकाजात गतिमानता, सुलभता व गुणवत्ता वाढीस लागेल, असा यामागचा प्रशासकीय आशावाद आहे.अभिप्राय पेटी दरमहा ५ तारखेला, सुट्टी असल्यास पुढील दिवशी कार्यालय उघडण्यात येणार आहे. प्राप्त अभिप्रायांचे वाचन करून संकलन करण्यात येणार आहे. त्याची नोंद अभिप्राय नोंदवहीमध्ये घेण्यात येणार आहे. कार्यालय स्तरावर अंमलतबजावणी करता येणारे आणि धोरण नियम संदर्भातील अभिप्राय अशा दोन गटांमध्ये वर्गीकरण करण्यात येईल. कार्यालय स्तरावर तात्काळ अंमलात आणता येणाऱ्या उपयुक्त सुचनांची अंमलबजावणी संबंधित कार्यालय प्रमुखांनी तात्काळ करावी.

नियम, कार्यपद्धती अथवा धोरणांमध्ये बदल साठीचे अभिप्राय वरिष्ठ कार्यालय व संबंधित विभागाचे सचिव तसेच सचिव यांना पाठवावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

**कार्यालयामध्ये नागरिकांसाठी विहीत नमुन्यातील अभिप्राय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कागदावर लिहून अभिप्राय देण्याचा पर्याय सुद्धा आहे. कार्यालयाच्या दर्शनी ठिकाणी कुलूपबंद अभिप्राय पेटी ठेवण्यात येणार आहे. अभिप्राय मध्ये कार्यालयीन स्वच्छता, सेवा पद्धत, नागरिकांशी वागणूक, कामकाजातील सुलभता, या मुद्द्यांवर १ ते ५ इतके गुणांकन सादर करता येईल. तसेच त्यांना आलेल्या अनुभवांवर मुक्त स्वरूपात त्यांचे अभिप्राय नोंदवून सदर अभिप्राय कुलूपबंद पेटीमध्ये टाकण्याची मुभा देखील राहणार आहे. कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी सुद्धा लोकाभिमुख प्रशासनासाठी मते मांडू शकणार आहे. विकासात्मक व प्रशासकीय दृष्टीने शासकीय योजनांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत याबाबत आपले अभिप्राय या यंत्रणेद्वारे देऊ शकतील.**

## ब्रेथ ॲनलायझरने तपासणी आवश्यक

**श्रीवर्धन** : शहरांमध्ये ड्रंक ॲन्ड ड्राईव्हच्या केसेसमध्ये त्वरित चालकाची पोलिसांकडून ब्रेथ ॲनलायझरने चाचणी घेतली जाते. परंतु तीन अपघाताच्या प्रकरणांत वाहन चालकांची ब्रेथ ॲनलायझरने तपासणी झाली नव्हती असे अनधिकृतपणे समजते. हे जर खरे असेल तर ते योग्य नाही असे नागरिकांना वाटते. पर्यटकांची पर्यटन स्थळाच्या प्रवेशद्वारांपाशीच अशी चाचणी झाली तर कितीतरी अपघात टळू शकतील असे नागरिकांचे म्हणणे आहे.

आता अपघातानंतर होईना पण श्रीवर्धन पोलीस ठाण्याला व अन्य काही ठाण्यांना ब्रेथ ॲनलायझर पुरविण्यात आले आहेत असे कळते. हे खरे असेल तर ते चांगलेच आहे. आता तरी त्याचा विशेषतः पर्यटन स्थळी बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांसाठी उपयोग करण्यात यावा म्हणजे संभाव्य अपघातांचे प्रमाण तरी कमी होईल अशी, मागणी श्रीवर्धन तालुक्यातील जनतेकडून केली जात आहे.

## स्नेहमेळाव्यात कलाकारांनी लुटला पोपटीचा आस्वाद



| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण परिसरात मागील आठवड्यापासून शेतात तसेच फार्म हाऊसमध्ये पोपट्या पार्ट्या रंगण्यास सुरुवात झाली आहे. सध्या परजिल्ह्यातून येणाऱ्या पावट्यावर पोपट्या पार्ट्या अवलंबून आहेत. मात्र चिरनेर परिसरात आता कुठे गावठी वाल तयार होण्याची सुरुवात झाली असल्यामुळे पोपटीची लज्जत वाढली आहे.

थंडी पडू लागली की खवय्यांना चाहूल लागते. ती पोपटी पार्टीची. हवेत गारवा आल्याने सध्या पोपटी पार्टीचे बेत आखले जाऊ लागले आहेत.

उरण, नवीमुंबई येथील अष्टगंध कला मंचाच्या स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने बुधवारी (दि.४) चिरनेर येथील मानसी फार्म हाऊसवर पोपटी पार्टीचे व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान पोपटी तयार करण्यासाठी, येथील मोकळ्या जागी पोपटीचे मडके बसविण्यासाठी थोडासा खड्डा खणला जातो.

त्या खड्ड्यात मडके उलटे ठेवले जाते. त्यानंतर मडक्याभोवती पाला, पेंढा, सुक्या काठ्या टाकून, त्याला आग लावली जाते. साधारण अर्धा ते पाऊण तास हे मिश्रण शिजवले जाते. तोपर्यंत जमलेल्या मंडळींचे मनोरंजनाचे खेळ आणि गप्पागोष्टी चांगल्याच रंगात आलेल्या असतात. रात्री थंडी पडत असल्याने पोपटी पार्टी होत असताना, लहान थोर पोपटीच्या शेकोटी जवळ शेक घेत असतात. अर्धा ते पाऊण तासाने पोपटी करणारे जाणकार मडक्यावर थोडे पाणी शिंपडतात. चर्र असा आवाज आला की पोपटी शिजल्याचे समजते.

पोपटीचा गरमागरम वाफाळता आस्वाद घेण्यासाठी सारे बैठक मारून सभोवार बसतात. मधोमध एका पेपरवर हे मडके ठेवून त्यातील वरचा भांबुर्डीचा पाला काढला जातो. मडक्यातील खमंग भाज्या मुळ्या तर मांसाहारी असल्यास मटन चिकन अंडी बाहेर काढण्यासाठी सगळेजण तुटून पडतात. शेतमालावरील निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या पोपटीचा आस्वाद घेण्याचा अनुभव अवर्णीय असतो. हे चित्र आता ग्रामीण भागात दिसू लागले आहे.

### • पत्रकारांचा झाला सन्मान

या स्नेहमेळाव्याच्या पोपटी पार्टीत कलामंचाने कृतज्ञता म्हणून पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे व पत्रकार कैलासराजे घरत यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी पत्रकारांनी मनोगतातून कलेच्या क्षेत्रात अष्टगंध कलामंचाने स्मरणीय कार्य करून ठेवल्याच्या भावना व्यक्त केल्या. तर स्नेहमेळाव्यात ज्येष्ठ रंगकर्मी विद्याधर म्हात्रे, धनेश्वर म्हात्रे, हसूराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, रमेश कोळी यांनी नाट्य संवादातून अभिनयाचे रंग उधळले.

# चित्रपटाची टीम विद्यार्थ्यांच्या भेटीला




| पनवेल | वार्ताहर |

अलेग्रिया निमित्त पनवेल पिल्लई युनिव्हरसिटी पनवेल येथे गुरुवारी मराठी चित्रपट अग अग सुनबाई काय म्हणता सासूबाई चित्रपटाची टीम विध्यार्थ्यांनच्या भेटीला आली होती. अग अग सुनबाई काय म्हणता सासूबाई प्रमोशनचा देखणा सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला चित्रपटाचे मुख्य कलाकार प्रार्थना बहिरे,दिग्दर्शक केदार शिंदे आणि निर्मिती सना शिंदे या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी कलाकारांचे उत्स्फूर्त स्वागत केले.

दिग्दर्शक केदार शिंदेने सासू-सुनेच्या या कथेला भावनिक किनार उत्तम दिली आहे. सासू आणि सुनेचे वेगवेगळे पैलू मांडताना त्यांच्यातील नात्याला कुठे तडा जाणार नाही, याची काळजी घेतली आहे. त्यांच्या नात्यातील रुसवे-फुगवे, त्यांच्यातील चढाओढ आणि टोमणे तसेच त्यांच्यातील शाब्दिक संघर्ष मांडताना त्या नात्यातील भावभावना आणि गोडवा जपण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. निर्मिती सावंत, प्रार्थना बेहरे, राजन भिसे, नकुल घाणेकर आदी कलाकारांनी या कथानकाला आपल्या उत्तम अभिनयाची छान जोड दिली आहे. विशेष म्हणजे, निर्मिती सावंत आणि प्रार्थना बेहरे यांनी आपापल्या व्यक्तिरेखा अत्यंत प्रभावीपणे साकारल्या आहेत.

संपूर्ण चित्रपट त्यांनी आपल्याच खांद्यावर घेतला आहे. सासू आणि सुनेतील रुसवे-फुगवे, एकमेकींमधील चढाओढ आणि संघर्ष तसेच भावभावना व हळवे प्रेम त्यांनी सुंदररीत्या सादर केले आहेत. चित्रपट आधीच सिनेमागृहात हाऊसफुल सुरु असून प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यावेळी कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर कलाकारांनी आपल्या चित्रपटाविषयी अनुभव मांडले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना कलाकारांनी त्यांच्या कॉलेज जीवनातील आठवणी शेअर केल्या आणि प्रेक्षकांना नक्कीच हा चित्रपट आवडेल असा विश्वास व्यक्त केला.कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चित्रपटातील गाण्यांवर प्रार्थना बेहरे सह ठेका धरत वातावरण प्रफुल्लीत केलं. यावेळी पिल्लई महाविद्यालयाच्या संचालक पीआर, पिल्लई ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, डॉ. निवेदिता श्रेयन्स, डॉ. संदीप जोशी, प्राचार्य, पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय डॉ. गजानन वाडेर, प्राचार्य, पिल्लई महाविद्यालय प्राचार्य संदीप जोशी, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी उपस्थित होते.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अरमान इक्बाल राऊत, रा.आरावी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड यांनी मौजे खारगाव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट क्र.१६३, एकूण क्षेत्र ०-०७-८० आकारणी ०.८१ लागवड गवतपड इतक्या क्षेत्राची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम.मनाली पांडूरंग खोत, श्रीम.मिल्का मिलींद पोलेकर, श्रीम.रसीका रमेश नागवेकर,, सर्व रा.मु.आरावी, ता.श्रीवर्धन, जि. रायगड यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. तसेच मिळकतीच्या मूळ मालकांसोबत दिनांक ०४/०३/२०२४ रोजी बयाणा चिठ्ठी केलेली असून बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही. वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाराहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : ०५/०२/२०२६

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

**e-TENDER NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend25 / 25-26 RFX 7000038594 | SITC, 22kV feeder for M/s JTL at 220kV Kandalgaon S/Stn under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 35.14 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST Submission of bids from 03.02.2026 to 18.02.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 18.02.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की तिचे मालक श्री तानाजी काशिनाथ शिंदे रा.हालिवली ता.कर्जत, रायगड महाराष्ट्र ४१०२०१ याच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १३/३/ब एकुण २० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : ०७/०२/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### पनवेल महानगरपालिका
### पशुवैद्यकीय विभाग
### जाहीर निविदा सूचना

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात भटके श्वान व मांजर यांचे ॲप आधारीत व्यवस्थापन करण्याकरीता एजन्सी नेमणूक करणेबाबत. सदरील जाहीर निविदा सूचना क्र. PMC/VHD/02/2025-26 पनवेल महानगरपालिके मार्फत मागविण्यात येत आहेत. सदर निविदाचा सविस्तर तपशील दि.०६.०२.२०२६ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahtenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

सही/-
उपायुक्त
**पनवेल महानगरपालिका**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील वर्णन केलेली मिळकत खालील नमूद मिळकतीचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा-रायगड, तालुका-पेण, मौजे-महलमिऱ्या डोंगर येथील बिनशेती जमिन मिळकत.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | एकूण क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ८८ | भोगवटादार वर्ग-१ | ३-४०-७० | २.१२ |

वर नमुद मिळकत ही मालक श्री.उमेश हसमुखलाल शहा रा.३०३, ए-विंग, तिसरा मजला, आराध्य वन पेशन, टिळक नगर मुंबई-४०००८९ यांच्या मालकीची वहिवाटीची, निर्वेध, प्रत्यक्ष ताबेकब्जातील अशी मिळकत आहे. सदर मिळकत विक्री करण्याबाबत आमच्या पक्षकाराबरोबर बोलणी झालेली आहे.

तरी या मिळकतीबाबत इतर कोणाचाही साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, ताबाकब्जा, हक्क, दान, गहाण, फरोक्त, बक्षिसपत्र, चार्ज, लिज, इतर कोणतेही करार अथवा हक्क हितसंबंध असल्यास खालिल ॲडव्होकेट यांचेकडे १५ दिवसांत लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे पक्षकार सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करती. मागावून येणारी हरकत आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : ०७/०२/२०२६

**ॲड.जितेंद्र द.म्हात्रे**
बी.ए.एल्.एल्.एम्.
नोटरी (भारत सरकार)
कार्या-शॉप नं.४, डी विंग, समर्थ प्रसाद नगर,
राजू पोटे मार्ग, ता.-पेण, जि.-रायगड.
फोन नं. ९४२२०९४७७४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते कि, आमचे अशिल श्रद्धा सचिन राजपूत यांनी खालील वर्णनाची बिनशेती मिळकत ज्यूवेल पिलिप्स यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ११/२ | ४-३०-०० | ४३-०० |

सदर मिळकतीबाबत कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, वारस हक्क, पोटगी, ताबा, वहिवाट, हवाला, मृत्युपत्र, साठेकरार, खरेदीखत, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
तारीख :-६ फेब्रुवारी २०२६.

सही/-
**ॲड. तारा रमेश देशमुख**
ऑफीस पत्ता. धापया मंदिर रोड
कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा. ९३७२४२७८९०/७२७६६०२३२५

### जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे रेवदंडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१०४, हिस्सा नं.२अ/२ क्षेत्र ०.०५.०० (हे.आर), आकार. रू.५०.०० पैसे या बिनशेती मिळकतीवरील रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील बांधण्यात आलेल्या 'वक्रतुंड रेसिडेन्सी हौ.कॉ.सोसायटी.' या इमारतीतील बी विंग पहिल्या मजल्यावरील सदनिका क्र.१०४, क्षेत्र ४३९.३१ चौ.फुट बिल्टअप, (४०.८२ चौ.मीटर)(रेवदंडा ग्रामपंचायत घर क्र. ३३८२/१२) ही मिळकत आज सौ. सुमन शरद खैरे, रा.निल दर्शन रूम नं. २ प्लॉट नं. ९० एमसीसीएच सोसायटी पनवेल ता. पनवेल जि. रायगड. यांच्या नावे असेसमेंट रेकॉडला नोंदलेली आहे. सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस सदर मिळकत विकत देण्याबाबत व्यवहार ठरविला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझ्या आशिलांस दिला आहे. सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, भाडेकरार, ताबेकब्जा वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- ०५/०२/२०२६.

**(ॲड. प्रतिमा पी. खोत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी.स्टॅण्डजवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड,
९९२१२५४६३०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेले मालक श्री.नरेश कुमार झा यांचेकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्याअनुशंगाने आम्ही श्री.नरेश कुमार झा यांचे मालकी हक्क तपासणी करत असून त्यांनी सदरील मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, पतसंस्थेचा, खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र, लिस पेंडन्स वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-सालवड, ता.कर्जत जि.रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौमी | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री.नरेश कुमार झा | ६० | १ | १-९६-३० पैकी १-३०-८६ | १२-३४ |

सदरील मिळकतीस चतुःसीमा येणेप्रमाणे
पूर्व :- सर्वे नं.६१
पश्चिम : सरकारी रस्ता
दक्षिण: सर्वे नं.६२
उत्तर :- सर्वे नं.१२
जिचा उल्लेख हा 'सदरील मिळकत' असा केलेला आहे.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दिनांक:- ०७ फेब्रुवारी २०२६

सही/-
**वशी ॲन्ड वशी**
ॲडव्होकेट आणी सॉलिसिटर्स
३, वाडीया बिल्डींग, पहीला मजला,
१७/१९, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००००१.
communicate@vashi.in

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे रामराज, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक मोहित याकूब गुंजा यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे बोलणी चालू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|
| मौजे रामराज, ता.अलिबाग, जि. रायगड | १२७/४ | १-२०-०० | १.७४ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस देणेकामी बोलणी चालू आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक : ०६/०२/२०२६

**ॲड.प्रसाद नलावडे व ॲड.नितेश वाघ**
कार्यालयः २०२, गोपाल भवन, कोर्टनाका,
ठाणे, टेंभे नाका, ठाणे (प) - ४००६०१
मोबा.क्र. ९१३७९१६८८७/९०२८९९९१४०

### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजेत. शिक्षणाची अट नाही. ठिकाण– बामणसुरे, चोंढी, पगार– १२००० महिना, संपर्क : ९८२३५८५३२१**
- **कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९**
- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रेस्टॉरंट मॅनेजर,रिसेप्शनिस्ट,कॉन्टिनेंटल,मेन्टेनन्स,वेटर, हाऊसकिपींग, रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल – ७५५९१८४६१२**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिन्यांचे नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)






## राशीभविष्य

- **मेष** : गैरसमजातून वाद-विवाद संभवतात. माता-पित्याची चिंता राहील. मानसन्मानाचे योग आहेत.
- **वृषभ** : व्यवसायात मोठी प्राप्ती होईल. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल. सार्वजनिक क्षेत्रात विचारानं रहावं.
- **मिथुन** : पूर्वीच्या गुंतवणुकीचे उचित लाभ घेता येतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळा.
- **कर्क** : डोळ्यांचे विकार संभवतात. यंत्र, वाहनात बिघाड त्रासदायक ठरेल. व्यवसायातील प्राप्तीत वाढ होईल.
- **सिंह** : आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. कौटुंबिक कलह वेळीच दूर करावे. व्यवसायात अडचणी येतील.
- **कन्या** : भाग्योदयाचा कालावधी आहे. प्रकृतीच्या तक्रारी दूर होतील. स्थावर, वाहन सौख्य लाभणार आहे.
- **तूळ** : विवाहाच्या प्रयत्नांना यश लाभेल. लहान मुलांबाबत चिंता राहील. सरकारी कामं मनाजोगी होतील.
- **वृश्चिक** : उत्कर्षाच्या संधी लाभतील. मुलाखतीत यश लाभेल. व्यावसायिक कर्जाला चालना मिळेल.
- **धनु** : व्यवसायात कामाचा वेग वाढेल. कौटुंबिक सौख्य लाभणार आहे. बँकांची कामं मार्गी लागणार आहेत.
- **मकर** : अचानक धनलाभाचे योग आहेत. खेळाडू, कलावंतांना उत्तम लाभ होईल. पतप्रतिष्ठा वाढणार आहे.
- **कुंभ** : व्यवसायात मोठी गुंतवणूक होईल. आतापर्यंतचे प्रयत्न फलद्रुप होतील. कोर्ट प्रकरणं मार्गी लागतील.
- **मीन** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. छोटा-मोठा प्रवास घडेल. विद्यार्थ्यांची विद्याभ्यासात प्रगती होईल.

## दिनविशेष
### ७ फेब्रुवारी

- **१९३७** : १९१२ चं नोबेल मिळवणारे अमेरिकी मुत्सदी एलिहू रूट यांचं निधन.
- **१९९२** : भारतामध्ये तयार झालेली शक्ती ही पहिली पाणबुडी नौदलात दाखल.
- **२०१३** : 'व्हीआयपीं' ऐवजी महिलांना सुरक्षा द्या, सर्वोच्च न्यायालयाचे बोल.
- **२०१४** : ज्येष्ठ उद्योगपती आणि आरबीजी समुहाचे अध्यक्ष रमेश भालचंद्र गरवारे यांचं निधन.
- **२०१६** : मुंबईतील २६/११ हल्ल्यातील आरोपी डेव्हिड हेडलीची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उच्च न्यायालयात साक्ष.

## आरोग्यमंत्र
### उपकारक ग्रीन कॉफी

गेल्या काही वर्षात आपण ब्लॅक कॉफीविषयी बरंच काही वाचलं अथवा ऐकलं आहे. ब्लॅक कॉफी पिण्याचे फायदे आणि त्याचा आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम याबाबत अनेकदा चर्चाही केली असेल. मात्र गेल्या काही दिवसांपासून ग्रीन कॉफीची लोकप्रियता वाढू लागल्याचं चित्र बघायला मिळत आहे. अनेकजण रोजच्या आहारात ग्रीन कॉफीचा वापर करत असून त्याचे आरोग्यावर अनेक चांगले परिणाम होत असल्याचे अनुभव येत आहेत.



त्यामुळेच ग्रीन कॉफी म्हणजे काय हे जाणून घेणं गरजेचं आहे. ग्रीन कॉफी तयार करण्यासाठी कॉफीच्या रोपांना येणाऱ्या हिरव्या रंगाच्या बियांचा वापर केला जातो. सर्वप्रथम हिरव्या बिया तोडून त्या वेगळ्या केल्या जातात. या बिया वाळवून त्याची पावडर तयार करण्यात येते. यालाच ग्रीन कॉफी पावडर असं म्हटलं जातं. ग्रीन कॉफीपासून अनेक फायदे मिळत असल्याचं दिसून आलं आहे. लठ्ठपणावर मात, उच्च रक्तदाब आणि इतर अनेक विकारांवर नियंत्रण मिळवण्यासाठीही ग्रीन कॉफीचा उपयोग होत असल्याचं दिसून आलं आहे. सध्या खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयीमुळे अनेकजणांचं वजन प्रमाणापेक्षा वाढलेलं दिसतं. पण ग्रीन कॉफीच्या नियमित सेवनानं शरीरातील फॅट्स वेगाने कमी व्हायला मदत होते. यात अँटिओबॅसिटी घटक मोठ्या प्रमाणात असतात. त्यातील मॅक्रो न्यूट्रिएंट्स आणि कार्बोहायड्रेट यांचं प्रमाणही लक्षणीय असतं. त्यामुळे पोट भरल्याची भावना निर्माण होऊन वारंवार भूक लागत नाही.

## करून तर पाहा
### तांदळापासून साकारा कलाकृती

स्वयंपाक घरातल्या वस्तूंचा वापर करून आपण छानशी चित्र काढू शकतो. या मस्त आणि हटके कलाकृती पाहून तुमचं खूप कौतुक होईल.

**साहित्य:** तांदूळ, अल्कोहोल, खाद्य रंग, गम, कागद

**कृती:** मोठ्या बाउलमध्ये भांडंभर तांदूळ घालून त्यावर अर्धा टी स्पून अल्कोहोल चोळा. तुमचे आवडते खाद्यरंगही तांदळावर टाका. तांदळावरचा रंग वाळू द्या. तांदूळ वाळायला एक दिवसही लागू शकेल. असे वेगवेगळ्या रंगाचे तांदूळ तयार करा. यानंतर वॉटरप्रूफ मार्करचा वापर करून कागदावर चित्र काढा. रंगवायच्या पुस्तकातलं पानही घेता येईल. आता चित्राच्या एका बाजूला गम लावा. त्यावर तांदूळ चिकटवायला सुरूवात करा. तांदळाचा एक एक दाणा घेऊन चित्रावर चिकटवायला सुरूवात करा. गम वाळेपर्यंत ही कृती करत राहा. तांदूळ कसा चिकटवायचा हे तुम्ही ठरवायचं. सरळ रेषेत, त्रिकोण, चौकोन अशा आकारांमध्ये तुम्ही तांदूळ चिकटवू शकता. एक भाग पूर्ण झाला की चित्राच्या दुसऱ्या भागाला गम लावा. त्यावर याच पद्धतीचे तांदूळ चिकटवा. चित्र पूर्ण झालं की त्यावर गम ओता. यामुळे तांदूळ व्यवस्थित चिकटून राहू शकेल. चित्रं वाळू द्या.

## सौंदर्यसाधना
### उपयुक्त 'इसेंशियल ऑईल्स'

थंडी ओसरू लागल्यानंतर अनेकींना कोरड्या त्वचेची समस्या जाणवते. काहींची त्वचा मुळातच कोरडी असते. अशा वेळी काही 'इसेंशियल ऑईल्स'चा वापर करून त्वचेचा कोरडेपणा कमी करता येईल. विशेष म्हणजे ही ऑईल्स तुम्ही घरच्या घरी तयार करू शकता.

* सौंदर्यवर्धनात वर्षानुवर्षं गुलाबाचा वापर होत आला आहे. या सुगंधी फुलाचा वापर करून तुम्ही इसेंशियल ऑईल बनवू शकता. यासाठी बदामाच्या किंवा खोबरेल तेलात गुलाबाच्या पाकळ्या बुडवून ठेवा. हे तेल गुलाबाच्या पाकळ्यांसह काचेच्या बाटलीत भरून बाटली उन्हात ठेवा. दुसऱ्या दिवशी तेल गाळून पाकळ्या वेगळ्या करा. आता त्याच तेलात ताज्या गुलाबपाकळ्या बुडवून आधीची प्रक्रिया पुन्हा करा. दोन ते तीन वेळा ही कृती केल्यानंतर तेल गाळून घ्या. हे तेल नियमितपणे चेहऱ्याला लावल्याने त्वचेचा कोरडेपणा दूर होईल. **(क्रमश:)**

## पंचांग

**शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ कृ. ६, चंद्रराशी : कन्या,
नक्षत्र : चित्रा, योग : शूल,
सूर्योदय ७.१३, सूर्यास्त ६.३३

## फॉरवर्डस

**कुछ कश्तियाँ डुब जातीं हैं अपनीं हीं सुराखों क़ी वजह से...**

**यूँ हर बार इल्ज़ाम साहब तूफानों पर लगाना ठीक नहीं...!**

## फॅशन पॅशन

* बंदुकीच्या आकाराचे कफलिंक्स मिळतात. त्यांना 'शॉटगन कफलिंक्स' असं म्हटलं जातं. हा प्रकारही खूप वेगळा आहे. * गडद रंगाच्या सूटवर साजेसे कफलिंक्स हवेत. फ्लोरल डिझाइनचे सिल्व्हर कफलिंक्स यावर उठून दिसतील. * कोणत्याही शर्टवर कॅरी करता येतील, असे कफलिंक्स तुमच्याकडे हवेत. गोल्ड आणि ब्लॅक कफलिंक्स कुठल्याही रंगाच्या शर्टबरोबर चालून जातील. * फिकट रंगाच्या शर्टसोबत हिरवे कफलिंक्स कॅरी करा. ऑफिसमध्ये जाताना हा रंग खूपच भारी वाटेल. * नेव्ही ब्लू कफलिंक्सही खूप छान दिसतात. मिक्स ॲण्ड मॅच करून तुम्ही ते वापरू शकता.

## फिटनेस फंडा
### स्ट्रेचिंगविषयी जाणून घ्या

दोस्तांनो, आजकाल वाढतं प्रदूषण, वाहतुकीची समस्या तसंच अन्य काही कारणांमुळे पुन्हा सायकलचा वापर वाढीस लागला आहे. व्यायामाच्या दृष्टीनेही सायकलिंग महत्त्वाचं ठरतं. विशेषत: वजन कमी करण्यासोबतच हृदय आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही सायकलिंगचे बरेच लाभ आहेत. पण सतत पॅडल मारत राहिल्यामुळे तसंच बराच काळ एकाच स्थितीत बसून राहिल्यामुळे पाय आणि मानेवर प्रचंड ताण येतो. स्नायू दुखायला लागतात. मात्र स्ट्रेचिंगद्वारे हा त्रास कमी करता येतो. नियमित सायकलिंग करणाऱ्यांनी शरीर ताणणारे व्यायाम करायला हवेत त्याविषयी माहिती घेऊ...



* स्वॅड स्ट्रेचसाठी सरळ उभे रहा. दोन्ही पाय पसरवा. उजवा पय वर न्या आणि उजव्या हातांनी टाच धरा. टाचेला धरून पाय ओढा. पायाच्या पुढच्या बाजूला ताण जाणवायला हवा. अशाच पद्धतीने डावा पाय ताणण्याचा व्यायाम करा.

* हॅमस्ट्रिंग यात स्नायूला ताण द्यायला हवा. यासाठी पाय समोरच्या एखाद्या सपाट पृष्ठभागावर ठेवा. यासाठी स्टूल, टेबल किंवा भिंतीचा आधार घेता येईल. पाय सरळ करा. अंगठा आणि बोटं वरच्या बाजूला ताणली जावी. आता थोडं पुढे वळून घोट्याच्या भागावर हाताने दाबा.

* सतत सरळ बघितल्यामुळे मानेवर ताण येतो. यासाठी मानही ताणावी. चेहरा उजव्या आणि डाव्या बाजूला नेऊन मानेवर थोडा ताण द्या. यामुळे मानेला आराम मिळेल.

## खेचाखेची
### पास-नापास

ना पास होण्याची खुशी,

ना नापास होण्याचा गम,

जो पर्यंत आहे दम, फॉर्म भरेंगे हम.

.

.

.

– अखिल भारतीय एक दोन विषयात नापास संघटना...

## वेगळं काही

ब्रिटनच्या डेब्रा गॉडर्ड या महिलेला हिऱ्याची अंगठी घालायची खूप इच्छा होती. पण पैशांअभावी तिने हिऱ्यासारखी दिसणारी बनावट अंगठी घेतली. यासाठी तिला अवघे १० पाउंड लागले. ३३ वर्षांनंतर ही अंगठी विकून पैसे मिळवण्याचा विचार तिच्या मनात आला. पण प्रत्यक्षात ती अंगठी खऱ्या हिऱ्याची होती. एवढी वर्षं खोटी म्हणून वापरत असलेली ही अंगठी खऱ्या हिऱ्याची असल्याचं कळल्यानंतर डेब्राला धक्काच बसला. या अंगठीत २६.२७ कॅरेटचा हिरा असल्याचं तिला सांगण्यात आलं. रत्नांची पारख करणाऱ्या तज्ज्ञाने तिला अंगठीचा लिलाव करण्याचा सल्ला दिला. या दरम्यान, हिरा खूप दुर्मीळ असल्यामुळे अंगठीला प्रचंड किंमत मिळाली.

## समुपदेशन
### व्यवहारांप्रती व्हावं साक्षर

* मी ३० वर्षांची महिला आहे. आम्ही दोघंही कमावत असल्यामुळे महिन्याकाठी घरात मोठी रक्कम येते. पण त्या मानाने पुरेशी गंगाजळी साठलेली नाही याचं दु:ख आहे. पतीने आर्थिक व्यवहाराची सर्व सूत्रं स्वत:च्या हातात ठेवली आहेत. तो स्वत:ला शेअर बाजाराचा जाणकार समजतो आणि अतिआत्मविश्वासाने शेअर्समध्ये भरपूर पैसे गुंतवतो. पण या नादापायी आजवर चार वेळा जबर नुकसान सहन केलं. या अनुभवानंतरही त्याला शहाणपण आलेलं नाही. तो स्वत:बरोबर माझी कमाईदेखील पणाला लावतो. यातून आमच्यात खूप भांडणं होतात. काय करु? त्याला कसं समजावू?



– शेअर बाजारातल्या व्यवहारांचं सखोल ज्ञान न घेता ऐकिव माहितीच्या आधारे पैसे गुंतवणारे आणि नुकसान झेलणारे अनेकजण आहेत. तुझा पतीही त्यातलाच. या बेहिशेबी वागण्याला आवार घाल. ही गुंतवणूक जाणकाराच्या सल्ल्याने करण्याविषयी आग्रह धर. ऐकत नसेल तर तुझा पगार त्याच्या हाती देणं तात्काळ थांबव. तू स्वत: आर्थिक व्यवहारांप्रती साक्षर हो आणि गुंतवणुकीचे निर्णय स्वत: घे. एखाद्या जवळच्या मित्राने अथवा नातेवाईकाने समज दिल्यास त्याला चूक समजेल का, याचा विचार कर. कदाचित त्यामुळे तो भानावर येऊन तुमच्यातली भांडणं कमी होतील.

## सुडोकू ६३ [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २ | | | | ४ | ३ | | |
| ९ | | | | २ | | | | ८ |
| | | | ६ | | ९ | | ५ | |
| | | | | | | | | १ |
| | ७ | २ | ५ | | ३ | ६ | ८ | |
| ६ | | | | | | | | |
| | ८ | | २ | | ५ | | | |
| १ | | | | ९ | | | | ३ |
| | | ९ | ८ | | | | ६ | |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६२ चे उत्तर [redacted]

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ५ | २ | ८ | ४ | १ | ९ | ७ | ६ |
| ९ | ७ | ६ | ५ | ३ | २ | ४ | १ | ८ |
| ४ | ८ | १ | ९ | ६ | ७ | २ | ५ | ३ |
| ७ | ३ | ८ | २ | १ | ९ | ६ | ४ | ५ |
| २ | १ | ४ | ३ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ५ | ६ | ९ | ७ | ८ | ४ | ३ | २ | १ |
| ८ | ९ | ३ | ४ | ७ | ५ | १ | ६ | २ |
| ६ | ४ | ५ | १ | २ | ३ | ८ | ९ | ७ |
| १ | २ | ७ | ६ | ९ | ८ | ५ | ३ | ४ |

## शब्दकोडे क्रमांक ६३

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ■ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ८ | |
| | ■ | ९ | १० | | ■ | ११ | | | | ■ | १२ | | ■ |
| १३ | १४ | | | ■ | १५ | | | ■ | १६ | १७ | | ■ | १८ |
| १९ | | ■ | २० | २१ | | | ■ | २२ | | | ■ | २३ | |
| ■ | २४ | २५ | ■ | २६ | | ■ | २७ | | ■ | २८ | २९ | | |
| ३० | | | ■ | ■ | ३१ | | | ■ | ३२ | ■ | | ■ | |
| ३३ | | ■ | ३४ | ३४अ) | | ■ | ३५ | | | | ■ | ३६ | |
| | ■ | ३७ | ■ | | ■ | ३८ | | ■ | | ■ | ३९ | ■ | |
| ४० | | | ४१ | | ४२ | ■ | ४३ | ४४ | | ४५ | | ४६ | ■ |
| | ■ | ४७ | | ■ | ४८ | ४९ | ■ | | ■ | | ■ | ५० | ५१ |
| ■ | ५२ | | | ५३ | ■ | ५४ | ५५ | | ५६ | | ५७ | ■ | |
| ५८ | | ■ | ५९ | | | | | ■ | | ■ | ६० | | |
| ६१ | | ६२ | ■ | | ■ | | ■ | ६३ | ■ | ■ | | ■ | |
| | ■ | ६४ | | | | ■ | ६५ | | | | | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) लुच्चा माणूस, फसव्या
३) दैववान
६) टेहळणी करणारा
९) अति सैल झालेले वस्त्र
११) नाटकातील पात्रे रंगविण्याची जागा
१२) भांडे, पाणी पिण्याचे पात्र
१३) श्रेष्ठ पुरुष
१५) बाज विणण्याची सुती पट्टी
१६) मजबूत, दणकट
१९) एक दागिना
२०) अटीतील जोडीने येणारे शब्द
२२) शोभणारा
२३) आईस्क्रिमचा निमुळता कप
२४) पाणी
२६) अंधार
२७) हात
२८) नव्वद अंशाच्या आतील कोन
३०) पोरका
३१) स्तोत्र, स्तुतीची गाणी
३३) संगत, बरोबर
३४) चालविणारा
३५) कानाच्या आकाराची करंजी
३६) निवासस्थान
३८) नृत्य
४०) संथपणे, इकडे तिकडे पाहत
४३) भरभराट, उत्कर्षाचा काळ
४७) कालच्या आधीचा दिवस
४८) पाणी, दूध
५०) किंमत, प्रत्येक
५२) अर्थात, खात्रीने
५४) माता पिता
५८) पृथ्वी
५९) खर्चाकरीता मोघम काढलेली रक्कम
६०) तंबाखू
६१) साधारण
६४) हरविलेले सापडणे
६५) तत्काळ, फार त्वरेने....

**उभे शब्द :-.**
१) चिमुकला, छोटासा
२) गर्दभ
३) कपाळ
४) सदोदित, एकसारखे
५) शहर, गाव
६) नृत्यकलेचे दैवत
७) घोड्यावरुन मारलेली फेरी
८) लहान मुलगी
१०) नड, आवश्यकता
१४) चंद्र १
५) मान खाली घालणे
१७) भयंकर
१८) जन्म-मृत्यू
२१) रममाण, निमग्न
२२) तात्पर्यार्थ, सारांश
२३) एक सुगंधी उष्ण पेय
२५) पौराणिक अश्ववाहन
२७) सोन्याचा पर्वत
२९) अबोल, कमी बोलणारा
३०) असामान्य
३२) कर्ज देणारा, धनको
३४अ) घोड्याला आवर घालणारी चामड्याची वादी
३७) भूतकाळ
३९) मैत्री
४१) जहाज
४२) बारा वर्षाचा काळ
४४) कापडाचा एक प्रकार
४५) जम
४६) दात
४९) यज्ञ करणारा, नवरा
५१) रोग्यास रक्त देणे
५२) अप्राप्य, अलभ्य
५३) नासाडी, नाश, हानी
५५) नम्र, वाकलेला
५६) लोक, प्रजा
५७) झोपमोड
५८) दक्षिणा वाटण्याची जागा
६२) नंतर
६३) उंटाची मादी, पोळ.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| का | व | ळा | | दे | | उ | प | का | र | | वा | प | र |
| या | न | | से | व | क | | र | | वा | स | रू | | ब |
| पा | | दा | वा | | व | न | वा | स | | न | | च | र |
| ल | हा | न | स | हा | न | | न | व | ल | वि | शे | ष | |
| ट | र | | द | र | | सं | गी | त | | वि | | क | प |
| | जी | व | न | | स | ध्या | | | गु | | रा | | गा |
| अं | त | र | | चा | | स | ही | स | ला | म | त | | र |
| त | | मा | ल | क | | म | | द | म | | रा | | दा |
| | सा | य | | व | | य | व | न | | क | णी | दा | र |
| क | व | | ख | त | रा | | र्षा | | ख | डा | | वा | |
| | धा | ड | स | | ज | ना | व | र | | स | गा | | ज |
| वा | न | र | | मा | | मां | | च | ल | न | व | ल | न |
| | ता | | ख | ल | ब | त | खा | ना | | | रा | | ग |
| कां | | चा | ल | क | | र | स | | न | य | न | बा | ण |



# कलासक्त



# अभिनय कलेतील नृत्यविशारद भगवान दादा



**'शामढले खिडकी खूले तूम सीटी बजाना छोड दो' 'अलबेला' चित्रपटातील हे गाणे ऐकताना थिएटरमधील रसिकांना मंत्रमुग्ध करून थिरकायला लावणारा दादा माणूस म्हणजे भगवान दादा. चेहऱ्यावरील विशिष्ट हावभाव आणि नृत्याच्या वेगळ्या शैलीमुळे रसिकांनी डोक्यावर घेतलेले ज्येष्ठ अभिनेते भगवान आबाजी पालव ऊर्फ मास्टर भगवान ऊर्फ भगवानदादा. भगवान दादांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत अनेक अप्रतिम चित्रपट दिले. परंतु मायानगरीतील बेहिशेबी दुनियेतील व्यवहार अनाकलनीय असतात. सामान्यातील असामान्यत्व टिपून यशोशिखरावर बसविणारी ही चमकती दुनिया एका क्षणात त्याला पुन्हा सामान्यत्व बहाल करते.**

श्रीराम शेटये

मध्यमवर्गीय मराठी घरात जन्मलेल्या भगवानदादांचं आयुष्य एक दंतकथा वाटावं असंच होतं. तब्बल पासष्ट वर्ष ते या मायानगरीमध्ये होते. सिनेमाच्या बेहिशेबी दुनियेत त्यांनी कलेचं सर्वोच्च टोक गाठलं होतं. पण व्यवहारी आणि मतलबी दुनियेचे हिशेब त्यांना कधीच समजले नाही. भगवान दादांचा जन्म १ ऑगस्ट १९१३ मध्ये महाराष्ट्रातील अमरावती येथे झाला. त्यांचे बालपण दादर आणि परळच्या मजूर भागात गेले. चित्रपटाच्या वेडापायी दादांनी चौथी इयत्तेमध्येच शाळेला रामराम ठोकला आणि स्टुडिओचा रस्ता धरला. तो जमाना होता मूकपटांचा. परंतु, चित्रपटांत काम मिळणं सोपं नव्हतं. अखेरीस भगवानदादा कापड गिरणीत मजूर म्हणून काम करू लागले. काम करत असतानाच भगवान दादांचा अभिनयाकडे कल होता. त्या काळातील अभिनेते मास्टर विठ्ठल हे भगवानदादांचं दैवत. त्यामुळे चित्रपटात स्टंटबाजी, फाइट सीन्स करायची स्वप्नं पाहत भगवानदादांनी आपल्या शरीरावर, व्यायामावर मेहनत घ्यायला सुरूवात केली.

त्यांना रजतपटावर सर्वप्रथम चमकण्याची संधी मिळाली, ती १९३० मध्ये निर्माता सिराज अली हकीम यांच्या 'बेवफा आशिक' या मूकपटामध्ये. मात्र हा चित्रपट यशस्वी होऊनही या चित्रपटानंतर आठ-नऊ महिने भगवानदादांना नवे चित्रपट मिळण्यासाठी स्ट्रगल करावा लागला होता. आणखी काही मूकपटांमध्ये त्यांनी कामे केली. भगवानदादांचा पहिला बोलपट होता, 'हिम्मत-ए-मर्दा.' नंतरच्या काळात भगवानदादा लोकप्रिय अभिनेता तर बनलेच; शिवाय त्यांनी चित्रपटनिर्मिती आणि दिग्दर्शन यामध्येही नाव कमावले.

भगवान दादांच्या कारकिर्दीला महत्त्वपूर्ण वळण मिळाले जेव्हा त्यांनी १९३८ मध्ये 'बहादूर किसान' या चित्रपटाचे त्यांनी सह-दिग्दर्शन केले. १९३८ ते १९५० या काळात त्यांनी कमी खर्चाच्या स्टंट आणि ॲक्शन चित्रपटांची मालिका दिग्दर्शित केली. यात गुनहगार (१९३९), जयकोडी (१९४०), राजा गोपीचंद (१९४१), सुखी जीवन (१९४२), बदला (१९४३), बहादूर (१९४४), नगमा-ए-सहारा (१९४५), दोस्ती (१९४६), शेक हँड्स (१९४७), मतवाले (१९४७), बहादूर प्रताप (१९४७), मतलब (१९४८), लालच (१९४८), जाल (१९४८), भेदी बंगला (१९४९), बचके रहना (१९४९), जिगर (१९४९), भोले भाले (१९५०), बेबस (१९५०) बाबूजी (१९५०). हे चित्रपट तत्कालीन कामगार वर्गाने डोक्यावर घेतले. त्यांच्या कारकिर्दीतील पहिले उल्लेखनीय कार्य म्हणजे एम. के. राधा आणि श्रीलंकेची अभिनेत्री तवामणी देवी अभिनीत 'वन मोहिनी' (१९४०) हा तमिळ चित्रपट होता.

आपल्या 'जागृती पिक्चर्स' या चित्रपट संस्थेद्वारा त्यांनी अनेक चित्रपटांची निर्मिती केली. इतकंच नाही, तर स्वतःचा चेंबूर इथे जागृती स्टुडीओ १९४७ साली उभारला. मात्र पुढे गोरेगावला त्यांच्या गोडावूनला आग लागली आणि त्यात सर्व जळून भस्मसात झाले. ज्या सिनेमांनी दादाला वैभवाच्या शिखरावर नेले ते सर्व सिनेमे आगीच्या भक्ष्य स्थानी पडले. रसिकांच भाग्य थोर त्यात 'अलबेला' ची प्रिंट सुखरूप राहिली. त्यामुळे आज भगवान दादाच्या स्टंट सिनेमाची आठवण इतिहास जमा झाली असली तरी त्याच्या कारकिर्दीला 'चार चांद' लावणारा 'अलबेला' शाबूत राहिला.

१९५१ मध्ये प्रदर्शित झालेला अलबेला हा चित्रपट आजही व्यावसायिक चित्रपटांच्या गर्दीत त्यातील 'शोला जो भडके, दिल मेरा धडके' किंवा 'भोली सूरत दिल के खोटे, नाम बडे और दर्शन छोटे' ही गाणी ऐकताना तरुणाईलाही ठेका धरायला लावते. सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेले या चित्रपटाचे संगीत प्रतिष्ठित झाले आणि त्यात 'किस्मत की हवा कभी नरम', 'बलमा बड़ा नादान रे', 'शाम ढले खिडकी तले', 'धीरे से आजा री अंखियों में' आणि 'दिल धडके नजर शर्माये' ही गाणी आजही संस्मरणीय आहेत. 'अलबेला' हा ब्लॉकबस्टर हिट चित्रपट होता आणि त्याने भगवानदादांना भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता म्हणून स्थापित केले.

'अलबेला'ने इतिहास घडविला. नृत्य संगीताचा अभिनव अविष्कार घडवीत भारतीय सिनेमाला पहिला डान्सिंग ॲक्टर मिळवून दिला. सोशल फिल्मद्वारे प्रथमच पडद्यावर आलेल्या दादांना प्रेक्षकानी स्वीकारले. पूर्वीच्या त्यांच्या सिनेमात नायिकेला फारस महत्व नसायचे. त्यामुळे कोणतीही मुलगी नायिका म्हणून चालून जायची, पण अलबेलाची गोष्टच निराळी होती. भगवानदादांनी नायिकेच्या भूमिकेकरिता १९५० साली गीताबाली यांना ३५००० रुपये देवून साईन केले होते. सुरुवातीचेच 'महफ़िल में मेरी कौन ये दिवाना आ गया दिवाना आगया', 'जब शम्माने पुकारा तो परवाना आ गया' या गीतावर प्रेक्षक निहायत खूष होवून पडद्यावर पैसे फेकत असत. 'बलमा बडा नादान रे' या मुजरा गीताला दादांनी चक्क प्रेम गीत बनवून त्या पद्धतीने पिक्चराईज केले. 'शाम ढले खिडकीतले तुम सिटी बजाना छोड दो' या गीताने तर सिनेसृष्टीत छेडछाडवाल्या गीतांचा आरंभ केला. 'ओ बेटाजी किस्मत की हवा कभी नरम कभी गरम' या गीतातील भाड्यांचा आवाज टाकण्याची कल्पना पूर्णतः दादाची होती. 'भोली सूरत दिल के खोटे नाम बडे और दर्शन छोटे' आणि 'शोला जो भडके दिल मेरा धडके, दर्द जवानीका सताये बढ बढ के' या गाण्याने पुढच्या तीन पिढ्या नादावल्या होत्या. यातील 'शोला जो भडके' हे गीतव सिनेमाच्या अगदी शेवटी येते. खरं तर नायक नायिकांचे मिलन झाल्यावर सिनेमा संपायला हवा, पण नेमकं त्याच क्षणी हे गीत चालू होते. जसं आज कालच्या चित्रपटांना टायटल साँग असते त्याप्रमाणे. गाणं सुरु होत असे आणि आख्ख थिएटर नाचू लागे. गीतकार राजेंद्र कृष्ण आणि संगीतकार सी रामचंद्र यांच्या कारागिरीचा हा सर्वोच्च बिंदू ठरला. अण्णांनी संगीतात बोंगो ड्रम, बेंजो, क्लॅरोनेट, ट्रम्पेट, सॅक्सोफोन ही सारी पाश्चात्य वाद्ये वापरली होती. याचाच अर्थ भारतीय सिनेमात खऱ्या अर्थाने पाश्चात्य संगीत आणि डान्स रुजविण्याचे काम भगवान दादांच्या 'अलबेला' या चित्रपटाने केलं.

चित्रपटनिर्मिती -अभिनय यांद्वारा भगवानदादांनी भरपूर पैसे कमावले. त्या काळात जुहू चौपाटी परिसरात त्यांचा २५ खोल्यांचा बंगला होता आणि आठवड्याच्या प्रत्येक दिवशी वेगळी, असा सात गाड्यांचा ताफा त्यांच्याकडे होता. मात्र, हे दिवस बदलायला वेळ लागला नाही. ''अलबेला' हा सुपरहिट चित्रपट बनवल्यानंतर भगवानदादांनी 'रंगिला '(१९५३),' 'झमेला' (१९५३), 'हल्लागुल्ला' '(१९५४), 'प्यारा दुश्मन' (१९५५), 'भागमभाग' '(१९५६),' 'कर भला' (१९५६), 'पासिंग शो' (१९५६), 'भला आदमी' (१९५८), 'सच का बोल बाला' (१९५८), 'शोला जो भडके' (१९६१), 'हम दिवाने'(१९६५) आणि 'अलाबेला' (१९६६) या चित्रपटांची निर्मिती व दिग्दर्शन केले. दुर्दैवाने, हे चित्रपट बॉक्स ऑफिसवर पार गारद झाले. कारण अलबेलाच्या धर्तीवरच हे चित्रपट होते. तोच तो पणा आल्याने व चित्रपटसृष्टीत होणारे बदल न स्वीकारल्याने हे चित्रपट अयशस्वी झाल्याचे म्हटले जाते. सतत मिळणाऱ्या अपयशाने भगवानदादा खचले. मोठ्या प्रमाणात कर्जात बुडाले. त्यांच्या २५ खोल्यांचा वॉटरफ्रंट बंगला आणि त्याच्या सात गाड्यांचा ताफा त्यांना विकावा लागला. त्यानंतर मात्र त्यांनी निर्मिती दिग्दर्शन सोडले. मग भगवानदादांनी चित्रपटात साइड रोल, छोट्या भूमिका करायला सुरुवात केली. 'झनक झनक पायल बाजे' (१९५५), 'चोरी चोरी' (१९५६) आणि 'गेटवे ऑफ इंडिया' (१९५७) या चित्रपटातून त्यांनी छोट्या मोठ्या भूमिका केल्या. मात्र, त्यांच्या मद्यपानाच्या सवयीमुळे अनेक निर्माते पैशांऐवजी दारूच्या बाटल्या देऊन त्यांची बोळवण करीत असत. मात्र, भगवानदादांसारखे नृत्य करता यावे, म्हणून अमिताभ बच्चन, मिथुन चक्रवर्ती, गोविंदा हे कायम धडपडत राहिले.

भगवान दादा शेवरले कारचे शौकीन होते. यामुळेच त्यांनी 'शेवरले' नावाच्या चित्रपटातही काम केले होते. दादांकडे ७ गाड्या होत्या आणि ते रोज नवीन गाडीने सेटवर जात असत. एक किस्सा असाही आहे की, त्यांनी दिग्दर्शित केलेल्या एका चित्रपटातील एका दृश्यात त्यांना पैशांचा पाऊस दाखवायचा होता आणि त्यासाठी त्यांनी खऱ्या नोटांचा वापर केला होता.

१९४२ मध्ये 'जंग-ए-आझादी' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान भगवान दादांना ललिता पवार यांना थोबाडीत मारायची होती. पण त्यांनी ललिता पवार यांना एवढे जोरात मारले की ललिता पवार जखमी झाल्या आणि त्यांच्या डाव्या डोळ्यातील रक्तवाहिनी आतून फुटली आणि त्यांच्या तोंडाच्या डाव्या बाजूला अर्धांगवायू झाला. तीन वर्षे त्यांच्यावर उपचार करण्यात आले, पण त्यांचा डोळा बरा होऊ शकला नाही. तेव्हापासून ललिता यांनी नायिकेच्या नव्हे तर नकारात्मक भूमिका करायला सुरुवात केली. मात्र, भगवान दादांना या अपघाताबद्दल आयुष्यभर पश्चाताप झाला.

किशोरकुमारला घेऊन बनवीत असलेल्या 'हसते रहना' या चित्रपटाची निर्मिती करताना त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, की चित्रपटाचे नाव 'हसते रहना' असले, तरी त्यांच्यावर रडायची पाळी आली. कारण या चित्रपटासाठी त्यांनी आपली सर्व बचत, बायकोचे दागिने खर्च केले; एवढे करूनही चित्रपट पूर्ण झालाच नाही. काही काळातच बंगला, गाड्या विकून भगवानदादा त्यांनी लहानपण घालवले होते त्या दादरच्या लल्लूभाई मेंशन या चाळीत दोन खोल्यांमध्ये राहू लागले. एके काळी जेवणाच्या, दारूच्या पार्ट्यांसाठी त्यांच्या बंगल्यात जमत असलेली मंडळी, ते कफल्लक झाल्यावर त्यांना भेटीनाशी झाली.

लल्लूभाई मेंशनच्या परिसरात त्यांचा जबरदस्त बोलबाला होता. कोणत्याही धर्माचा समारंभ दादा शिवाय पुरा होत नसे. एकेकाळी एका स्टुडिओचे मालक असलेले दादा बंगला, गाडी असे सर्व काही ऐश्वर्य उपभोगत होते. मात्र ते चाळीला विसरले नव्हते. पुढे काळ बदलला. दादांवर रोजंदारी आर्टीस्ट म्हणून नवोदित कलाकारांसमवेत काम करण्याची वेळ आली. मात्र अहंकाराची अजिबात बाधा नसलेल्या दादांनी ऐश्वर्य आणि गरीबी एकाच मापात मोजली. कित्येक कलाकारांची आयुष्य त्यांनी घडवली.

काळ कोणासाठी थांबत नाही. एका काळी शिखरावर असलेले दादा कफल्लक झाले होते. शेवटचा काळ खूपच यातनामय होता. एका असामान्य कलाकारांच्या आयुष्यात अशी वेळ यावी ही दादांच्या चाहत्यांसाठी खरेच मनाला हुरहूर लावणारी घटना होती. ●●


# अजितदादांना श्रद्धांजली



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला असताना, बिग बॉस मराठी ६ च्या मंचावरही त्यांचे स्मरण करण्यात आले. यावेळी भाऊचा धक्का विशेष भागाची सुरुवात अभिनेता आणि सूत्रसंचालक रितेश देशमुख याने अजित दादांना भावूक श्रद्धांजली अर्पण करून केली. महाराष्ट्र नि:शब्द झालाय! कार्यक्रमाच्या सुरुवातीला रितेश देशमुख अत्यंत भावूक झाला होता. तो म्हणाला, '२८ जानेवारीचा सूर्य सकाळ घेऊन येण्याऐवजी काळरात्र घेऊन आला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय अजित पवार जी यांचे अपघाती निधन झाले. ही घटना केवळ राजकीय हानी नाही, तर ती माझ्यासारख्या अनेक महाराष्ट्रप्रेमींना वेदना देणारी आहे. ते फक्त उपमुख्यमंत्री नव्हते, तर ते आपले लाडके दादा होते.' रितेशने अजित पवारांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना म्हटले की, शब्दांनी, शैलीने आणि नजरेतील धाकाने समोरच्याला नि:शब्द करण्याची ताकद तुमच्यात होती. पण तुमच्या जाण्याने आज अख्खा महाराष्ट्र नि:शब्द झाला आहे. तुमचे व्यक्तीमत्व म्हणजे शिस्त, माया आणि सामाजिक जाणिवेचा त्रिवेणी संगम होता. अनेक वर्ष रखडलेली कामे तुमच्या एका आदेशावर मार्गी लागायची. तुम्ही खऱ्या अर्थाने सामान्य माणसाच्या आयुष्यातील कामाचा माणूस होता. अजित पवारांच्या निधनानंतर सोशल मीडियावरही त्यांच्या चाहत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी मोठी हळहळ व्यक्त केली आहे.


# 'राजासाब'सह अनेक बिगबजेट ओटीटीवर

फेब्रुवारी महिन्याचा पहिला आठवडा ओटीटी प्रेमींसाठी अत्यंत खास ठरणार आहे. ६ फेब्रुवारी रोजी नेटफ्लिक्स, जिओ हॉटस्टार आणि प्राइम व्हिडिओ यासारख्या प्रमुख प्लॅटफॉर्मवर अनेक बिगबजेट चित्रपट आणि बहुप्रतिक्षित वेब सिरीज प्रदर्शित होत आहेत. चित्रपटगृहातील गर्दी टाळून घरबसल्या दर्जेदार सिनेमा पाहणाऱ्या प्रेक्षकांसाठी ही मोठी मेजवानी ठरणार आहे. या आठवड्यातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे साऊथ सुपरस्टार प्रभासचा द राजा साब. थिएटरमध्ये धुमाकूळ घातल्यानंतर आता ६ फेब्रुवारीपासून हा हॉरर-कॉमेडी चित्रपट जिओ हॉटस्टार प्रसारित होणार आहे. तेलगू, तमिळ, हिंदीसह एकूण पाच भाषांमध्ये हा चित्रपट उपलब्ध असून, यात प्रभासचा एक वेगळा अवतार प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. तसेच तमिळ स्टार शिवकार्तिकेयन यांचा सामाजिक-राजकीय ड्रामा पाराशक्ती हा चित्रपट झी ५ वर याच दिवशी प्रदर्शित होत आहे. नेटफ्लिक्सवरही जागतिक स्तरावरील कंटेंटची रांग लागली आहे. बुद्धिबळ सम्राज्ञी जुडित पोल्गर यांच्या आयुष्यावर आधारित 'क्वीन ऑफ चेस' ही डॉक्युमेंटरी ६ फेब्रुवारीला जगभर प्रदर्शित होईल. तसेच कायदेशीर विषयातील थरार आवडणाऱ्या प्रेक्षकांसाठी 'द लिंकन लॉयर' या लोकप्रिय मालिकेचा चौथा सीझन ५ फेब्रुवारीच्या मध्यरात्रीपासून उपलब्ध झाला आहे. निसर्गप्रेमींसाठी ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर केट विन्स्लेट यांनी सूत्रसंचालन केलेली 'फाइंडिंग हार्मोनी: अ किंग्स व्हिजन' ही डॉक्युमेंटरी विशेष आकर्षणाचे केंद्र ठरेल. याव्यतिरिक्त, कपिल शर्माचा 'किस किसको प्यार करू २' आणि दाक्षिणात्य चित्रपट 'नारी नारी नदुमा मुरारी'हे चित्रपटदेखील याच आठवड्यात ओटीटीवर दाखल होत असून फेब्रुवारी महिन्याचा हा विकेंड प्रेक्षकांसाठी फुल-ऑन एंटरटेनमेंट घेऊन आला आहे.



# सासरेबुवा प्रसाद ओक!

मराठी चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता प्रसाद ओक यांच्या घरात सध्या आनंदाचे वातावरण आहे. प्रसाद ओक आणि मंजिरी ओक यांचा मोठा मुलगा सार्थक ओक याचा साखरपुडा नुकताच पार पडला असून, तेव्हापासून ओक कुटुंबाची होणारी सून कोण, याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता याबद्दलची सविस्तर माहिती समोर आली आहे. प्रसाद ओकच्या होणाऱ्या सुनेचे नाव रितू असे आहे. रितू ही कलाक्षेत्रातील नसून ती वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहे. तिने तिचे उच्च शिक्षण जर्मनीमध्ये पूर्ण केले असून ती पेशाने एक फिजीओथेरपिस्ट आहे. विशेष म्हणजे सार्थक ओक देखील त्याच्या उच्च शिक्षणासाठी काही काळ परदेशात होता, तिथेच या दोघांची ओळख झाल्याचे बोलले जात आहे. सार्थक आणि रितूचा साखरपुडा अत्यंत थाटामाटात पार पडला. या सोहळ्याला मराठी चित्रपटसृष्टीतील स्वप्नील जोशी, समीर चौघुले, अमृता खानविलकर यांसारख्या दिग्गज कलाकारांनी हजेरी लावली होती. अभिनेत्री अमृता खानविलकरने सोशल मीडियावर या सोहळ्याचे फोटो शेअर करत या जोडीचे नाव रितू-सार्थक असल्याचे स्पष्ट केले होते. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये सासू मंजिरी ओक आपली भावी सून रितूला तयार करताना दिसत आहेत. पिवळ्या रंगाच्या नऊवारी साडीत रितूचे सौंदर्य खुलून आले असून ओक कुटुंबाने तिचे प्रेमाने स्वागत केले आहे. चाहत्यांकडून या नवीन जोडीवर आणि ओक कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. लग्नाची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही, मात्र लवकरच ओक यांच्या घरी सनईचौघडे वाजणार आहेत.





# बालांगण



## शक्तीशाली युरेनियम

**माहिती खनिजांची**

युरेनियम हा एक महत्त्वाचा पण थोडासा वेगळा खनिज धातू आहे. हा धातू जमिनीत खडकांच्या स्वरूपात सापडतो. विशेषत: काही खडक करोडो वर्षे जुने आहेत. युरेनियम काही ठिकाणी माती आणि नदीच्या तलावांमध्येदेखील आढळतो. त्याचा रंग पांढरा ते हिरवट तपकिरी असतो. युरेनियम दिसायला साधे असले तरी पण त्याच्यात खूप मोठी शक्ती लपलेली आहे. त्यामुळेच युरेनियमला जगभरात फार महत्त्व आहे. युरेनियम भारतात काही ठराविक भागात सापडते. भारतात झारखंडमधील जादुगुडा या ठिकाणी युरेनियमचा साठा आहे. याशिवाय आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि राजस्थानमध्येही युरेनियमचे साठे आढळतात. जगात कॅनडा, ऑस्ट्रेलिया, कझाकस्तान आणि रशिया हे देश युरेनियमसाठी ओळखले जातात. जमिनीतून मिळणारे युरेनियम थेट वापरता येत नाही. ते खडकांमध्ये मिसळलेले असते. खाणींतून खडक बाहेर काढून ते बारीक केले जातात. नंतर वेगवेगळ्या प्रक्रियांद्वारे त्यातील युरेनियम वेगळे केले जाते. या प्रक्रियेत खूप काळजी घ्यावी लागते. कारण युरेनियम चुकीच्या पद्धतीने हाताळले तर ते धोकादायक ठरू शकते. त्यामुळे युरेनियमचे छोटे तुकडे हाताळताना वैज्ञानिक विशेष साखळीचा वापर करतात. युरेनियमचा सर्वात महत्त्वाचा वापर वीज निर्मितीसाठी होतो. अणुऊर्जा केंद्रांमध्ये युरेनियमपासून मोठ्या प्रमाणात वीज तयार केली जाते. थोडेसे युरेनियम वापरून खूप वीज मिळू शकते. त्यामुळे कोळसा किंवा पेट्रोलियमपेक्षा युरेनियम अधिक शक्तिशाली मानले जाते. काही ठिकाणी युरेनियमचा वापर संशोधनासाठी आणि वैद्यकीय क्षेत्रातही केला जातो. युरेनियम–२३५ हा प्रकार अणुऊर्जेत उपयोगी आणि शक्तिशाली असतो.युरेनियमचा वापर जपून करावा लागतो. कारण त्यातून निघणारी ऊर्जा योग्य नियंत्रणात नसेल तर ती नुकसान करू शकते. म्हणून अणुऊर्जा केंद्रांमध्ये कडक नियम पाळले जातात आणि प्रशिक्षित लोकच तिथे काम करतात.

एकूणच युरेनियम हा अत्यंत शक्तिशाली, महत्त्वाचा आणि संवेदनशील असा खनिज धातू आहे. जबाबदारीने वापर केल्यास त्याचा देशाच्या विकासासाठी चांगला उपयोग करता येतो.

## महत्त्वपूर्ण सातपुडा पर्वतरांग

**ओळख पर्वतांची**

सातपुडा पर्वतरांग ही महाराष्ट्रातील आणि मध्य प्रदेशच्या काही भागात पसरलेली एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. या पर्वतरांगेची सुरुवात महाराष्ट्रातील भंडारा आणि नागपूर परिसरातून होते आणि मध्य प्रदेशाच्या छिंदवाडा, बुरहानपूर आणि अंर्तगत भागांतून पुढे सरकते. सातपुडा पर्वतरांग ही सह्याद्री पर्वतरांग आणि विंध्य पर्वतरांगेशी जोडलेली असून ती मध्य भारतातील भूगोलाचा महत्त्वाचा भाग मानली जाते. सातपुडा पर्वतरांग मध्यम उंचीची असून तिची सरासरी उंची सुमारे ९०० ते १३०० मीटर आहे. त्यामुळे येथील शिखरे सहसा १०००–१३०० मीटर उंचीची आहेत. धिंगणी, महादेवगड या शिखरांवरून परिसराचे विस्तृत निसर्गदृश्य दिसते. काही डोंगर सपाट माथ्याचे दिसतात. तर काही खोल दऱ्यांनी वेढलेले आहेत. नर्मदा, ताप्ती आणि पेन या नद्या या पर्वतरांगेतून उगम पावतात. नर्मदा नदी पश्चिमेकडे वाहते तर पेन आणि तापी पूर्वेकडे वाहते. त्यामुळे सातपुडा पर्वतरांग भारतातील जलसंपत्तीच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. या भागात दाट जंगले आहेत. साग, साल, बांबू यांसारखी झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात. या जंगलांमध्ये वाघ, चित्ता, हत्ती, अस्वले, हरणे यासारखे प्राणी राहतात. त्यामुळे हा परिसर जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. काही ठिकाणी राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये आहेत. ताडोबा आणि पेंच ही पर्यटकांना आणि संशोधकांना आकर्षित करणारी अत्यंत महत्वाची अभयारण्ये आहेत. गवे आणि वाघ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आढळतात. इतिहासाच्या दृष्टिकोनातूनही सातपुडा पर्वतरांग महत्त्वाची आहे. प्राचीन काळी व्यापार, प्रवास आणि सामरिक दृष्ट्या हा मार्ग महत्त्वाचा होता. रस्त्यांवर आणि घाटांवर अनेक प्राचीन किल्ले आणि वस्तीचे अवशेष आढळतात.

ही पर्वतरांग उत्तर आणि दक्षिण भारताच्या संस्कृती, जीवनशैली आणि भाषेत फरक निर्माण करण्यास कारणीभूत ठरली. आजही सातपुडा पर्वतरांग परिसरात शेती, खाणकाम, वने आणि पर्यटन महत्त्वाचे आहेत. या भागात लोखंड, मँगनीज, बॉक्साइट यांसारखी खनिजंही सापडतात. सातपुडा पर्वतरांग हा निसर्ग, इतिहास, भूगोल आणि प्राणीसंपत्ती यांचा संगम आहे आणि महाराष्ट्र तसेच मध्य भारतासाठी खूप महत्त्वाचा आहे.



## का वाटते भीती?

**रंजक विज्ञान**

आपल्याला कधी कधी अचानक भीती वाटते. कधीतरी रात्री झोपेत आवाज ऐकून आपण दचकून जागे होतो किंवा उंच बिल्डिंगमधून खाली बघताना घाबरतो. ही भीती ही आपल्या मेंदूची नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. ती आपल्याला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करते. भीतीमुळे आपल्या मेंदूत आणि शरीरात धोका आहे असा संदेश देणारी भावना निर्माण होते. मेंदूतल्या एका भागाला अमिग्डाल म्हणतात. काहीतरी धोकादायक दिसते तेव्हा अमिग्डाला लगेच सक्रिय होते आणि शरीराला लढा किंवा पळा अशी सूचना देते. त्यामुळे हृदय वेगाने धडधडायला लागते. हात–पाय थंड पडतात. डोळे मोठे होतात. भीती निर्माण होण्यामागे विशेष हार्मोन्स काम करतात. अ‍ॅड्रेनालीन आणि नॉरअ‍ॅड्रेनालीन या संप्रेरकांमुळे शरीर आणि मेंदू सतर्क राहतो. त्यामुळे हृदयाची धडधड वाढते आणि लक्ष केंद्रित होते. कॉर्टिसॉलहे संप्रेरक शरीराला ऊर्जा तयार करून तणावावर ताबा मिळवते. नंतर थोडी शांतता आणण्यासाठी सेरोटोनिनसारखी संप्रेरके सक्रिय होतात. त्यामुळे मेंदूत संतुलन राखले जाते.

खराखुर्या धोक्यामुळेच भीती वाटते असे नाही. कधी कधी फक्त कल्पना किंवा चित्रपटातील गोष्टींमुळेदेखील भीतीची भावना निर्माण होते. अंधार दिसल्यावर तिथे भूत असेल या कल्पनेने आपण घाबरतो. परंतु तसे काही नसतेच. मग शरीर तातडीने प्रतिक्रिया देते. कारण मेंदू आधीच सावध असतो. भीती आपल्याला शिकवतेही. आपण उंच इमारतीवर चढलो आणि घाबरलो, तर पुढच्या वेळी आपण अधिक सावधपणे चढतो. एखाद्या जंगलात फिरत असताना वाघ दिसल्यास आपण पटकन मागे जातो. अशा परिस्थितीत भीती आपले संरक्षण करते.

कधी कधी भीती मजेदारही ठरते. मित्रांबरोबर बसून भुतांच्या गोष्टी ऐकून आपल्याला भीती वाटते. किंवा घरातील अंधाऱ्या कोपऱ्यांमध्ये खेळताना आपण लपतो तेव्हा थोडीशी भीती वाटते. पण ही भीतीमुळे कधीकधी आपल्याला उत्साह वाटतो. मजा वाटते. ही भीती खेळ खेळायला भाग पाडते आणि मेंदू सतर्क ठेवते.भीती ही फक्त वाईट गोष्ट नाही. ती आपल्याला सुरक्षित ठेवते. शिकवते. आपण योग्य पद्धतीने भीती ओळखू शकलो तरतिची आपल्याला मदतही होते. हार्मोन्स योग्य पद्धतीने काम करतात, तेव्हा मेंदू आणि शरीर आपल्याला सावध करतात आणि आपल्याकडून योग्य प्रतिक्रिया घडवून आणतात.

## पाळणार कोणत्या जातीचं मांजर?

**नॉलेज अपडेट**



तुम्हाला घरात एखादा प्राणी पाळायला आवडेल का? त्यातही मांजर जास्त गोंडस वाटते का? मांजरं प्रेमळ, हुशार आणि स्वावलंबी असतात. कुत्र्यांच्या तुलनेत शांत असतात. त्यांना सांभाळण्यासाठी फार खर्च येत नाही. स्वच्छतेची काळजी आपली आपण घेतात. मांजर घरात एकटंही राहू शकतं. त्यामुळे कुत्रं पाळण्यापेक्षा मांजर पाळणं जास्त सोयीचं असतं. भारतात मांजरांच्या वेगवेगळ्या प्रजाती आहेत. आज या प्रजातींची माहिती घेऊ या...

✻ हिमालयन मांजर ही सर्वसाधारणपणे आढळणारी प्रजाती आहे. या प्रजातीला ‘कलरपॉईंट पर्शियन; असंही म्हटलं जातं. या प्रजातीच्या मांजरांच्या अंगावर खूप केस असतात. या मांजरांचे डोळे निळे असतात. त्यांचा रंग पांढराशुभ्र असतो. काहींचा रंग राखाडी, क्रीम किंवा ब्राऊनही असू शकतो.

✻ ‘मुंबई मांजर’ ही मांजराची एक प्रजाती आहे. या जातीचं मांजर काळपट रंगाचं असतं. त्यांचे डोळे सोनेरी असतात. काळ्या रंगामुळे ते उठून दिसतं.

✻ ‘सियामेसे’ ही मांजराची दक्षिण आशियातली प्रजाती आहे. या मांजरांचं मूळ चीनमधल्या शांघायमध्ये आहे. या प्रजातीतील मांजरांचं शरीर पिळदार असतं.

✻ ‘मैने कून’ ही पृथ्वीवरची मांजराची सर्वात प्राचीन प्रजाती आहे. ही मांजरं परिस्थितीशी सहजतेने जुळवून घेतात. कोणत्याही वातावरणात ते स्वत:ला सामावून घेतात. ही प्रजाती स्वभावाने शांत असते.

✻ ‘पर्शियन मांजर’ हॉलिवूडपटांमध्ये दिसतं. या मांजरांच्या अंगावर खूप केस असतात. ते खूप गोंडस दिसतात. या मांजरांकडे जास्त लक्ष द्यावं लागतं.

✻ ‘द अमेरिकन बॉबटेल’ ही मांजराची प्रजाती प्रसिद्ध आहे. या मांजराचं शेपूट झुबकेदार असतं. ते सहजतेने नव्या वातावरणाशी जुळवून घेतात. खेळकर स्वभावासाठी ते ओळखले जातात.

✻ ठिपकेवाली मांजरंही खूप गोड दिसतात. त्यांच्या अंगावर करड्या रंगाचे ठिपके किंवा पट्टे असतात. मांजरांची ही प्रजाती प्रेमळ असते.

मांजर पाळताना विचार करुन प्रजातीची निवड करा. या सोबत्यामुळे तुम्हाला एक चांगला सवंगडी मिळेल याची खात्री बाळगा.

## नक्षी नेल पॉलिशची

**करून तर पाहा**

तुमच्याकडे नेल पॉलिशच्या रंगीबेरंगी बाटल्या असतील. या नेल पॉलिशचा वापर करून तुम्ही भन्नाट कलाकृती साकारू शकता. नेल पॉलिश मार्बलिंग हा प्रकार तुम्ही नक्की ट्राय करा. यासाठी काय करायचं हे पाहु या...



साहित्य : रंगीबेरंगी नेल पॉलिश, पसरट ट्रे, पाणी, प्लेन पेपर, नेल पॉलिश रिमूव्हर, प्लास्टिकचे ग्लोव्हज, टूथपिक, पॉपसिकल स्टिक्स इत्यादी.

कृती: सर्वात आधी पसरट ट्रेमध्ये पाणी घाला. या पाण्यात कागद बुडायला हवा. कामाला सुरूवात करण्यापूर्वी प्लास्टिकचे ग्लोव्हज असतील घाला. त्यातूनही हातांना नेल पॉलिश लागलं तर ते काढण्यासाठी रिमूव्हरचा वापर करता येईल. आता खरी गंमत आहे दोस्तांनो... नेल पॉलिश मार्बलिंग ही भन्नाट कलाकृती आहे. ती करण्यासाठी विविध रंगांचं नेल पॉलिश घ्या. सगळ्या बाटल्या ट्रे मधल्या पाण्यात ओता. ही कृती झटपट करा. आधी फिकट रंगाचं नेल पॉलिश घ्या. मग गडद रंगांची निवड करा. टूथपिकच्या मदतीने नेल पॉलिश पाण्यात पसरवून घ्या. आता पेपर पाण्यात बुडवा. काही सेकंद ठेवा आणि लगेच बाहेर काढा. कागदावर नेल पॉलिशची नक्षी उमटलेली दिसेल. पाण्यावर तरंगणारं नेल पॉलिश पॉपसिकल स्टिकच्या मदतीने बाजूला करा. कागद वाळू द्या. कागदावर उमटलेली रंगीबेरंगी नक्षी खूप छान दिसेल.


## झाडांच्या जगात

**फन टाईम**

‘झाडं लावा, झाडं जगवा’ हे वाक्य तुम्ही बरेचदा ऐकलं असेल. झाडं पर्यावरणाची रक्षक असतात. हवेतला कार्बन डाय ऑक्साइड शोषून घेऊन वातावरणात ऑक्सिजन सोडण्याचं महत्त्वाचं काम झाडं करतात. म्हणूनच जास्तीत जास्त झाडं लावायला हवी. झाडांबद्दल सगळं काही जाणून घ्यायचं असेल तर www.treetures.com या साईटला भेट द्या. या साईटवर झाडांशी संबंधित सगळी माहिती उपलब्ध आहे. या साईटचं होमपेज खूप आकर्षक आहे. या होमपेजवर तुम्हाला वेगवेगळी पात्रं दिसतील. त्यावर क्लिक केलं की झाडाच्या प्रत्येक भागाची माहिती मिळू शकेल. या साईटवर रंजक माहितीही आहे. झाडांबद्दलचं ज्ञान वाढवण्यासाठी ही साईट उपयुक्त ठरू शकेल.

झाडं कशी लावायची, त्यांचं संवर्धन कसं करायचं हे सगळं या साईटवर आहे. रंग बदलणारी पानं, जंगलांची रचना, वणवा कसा लागतो, झाडं कशी वाढतात, झाडांना कीड कशी लागते हे सगळं यावर आहे. इथे झाडांविषयीचं ज्ञान वाढवणारे गेम्स आहेत. छान छान व्हिडिओ आहेत. चांगल्या आणि वाईट कीटकांची वर्गवारी करण्यात आली आहे.

काही कीटक झाडांच्या वाढीला मदत करतात. झाडांचं नुकसान करणारे किडे खातात तर काही कीटक पानं खातात. झाडांची वाढ रोखतात. इथे तुम्ही अशा कीटकांची माहिती मिळवू शकता. मग काय दोस्तांनो, झाडांना वाहिलेल्या या साईटला भेट देणार ना?






## कसं मिळवायचं मानांकन?

**स्मार्ट नॉलेज**

‘गुगल’ हे जगातलं सर्वोत्तम सर्च इंजिन आहे. इथे एखादी माहिती, बातमी किंवा साईट सर्च करायची असेल तर सर्चबारमध्ये जावं लागतं. या सर्चबारमध्ये तुम्हाला विविध कंपन्या, वेबसाईट्स तसंच बातम्या दिसतात. हे सगळं गुगलच्या पहिल्या पानावर असतं. गुगलच्या पहिल्या पानावर स्थान मिळवण्यासाठी कंपन्या, वेबसाईट्समध्ये चढाओढ असते. कोणत्या साईटला पहिल्या पानावर स्थान द्यायचं हे गुगल ठरवतं. हे ठरवण्याची गुगलची एक पद्धत आहे. गुगल प्रत्येक साईटला मानांकन म्हणजे रँक देतं. या प्रक्रियेला ‘अल्गोरिदम’ असं म्हटलं जातं. ही प्रक्रिया नेमकी काय आहे याविषयी...

कसं मिळतं मानांकन?

सर्वाधिक वाचल्या गेलेल्या किंवा सर्च केल्या गेलेल्या वेबसाईट्स, बातम्या, कंपन्या तसंच इतर बाबींना गुगल पहिल्या पानावर स्थान देतं. कोणती बातमी किंवा साईट किती शेअर केली आहे हे सुद्धा गुगल बघतं.

क्लिक

वेबसाईट किंवा माहितीवर करण्यात आलेल्या क्लिकच्या आधारे मानांकन ठरतं. क्लिक जास्त तेवढं मानांकन वर येण्याची शक्यताही जास्त. एखाद्या साईटला मिळणारे क्लिक कमी झाले तर ती साईट दुसऱ्या किंवा तिसऱ्या पानावर जाते.

बाउंस रेट

साईटचा बाउंस रेट जास्त असेल तर मानांकन खाली घसरू शकतं. लोकांना साईटवरची माहिती आवडली नाही तर बाउंस रेट वाढतो.

सरासरी वेळ

युजरने वेबसाईटवर किती वेळ घालवला किंवा एखादी माहिती किती वेळ वाचली यावरुन गुगल मानांकन ठरवतं.

कुठून मिळाली माहिती?

एखाद्या साईटची किंवा वृत्ताची माहिती कुठून मिळाली हे सुद्धा पाहिलं जातं. सोशल मीडिया किंवा थेट गुगलवरून माहिती मिळाली असेल तर नामांकन वर येतं. अन्य मार्गाने माहिती मिळाली असेल तर नामांकन घसरतं.




## निवडा वेगळी वाट

**कोण होणार?**

डॉक्टर, इंजिनिअर, सीए, एमबीए, आयसीडब्ल्यूए यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसोबत आता करीअरचे हटके पर्याय निवडण्याचा ट्रेंड आहे. विविध क्षेत्रात उत्तम संधी निर्माण झाल्या आहेत. करीअरची वेगळी वाट निवडणाऱ्यांचं कौतुकही होतं. तुम्हीही करीअरची वेगळी वाट निवडू शकता. वेगळ्या करीअरचे हे काही पर्याय...

* इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कार्पेट टेक्नॉलॉजीमधून तुम्ही कार्पेट टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही कापड उद्योगात करीअर करू शकता.

* ट्रेकिंग हा धाडसी क्रीडाप्रकार असल्यामुळे त्याचं प्रशिक्षण घ्यावं लागतं. माउंटेनियरिंग किंवा ट्रेकिंग प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता.

* मुंबई विद्यापीठासह काही संस्था पपेटरीचं प्रशिक्षण देतात. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही करीअरची वेगळी वाट निवडू शकता.

* इंडियन अ‍ॅस्ट्रोबायोलॉजी संशोधन संस्थेत अ‍ॅस्ट्रोबायोलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर तुम्ही अंतराळ क्षेत्रात संशोधन करू शकता.




## निवडक

### बेन स्टोक्सच्या चेहऱ्यावर आदळला चेंडू

**नवी दिल्ली :** इंग्लंडचे कसोटी कर्णधार आणि दिग्गज अष्टपैलू बेन स्टोक्स एका भीषण अपघाताचे बळी ठरले आहेत. मैदानावर सराव करत असताना एक वेगवान चेंडू त्यांच्या चेहऱ्यावर आदळला, ज्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. स्टोक्सने सोशल मीडियावर आपला एक भयावह फोटो शेअर केला, ज्यात त्यांचा चेहरा ओळखणेही कठीण होत आहे. स्टोक्सने इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या फोटोमध्ये त्यांचा उजवा डोळा पूर्णपणे सुजलेला आणि काळा पडलेला दिसत आहे. त्यांच्या गालावर आणि ओठांवर खोल ओरखडे आहेत आणि नाकातून रक्त येत असल्याने पट्टी (बँडेज) लावलेली आहे. इतकी गंभीर दुखापत होऊनही स्टोक्सचा विनोदी स्वभाव कायम आहे. त्यांनी फोटोच्या कॅप्शनमध्ये लिहिले, तुम्ही क्रिकेटच्या चेंडूची अवस्था पाहायला हवी. बेन स्टोक्सने सोशल मीडियावर फोटो पोस्ट केल्यानंतर मजेशीर कमेंटही केली. बेन स्टोक्सने सोशल मीडियावर फोटो पोस्ट केल्यानंतर मजेशीर कमेंटही केली. ॲशेसच्या पराभवानंतर स्टोक्स घरी परतला होता. ३४ वर्षीय बेन स्टोक्स नुकताच ऑस्ट्रेलियाविरुद्ध संपलेल्या ॲशेस मालिकेत ४-१ च्या दारुण पराभवाला सामोरे जाऊन इंग्लंडला परतला होता. या लाजिरवाण्या पराभवानंतर त्यांच्या कर्णधारपदावर टांगती तलवार आहे आणि इंग्लंड क्रिकेट बोर्ड त्यांच्या भूमिकेचा आढावा घेत आहे. अशा वेळी या दुखापतीने त्यांच्या अडचणी आणखी वाढवल्या आहेत. स्टोक्सला जूनमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या कसोटी मालिकेपूर्वी काउंटी क्रिकेटमध्ये डरहमसाठी खेळायचे होते. पण चेहऱ्यावरील या गंभीर दुखापतीनंतर आता त्याच्या मैदानावर परतण्याच्या वेळेबद्दल शंका निर्माण झाली आहे.

### अनुराग ठाकूरवरील बंदी हटवली

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने बीसीसीआयचे माजी अध्यक्ष अनुराग ठाकूर यांच्यावरील आजीवन बंदी हटवली आहे. गुरुवारी न्यायालयाने आपला ९ वर्षांपूर्वीचा निर्णय बदलला आहे. त्यामध्ये



ठाकूर यांना बोर्डापासून दूर राहण्यास सांगितले होते. आता ते भारतीय क्रिकेटच्या कामकाजात आणि बोर्डाच्या कारभारात सहभागी होऊ शकतील.न्यायालयाने म्हटले की, त्यांच्यावर आजीवन बंदी घालणे योग्य नव्हते आणि तसा कोणताही हेतू नव्हता. मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने म्हटले हे प्रमाणबद्धतेचे तत्त्व लागू करण्याचे योग्य प्रकरण आहे.फखंडपीठाने हे देखील स्पष्ट केले की, अनुराग ठाकूर यांनी यापूर्वीच बिनशर्त माफी मागितली होती, जी न्यायालयाने स्वीकारली होती.२०१७ मध्ये लोढा समितीच्या शिफारशी लागू न केल्यामुळे अनुराग ठाकूर यांना पदावरून हटवण्यात आले होते. लोढा समितीच्या नियमांमध्ये वयोमर्यादा आणि सरकारी पद यांसारख्या अनेक कठोर तरतुदींचा समावेश होता.

### बनूरकर स्कूलला दोन सुवर्ण

**साखरपा :** शोतोकॉन कराटे-डो असोसिएशन ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या १०व्या जागतिक कराटे स्पर्धेत कोंडगाव येथील कबनूरकर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चार पदकांची कमाई केली आहे. स्पर्धेत २ सुवर्ण, १ रौप्य आणि १ कास्यपदक शाळेने मिळवले आहे. दहावी जागतिक चॅम्पियनशिप स्पर्धा गोवा येथे झाली. त्यामध्ये कबनूरकर स्कूलच्या चार विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता. या स्पर्धेत चारही स्पर्धकांनी पदके मिळवली आहेत. ओम शेटये आणि विघ्नेश राजापूरकर यांनी सुवर्णपदक मिळवत स्पर्धेत आपली छाप पाडली त्याचबरोबर शुभम होनमाने याने रौप्य आणि निशांत कांबळे याने कास्यपदक पटकावले. सर्व स्पर्धकांना शोतोकॉन कराटे-डो असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष रमेश पिसाळ तसेच ट्रेनर तेजस साळुंखे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी स्पर्धकांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीधर कबनूरकर, मुख्याध्यापिका लीना कबनूरकर आदींनी अभिनंदन केले.

### रायगडच्या खेळाडूंचे बर्फावर सुवर्णयश



**रसायनी :** गुलमर्ग, काश्मीर येथे पार पडलेल्या १२ व्या हिवाळी राष्ट्रीय आईसस्टॉक अजिंक्यपद स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी अत्यंत प्रतिकूल हवामानावर मात करत घवघवीत यश संपादन केले. स्पर्धेदरम्यान गुलमर्ग येथे स्नोफॉल झाला होता. तापमान उणे १५ अंश सेल्सिअसइतके खाली घसरले होते. या राष्ट्रीय स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध वयोगटांत सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची लयलूट केली.यात ज्येष्ठ महिला गटात रायगडची कन्या संस्कृती घरत १ सुवर्ण व २ कांस्य पदके,धनेशा शिंगोटे ३ कांस्य पदके ज्येष्ठ पुरुष गटात भूपेंद्र गायकवाड १ कांस्य पदक २३ वर्षांखालील वयोगटात आदित्य खंडिझोड (२ कांस्य),१९ वर्षांखालील वयोगटात प्रमोद ठोंबरे (१ कांस्य),१६ वर्षांखालील वयोगटात यश मोरे (३ कांस्य)१६ वर्षांखालील वयोगटात तन्वी शेलार (१ सुवर्ण, २ रौप्य)१६ वर्षांखालील वयोगटात निसर्गा गावली (१ सुवर्ण, ३ रौप्य) यांनी पदके पटकावली.

### तायक्कांदो स्पर्धेसाठी 'एसआरके' सज्ज

**रत्नागिरी :** रत्नागिरी तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनच्या मान्यतेने आणि तायक्कांदो संघ आयोजित १९वी जिल्हास्तरीय ओपन तायक्कांदो स्पर्धा येत्या ८ फेब्रुवारी पर्यंत रंगणार आहे. मारुती मंदिर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडासंकुल येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी एसआरके तायक्कांदो क्लबचा संघ जाहीर करण्यात आला.स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण जिल्ह्यातून सुमारे ६५०हून अधिक खेळाडू यात आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. स्पर्धा प्रामुख्याने पुमसे आणि क्युरोगी या दोन प्रकारात पार पडणार आहेत. वयोगटानुसार ७, १२, १४, १८ वर्षांखालील आणि १८ वर्षांवरील (वरिष्ठ) अशा विविध गटांत हे सामने होतील.या स्पर्धेसाठी एसआरके तायक्कांदो क्लबचे साहिल आंबेरकर यांची पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच स्पर्धेसाठी संघ प्रशिक्षक म्हणून पी. वी. वयोगटासाठी समर्था बने, देवन सुपल, सबज्युनिअर वयोगटासाठी सुजल सोलंके, श्रुती चव्हाण, कॅडेट वयोगटासाठी वेदांत चव्हाण, पार्थ गावडे, कनिष्ठ वयोगटासाठी अमेय सावंत, वरिष्ठ वयोगटासाठी निखिल पवार यांची नावे संघ प्रशिक्षक म्हणून जाहीर करण्यात आली.

---

**२० संघ, ५५ सामने-१ ट्रॉफी**

# आजपासून वर्ल्ड कपचा थरार

**| मुंबई | प्रतिनिधी |**

आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेच्या थराराला ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. तर ८ मार्चला वर्ल्ड कप विजेता निश्चित होणार आहे. या १० व्या टी २० वर्ल्ड कप स्पर्धेत एकूण २० संघ आमनेसामने आहेत. या २० संघांची ५-५ नुसार ४ गटात विभागणी करण्यात आली आहे.

स्पर्धेचं भारत आणि श्रीलंकेला यजमानपद मिळालं आहे. भारतात वर्ल्ड कप स्पर्धेचं २०१६ नंतर आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेदरम्यान एकूण २० संघात ५५ सामने खेळवण्यात येणार आहेत. हे ५५ सामने भारतातील ५ आणि श्रीलंकेतील २ शहरातील ३ अशा एकूण ८ स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार आहेत.




साखळी फेरीत प्रत्येक संघाला आपल्या गटातील प्रत्येक संघाविरुद्ध १ असे एकूण ४ सामने खेळायचे आहेत. साखळी फेरीत ७ ते २० फेब्रुवारी दरम्यान एकूण ४० सामने खेळवण्यात येणार आहेत. साखळी फेरीत प्रत्येक गटातील अव्वल २ संघ सुपर ८ साठी पात्र ठरतील. साखळीनंतर २१ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान सुपर ८ फेरीत एकूण १२ सामने खेळवण्यात येणार आहेत. सुपर ८ मधून उपांत्य फेरीसाठी ४ संघ पात्र ठरतील. तर ४ संघांचं पॅकअप होईल. त्यानंतर ४ आणि ५ मार्च रोजी उपांत्य फेरीत ४ संघ भिडतील. त्यातून अंतिम सामन्यासाठी २ संघ निश्चित होतील.

८ फेब्रुवारीला वर्ल्ड कप विजेता कोण असणार? हे स्पष्ट होईल. भारतातील ५ स्टेडियममध्ये वर्ल्ड कप स्पर्धे तील सामने खेळवण्यात येणार आहेत. तर श्रीलंकेतील २ शहरांमधील ३ स्टेडियममध्ये सामन्यांचा थरार क्रिकेट चाहत्यांना अनुभवता येणार आहे.

#### भारत आणि श्रीलंकेतील स्टेडियम

वानखेडे स्टेडियम, मुंबई
एमए चिदंबरम स्टेडियम, चेन्नई
इडन गार्डन्स, कोलकाता
नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
आर प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, कँडी
सिंहली स्पोर्ट्स क्लब, कोलंबो

#### बांगलादेशची स्पर्धेतून माघार

आयसीसीने भारताऐवजी श्रीलंकेत सुरक्षेच्या कारणामुळे सामन्यांचं आयोजन करण्याची मागणी फेटाळल्याने बांगलादेशने स्पर्धेतून माघार घेतली आहे. त्यामुळे बांगलादेशच्या जागी स्कॉटलँडचा समावेश करण्यात आला आहे.

#### पाकचा इंडियाच्या सामन्यावर बहिष्कार

पाकिस्तानने इंडिया विरुद्ध रविवारी १५ फेब्रुवारीला होणाऱ्या सामन्यात खेळणार नसल्याचं जाहीर केल आहे. पाकिस्तान सरकार या निर्णयापर्यंत शेवटपर्यंत ठाम राहिल्यास त्यांना २ पॉइंट्सचा तोटा सहन करावा लागू शकतो.

#### सलग १३ दिवस दररोज ३ सामने

दरम्यान साखळी फेरीत पहिले १३ दिवस दररोज ३ सामने खेळवण्यात येणार आहेत. स्पर्धेत पहिल्या दिवसापासून (७ फेब्रुवारी) ते १९ फेब्रुवारीपर्यंत चाहत्यांना दररोज ३ सामने पाहायला मिळणार आहेत.

---

### रिंकूचे फेसबूक अकाउंट हॅक

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

क्रिकेटर रिंकू सिंहची फेसबुक आयडी हॅक झाली आहे. सायबर चोरांनी रिंकूची आयडी बदलून त्यातून होणारी कमाईही त्यांच्या खात्यात हस्तांतरित केली. रिंकूच्या भावाने तक्रार केल्यानंतर सायबर क्राईम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रिंकूचा भाऊ सोनू याने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, रिंकू सिंहच्या फेसबुक पेजवर १.६ दशलक्ष फॉलोअर्स आहेत. तो गेल्या बऱ्याच काळापासून आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने आणि टी-२० विश्वचषकाच्या तयारीमध्ये व्यस्त होता. यामुळे तो सोशल मीडिया अकाउंटवर लक्ष देऊ शकला नाही.

४ फेब्रुवारी रोजी त्याने आयडी उघडण्याचा प्रयत्न केला असता, पासवर्ड चुकीचा असल्याचे दाखवत होते. आयडी ॲक्सेस करण्यातही अडचण येत होती. तेव्हा त्याने आपला भाऊ सोनू याला सर्व काही सांगितले. सोनूने ५ फेब्रुवारी रोजी एसएसपींची भेट घेऊन तक्रार दिली. एसएसपींच्या आदेशानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

सोनूने सांगितले की, रिंकूचे अकाउंट मॉनिटाइज्ड आहे, ज्यामुळे चांगली कमाई होते. ती देखील हॅकर्सच्याच अकाउंटमध्ये ट्रान्सफर होत आहे. रिंकूकडून माहिती मिळाल्यावर एसएसपींना कळवण्यात आले. सायबर क्राईम पोलीस स्टेशनचे इन्स्पेक्टर रामेंद्र शुक्ला यांनी सांगितले की, अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सुरू आहे.

### सिराजची भारतीय संघात एन्ट्री

**नवी दिल्ली :** भारतीय संघाला टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धा खेळायची आहे. मात्र या स्पर्धेला सुरुवात होण्याच्या एक दिवस आधीच भारतीय संघात बदल करावा लागला आहे. भारतीय संघात वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला संधी मिळणार आहे. याबाबत लवकरच बीसीसीआय घोषणा करण्याची शक्यता आहे. भारताचा युवा वेगवान गोलंदाज हर्षित राणा या वर्ल्ड कप स्पर्धेतून बाहेर जाण्याची शक्यता आहे. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने पत्रकार परिषदेमध्ये याबाबत संकेत दिले आहेत. त्याने सांगितले की, हर्षित राणा अद्याप स्पर्धून बाहेर झाला नाही, त्याच्या दुखापतीचा सध्या फिजिओ आढावा घेत आहेत. पण त्याची दुखापत फारशी चांगली वाटत नाही.

### बंगळुरू सलग दुसऱ्यांदा चॅम्पियन

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दुसऱ्यांदा महिला प्रीमियर लीग जिंकला. गुरुवारी संघाने दिल्ली कॅपिटल्सचा ६ विकेट्सने पराभव केला. बंगळुरू २०२४ मध्ये पहिल्यांदाच चॅम्पियन बनला. वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर २०४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना१९.४ षटकांत ४ विकेट्सने विजय मिळवला.

कर्णधार स्मृती मंधानाने ८७ धावा केल्या, तर जॉर्जिया वोलने ७९ धावा केल्या. दोघांनी ९२ चेंडूत १६५ धावांची भागीदारी केली. दिल्लीची कर्णधार जेमिमा रॉड्रिग्जने ३७ चेंडूत ५७ धावा केल्या, ज्यामध्ये ८ चौकारांचा समावेश होता. लॉरा वोल्वार्ड ४४ आणि शेनेल हेन्री ३५ धावांवर नाबाद राहिली.लिझेल लीने ३७



- **दिल्ली सलग चौथ्यांदा फायनल हरला**
- **मंधानाने ८७, जॉर्जियाने ७९ धावा केल्या**

आणि शेफाली वर्मा २० धावा केल्या. आरसीबीकडून सायली सातघरे, नदीन डी क्लार्क आणि अरुंधती रेड्डी यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. एक फलंदाज धावबाद झाली.

समारोपसमारंभातमलायका-तलविंदर यांनी सादरीकरण केले. लीगच्या समारोप समारंभात बॉलिवूड अभिनेत्री मलायका अरोराने चल छैया... छैया या गाण्यावर नृत्य केले, तर पंजाबी गायक तलविंदरने स्वतःच्या गाण्यांवर सादरीकरण केले.

---

**जिल्हास्तरीय क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा**

### फिटनेस ऑन जिम तक्का प्रथम

**| पनवेल | प्रतिनिधी |**

खांदेश्वर नवीन पनवेल पश्चिम येथे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन, रायगडची पार पडली. आगरी शिक्षण संस्थाचे माध्यमिक विद्यालय येथे झालेल्या या स्पर्धेत अनेक नामवंत पुरुष व महिला खेळाडू आले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन पॉवरलिफ्टिंग जिल्हा संघटनेचे अध्यक्ष गिरीश वेदक, महाराष्ट्र पॉवर लिफ्टिंग संघटनेचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित संजय सरदेसाई, सहसचिव छत्रपती पुरस्कार सन्मानित संजय माधव, मुंबई शहर संघटनेचे शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित अनंत चाळके, शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित सतीश पाताडे, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त रामचंद्र गावडे, सनदी लेखापाल राजाराम गोळे,पनवेल



तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पंकज भगत यांच्या उपस्थितीत पार पडले.

स्पर्धेसाठी पंच म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सतीश पाताडे, राष्ट्रीय खेळाडू गोपीनाथ पवार, अंकुश सावंत, उत्तम धुरी, जितेंद्र यादव (सर्व,मुंबई), नवी मुंबईचे राकेश पाटीलआणि रामचंद्र गावडे (रायगड) यांनी काम केले.

या स्पर्धेत सब ज्युनिअर स्ट्राँगबॉय अद्वैतभोसले (कॉडझील्हा जिम महाड),ज्युनिअर मुले स्ट्राँग बॉय अथर्व लोधी (संसारे फिटनेस, पेण) सिनिअर पुरुष मध्ये नितीन बिरवाडकर (कॉडझील्हा जिम महाड), ओव्हरऑल मास्टर स्ट्राँगमन महेश पाटील (शिवतेज जिम, वावोशी खोपोली) आणि महिलांमध्ये ओव्हर ऑल स्ट्राँगवूमन अमृता भगत (पॉवर हाऊस क्लब खोपोली)झाली. सांघिक विजेतेपद ओव्हर ऑल प्रथम क्रमांक (फिटनेस ऑन जिम तक्का पनवेल), द्वितीय क्रमांक क्काडझिल्हा जिम, (महाड), तर तृतीय क्रमांक आयएनडी क्लब (कर्जत) यांना मिळाला.

### ग्रेटा कर्पेला सुवर्णपदक

**आंबोली :** पाचवी राष्ट्रीय सब ज्युनिअर, ज्युनिअर, सीनिअर शस्त्रांग मार्शल आर्ट्स स्पर्धा नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे पार पडली. या स्पर्धेत ग्रेटा महेश कर्पे हिने सुवर्णपदक पटकावले. ती कुपवाड येथील जिद्द स्पोर्ट्स फाउंडेशनची खेळाडू आहे.या स्पर्धा महाशस्त्रांग मार्शल आर्ट असोसिएशनच्या वतीने आयोजित केल्या होत्या. स्पर्धेत मुंबईसह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतील तसेच हरियाणा, पंजाब आदी राज्यांतील खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेतील एअर शिल्ड प्रकारात ग्रेटा हिने सुवर्णपदकाला गवसणी घातली. तिला महाराष्ट्र राज्य प्रमुख मिलिंद काटमोरे, सांगली जिल्हाध्यक्ष काजल लोंढे, सचिव प्रथमेश लोंढे, पारस माने, वैभव शिंदे, शुभम लांडगे आदींचे मार्गदर्शन लाभले.

**किशोर-किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धा**

### कुरुक्षेत्रात महाराष्ट्राचा सुवर्णइतिहास!



**| हरियाणा | वृत्तसंस्था |**

कुरुक्षेत्र येथे सुरू झालेल्या ३५ व्या किशोर व किशोरी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोरी संघाने विजेतेपद पटकावत सलग आठव्या अजिंक्यपदाची ऐतिहासिक नोंद केली.

या स्पर्धेत इला पुरस्कार महाराष्ट्र्च्या अपर्णा वर्देने, तर भरत पुरस्कार ओडिसाच्या सत्या राजन बेहरने पटकावला. सलग नऊ वेळा अजिंक्यपद जिंकणाऱ्या महाराष्ट्राच्या किशोर संघाला यंदा मात्र तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने राजस्थानवर एक डाव व १२ गुणांनी विजय मिळवला. पहिल्याच आक्रमणात महाराष्ट्राने १७ गुणांची निर्णायक आघाडी घेतल्याने सामना पूर्णपणे एकतर्फी ठरला. महाराष्ट्राकडून राही पाटील, वेदिका तामखेडे, अपर्णा वर्दे, ऋतुजा सुरवसे, पियुशा परमाळकर यांनी कामगिरी करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

---

**अंडर १९ वर्ल्ड कप स्पर्धा | वैभव सूर्यवंशीचे विक्रमी शतक**

# इंग्लडसमोर ४११ धावांचे आव्हान

**| हरारे | वृत्तसंस्था |**

शुक्रवारी (६ फेब्रुवारी) १९ वर्षांखालील वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेचा अंतिम सामना हरारेमध्ये भारत आणि इंग्लंड संघात खेळला जात आहे. या सामन्यात भारतीय संघाने इंग्लंडसमोर ४१२ धावांचे भलेमोठे लक्ष्य ठेवले आहे. भारतासाठी वैभव सूर्यवंशीने विश्वविक्रमी शतकी खेळी केली आहे. आता या सामन्यात विजय मिळवून वर्ल्ड कप जिंकायचा असेल, तर इंग्लंडला ४११ धावा करण्यापासून थांबवण्याचे आव्हान भारतासमोर आहे, इंग्लंडला हा सामना जिंकायचा असेल, तर इतिहास घडवावा लागणार आहे. कारण अद्याप मोठ्या लक्ष्याचा पाठलाग या स्पर्धेच्या इतिहासात झालेला नाही.



भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. भारताकडून सलामीला ॲरॉन जॉर्ज आणि वैभव सूर्यवंशी उतरले होते. पण चौथ्याच षटकात जॉर्जला ९ धावांवर ॲलेक्स ग्रीनने बेन मायेसच्या हातून झेलबाद केले. पण नंतर वैभवला कर्णधार आयुष म्हात्रेची भक्कम साथ मिळाली. त्यांनी शतकी भागीदारीही केली. या दरम्यान दोघांनी अर्धशतके पूर्ण केली. तसेच आक्रमक खेळताना वैभव शतकाजवळ पोहचला होता. मात्र अर्धशतकानंतर आयुष १९ व्या षटकात बाद झाला. त्याला ॲलेक्स ग्रीननेच बेन मायेसच्या हातून झेलबाद केले. आयुषने ५१ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५३ धावा केल्या. वैभव आणि आयुष यांनी दुसऱ्या विकेटसाठी १४२ धावांची भागीदारी केली. त्यानंतर वैभवला वेदांत त्रिवेदीचीही साथ मिळाली. वैभवने ५५ चेंडूत शतक पूर्ण केले. त्यानंतर मात्र तो अत्यंत आक्रमक खेळू लागला. त्याने ७१ चेंडूतच दीडशतक पूर्ण केले होते. तो द्विशतकाच्या दिशेने वाटचाल करत होता. मात्र २६ व्या षटकात त्याला मॅनी लम्लडेनने थॉमस ऱ्यूच्या हातून झेलबाद केले. वैभवने १५ चौकार आणि १५ षटकारांसह ८० चेंडूत १७५ धावांची खेळी केली. ही अंतिम सामन्यातील सर्वात मोठी खेळी आहे. तो बाद झाल्यानंतर वेदांत त्रिवेदी आणि उपकर्णधार विहान मल्होत्रा यांच्यातही ५१ धावांची भागीदारी झाली. मात्र विहान ३६ चेंडूत ३० धावा करून जेम्ल मिन्टोच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर वेदांतही ३२ धावांवर मिन्टोच्याच गोलंदाजीवर बाद झाला. तरी नंतर अभिग्यान कुंडूने आक्रमक ३१ चेंडूत ४० धावांची खेळी केली. आरएस आंब्रिशने १८ धावांची खेळी केली. खिलान पटेल ३ आणि हेनिल पटेल ५ धावांवर बाद झाले. पण कनिष्क चौहानने शेवटच्या षटकात आक्रमक फलंदाजी करत भारताला ४०० धावांचा टप्पा पार करून दिला. भारताने ५० षटकात ९ बाद ४११ धावा केल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)